# चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १७

## सभावृत्तांत

दिनांक – १९.५.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१८ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.५.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.राहुल गुलाब जाधव

१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.गोफणे अनुराधा देविदास

२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.गीता सुशिल मंचरकर

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३३) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३४) मा.अनुराधा गणपत गोरखे

३५) मा.केशव हनुमंत घोळवे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.पवळे सुमनताई मधुकर

४८) मा.चिखले सचिन तुकाराम

४९) मा.जावेद रमजान शेख

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा.बाबर शर्मिला राजू

५४) मा.अमित राजेंद्र गावडे

५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६९) मा.सुलक्षणा राजू धर

७०) मा.शाम गणपतराव लांडे

७१) मा.सुजाता सुनिल पालांडे

७२) मा.योगेश मंगलसेन बहल

७३) मा.कदम निकीता अर्जुन

७४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७७) मा.नढे विनोद जयवंत

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.पवार मनिषा प्रमोद

८०) मा.बारणे अर्चना तानाजी

८१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८२) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८३) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४) मा.बारणे माया संतोष

८५) मा.निलेश हिरामण बारणे

८६) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८७) मा.दर्शले रेखा राजेश

८८) मा.कलाटे राहुल तानाजी

८९) मा.ममता विनायक गायकवाड

९०) मा.कामठे तुषार गजानन

९१) मा.कस्पटे संदिप अरुण

९२) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९३) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९४) मा.सुनिता हेमंत तापकीर

९५) मा.कुटे निर्मला संजय

९६) मा.आंगोळकर सागर सुनिल

९७) मा.मुंढे उषा अंकुश

९८) मा.कदम शशिकांत गणपत

९९) मा.लोखंडे चंदा राजू

१००) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०६) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०७) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१११) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डॉ.साळवे-अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय

अधिकारी, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोराटे, मा.झगडे, मा.राऊत, मा.चितळे, मा.कापडणीस -सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.लडकत -कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी** – सन्मा.महापौर साहेब, उत्तर प्रदेशात वादळ व पावसामुळे झालेल्या दुर्घटनेमध्ये ७३ जणांचा मृत्यू तसेच कै. सुरेश चोंधे-सन्मा.नगरसदस्या आरती चोंधे यांचे पती व पीसीएमटीचे माजी सभापती, कै. विजयकुमार-कर्नाटकामधील भाजपा आमदार, कै. हिमांशू रॉय-आयपीएस अधिकारी, कै.दिलीप कोल्हटकर-ज्येष्ठ नाटयकर्मी व दिग्दर्शक, कै. यमुनाबाई वाईकर-ज्येष्ठ लावणी सम्राज्ञी, कै. अरुण दाते-ज्येष्ठ गायक, कै.प्रकाश रामचंद्र गायकवाड, कै. सुनिता प्रकाश गायकवाड, कै. संदीप प्रकाश गायकवाड, शीतल संदीप गायकवाड, अभिराज संदीप गायकवाड- भिगवण जवळ झालेल्या भीषण अपघातात यमुनानगर निगडी येथील एकाच घरातील ५ जणांचा मृत्यू, कै. गुड्डापा पवार, कै. ह.भ.प. येदुभाऊ पांडुरंग कस्पटे, कै.श्रीमती सुमनताई पोपट काळोखे- सामाजिक कार्यकर्त्या यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून आजची सर्वसाधारण सभा ५ जून पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले –** मा.महापौर साहेब, आज खरतर मनाला हाळहाळ करणारी अशी घटना घडली तुळजापूर याठिकाणाहून देवीचे दर्शन घेवून येत असताना पुणे-सोलापुर महामार्गावर एक भीषण अपघात झाला आणि या अपघातामध्ये एक पाच वर्षाच्या चिमुरडया सहीत घरातील आई वडीलांबरोबर, आजी आजोबा बरोंबर पाच व्यक्ती यांना देवाज्ञा झाली. यामध्ये प्रकाश रामचंद्र गायकवाड वय वर्षे ६७, सुनिता प्रकाश गायकवाड वय वर्षे ५८, संदिप प्रकाश गायकवाड वय वर्षे ४०, शितल संदिप गायकवाड वय वर्षे ३२, अभिराज संदिप गायकवाड वय वर्षे ५ या पाच व्यक्तींच अपघाती दु:खद निधन झाल आणि आमच्या यमुनानगर निगडी या परिसरामध्ये सर्व नागरिकांवर एक दु:खाचा डोंगर कोसळला. आपल्या सर्व सभागृहाच्या वतीने माझ्या पत्रकार बांधवाच्या

वतीने अधिकारी वर्गाच्या वतीने या कुटूंबाला भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** आजची सभा सोमवार दि.११/६/२०१८ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – १७
## सभावृत्तांत
## (दि.१९/५/२०१८ ची तहकूब सभा)

दिनांक – ११.६.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९/५/२०१८ (माहे मे-२०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.११.६.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | महापौर |
| २) | मा.शैलजा अविनाश मोरे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.संजय बबन नेवाळे

४१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४२) मा.भालेकर प्रविण महादेव

४३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.चिखले सचिन तुकाराम

४९) मा.जावेद रमजान शेख

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.योगेश मंगलसेन बहल

७४) मा.कदम निकीता अर्जुन

७५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७) मा.नढे विनोद जयवंत

७८) मा.पाडाळे निता विलास

७९) मा.काळे उषा दिलीप

८०) मा.कोकणे संतोष अंकुश

८१) मा.पवार मनिषा प्रमोद

८२) मा.बारणे अर्चना तानाजी

८३) मा.अभिषेक गोविंद बारणे

८४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६) मा.निलेश हिरामण बारणे

८७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.ममता विनायक गायकवाड

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९५) मा.सुनिता हेमंत तापकीर

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.लोखंडे चंदा राजू

१०४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११५) मा. वाबळे संजय मल्हारराव

११६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११९) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे- प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.चितळे, मा.कापडणीस, मा.झगडे, मा.खोराटे, मा.राऊत -सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.गलबले -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी** – सन्मा.महापौर साहेब, श्रीनगर येथे केलेल्या दहशतवादी हल्ल्यात बीआरएफ चे दोन जवान शहीद तसेच मा.ना. पांडुरंग ऊर्फ भाऊसाहेब फुंडकर- भारतीय जनता पार्टी ज्येष्ठ लोकनेते व विद्यमान कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे निधन झाले आहे. ते यापुर्वी अकोला लोकसभा मतदार संघातून नवव्या लोकसभा, दहाव्या लोकसभा आणि अकरावी लोकसभा या लोकसभेचे तीन वेळा सलग खासदार होते. महाराष्ट्र विधानसभा परिषदेमध्ये विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. तीन वेळा आमदार भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्ष म्हणून १९९२-९६ या काळामध्ये अध्यक्ष होते. त्यांचा जन्म दि. १०/८/१९५० रोजी बुलढाणा याठिकाणी झाला. त्यांच्या जाण्याने भारतीय जनता पक्षाचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राचे आणि या देशाचा सुध्दा एक चांगला कर्तुत्ववान नेता आपण या ठिकाणी गमावलेला आहे. त्यांना याठिकाणी श्रध्दांजली वाहण्यात यावी. त्याचबरोबर कै.उदय

शुक्ला- मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे यांचे पती वरिष्ठ आयपीएस अधिकारी, कै.राधाबाई तुकाराम बो-हाडे- माजी नगरसेवक श्री अरुण तुकाराम बो-हाडे यांचे मातोश्री, कै.गणपत रामचंद्र कोलते- निगडी येथील उद्योजक, कै.दत्तात्रय पल्हाद पाटील- नवी सांगवी येथील सामजिक कार्यकर्ते, कै. रामदास खामगळ- रामनगर चिंचवड येथील ज्येष्ठ नागरीक, मुक्ताबाई पांडुरंग बवले- इंद्रायणीनगर, भोसरी येथील ज्येष्ठ नागरीक, कै. मधुकर लिंबराव गोरे- इंद्रायणीनगर भोसरी येथील सामजिक कार्यकर्ते, कै. भागुबाई परबत हगवणे- तळवडे, कै. ज्ञानोबा राघू शिंदे- तळवडे, कै. प्रभाकर काटे- पिंपळे सौदागर, कै. श्रीम. एन्नी [ Annie] जोसेफ-मोरवाडी, पिंपरी वरील सर्व ज्ञात, अज्ञात मृत व्यक्तींना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहून आजची सभा दि.२०/६/२०१८ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** ही सभा बुधवार दि.२०/६/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – १७</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.१९/५/२०१८, दि.११/६/२०१८ ची तहकूब सभा)**

<u>दिनांक – २०.६.२०१८</u> <u>वेळ – दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.११/६/२०१८ (माहे मे-२०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.६.२०१८ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.जावेद रमजान शेख

५३) मा.यादव मीनल विशाल

५४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५५) मा.प्रमोद कुटे

५६) मा.राजू मिसाळ

५७) मा.बाबर शर्मिला राजू

५८) मा.अमित राजेंद्र गावडे

५९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

६०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६३) मा.ढाके नामदेव जनार्दन

६४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६५) मा.करुणा शेखर चिंचवडे

६६) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६७) मा.भोईर सुरेश शिवाजी

६८) मा.अपर्णा निलेश डोके

६९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

७०) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७१) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७२) मा.जयश्री वसंत गावडे

७३) मा.कोमल दिपक मेवानी

७४) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७५) मा.सुलक्षणा राजू धर

७६) मा.शाम गणपतराव लांडे

७७) मा.योगेश मंगलसेन बहल

७८) मा.कदम निकीता अर्जुन

७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८२) मा.नढे विनोद जयवंत

८३) मा.पाडाळे निता विलास

८४) मा.काळे उषा दिलीप

८५) मा.पवार मनिषा प्रमोद

८६) मा.बारणे अर्चना तानाजी

८७) मा.अभिषेक गोविंद बारणे

८८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८९) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

९०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९१) मा.बारणे माया संतोष

९२) मा.निलेश हिरामण बारणे

९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९४) मा.दर्शले रेखा राजेश

९५) मा.कलाटे राहुल तानाजी

९६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९७) मा.ममता विनायक गायकवाड

९८) मा.कामठे तुषार गजानन

९९) मा.चोंधे आरती सुरेश

१००) मा.कस्पटे संदिप अरुण

१०१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०३) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०६) मा.कुटे निर्मला संजय

१०७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०९) मा.आंगोळकर सागर सुनिल

११०) मा.मुंढे उषा अंकुश

१११) मा.कदम शशिकांत गणपत

११२) मा.लोखंडे चंदा राजू

११३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१२०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१२१) मा.संतोष बबन कांबळे

१२२) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२५) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२९) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.पाटील, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.दुरगूडे, मा.चितळे, मा.खोराटे, मा.बोदडे, मा.राऊत-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.निकम, मा.लडकत -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.राहुल कलाटे**:- मा.महापौर साहेब, भय्यू महाराज- अध्यात्मिक गुरु यांचे निधन, कै. कुमार अभिषेक माने, कै. समीर शेख, कै. पंडीतराव दाभाडे, कै. रामभाऊ कोंडीबा लांडगे, कै. दत्तात्रय पांडुरंग गुळवे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली

वाहण्यात यावी. तसेच मा. आयुक्त साहेब नाहीत. तरी ही सभा एक तासानंतर घ्या नाहीतर परवा घ्या. अशी मी विनंती करतो.

**मा. विलास मडिगेरी :-** अनुमोदन देण्यात येत आहे.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** ही सभा शुक्रवार दि.२२/६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

**सभावृत्तांत**

**(दि.१९/५/२०१८, दि.११/६/२०१८, दि.२०/६/२०१८ (दु.१.०० वा.) ची तहकूब सभा)**

दिनांक – २२.६.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/६/२०१८ (दु.१.०० वा.) (माहे मे-२०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२२.६.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | महापौर |
| २) | मा.शैलजा अविनाश मोरे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १४) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.गीता सुशिल मंचरकर

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा.प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा.बाबर शर्मिला राजू

५४) मा.अमित राजेंद्र गावडे

५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६३) मा.भोईर सुरेश शिवाजी

६४) मा.अपर्णा निलेश डोके

६५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६६) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा.कोमल दिपक मेवानी

६९) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.योगेश मंगलसेन बहल

७३) मा.कदम निकीता अर्जुन

७४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६) मा.नढे विनोद जयवंत

७७) मा.पाडाळे निता विलास

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.पवार मनिषा प्रमोद

८०) मा.बारणे अर्चना तानाजी

८१) मा.अभिषेक गोविंद बारणे

८२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८३) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८४) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५) मा.बारणे माया संतोष

८६) मा.निलेश हिरामण बारणे

८७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९१) मा.ममता विनायक गायकवाड

९२) मा.कामठे तुषार गजानन

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.सुनिता हेमंत तापकीर

९७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९) मा.कुटे निर्मला संजय

१००) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०३) मा.मुंढे उषा अंकुश

१०४) मा.कदम शशिकांत गणपत

१०५) मा.लोखंडे चंदा राजू

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०९) मा.चौगुले सिमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११५) मा. वाबळे संजय मल्हारराव

११६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११९) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- आयुक्त, मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डॉ.साळवे-वैदयकीय संचालक, मा.चितळे, मा.झगडे, मा.खोराटे, मा.खोत, मा.दुरगूडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पाटील-प्राचार्य औदयोगीक प्रशिक्षण केंद्र, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.लडकत, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.गायकवाड, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख-कार्यकारी अभियंता, मा.आगळे, मा.दांगट-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी, मा.माने- भांडार अधिकारी (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

दत्ताकाका यांना विनंती आहे की आपण स्पिकर आणलेले आहेत ते बाहेर ठेवलेतर बरे होईल. तुमचा माईक चालू राहील.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आम्ही आणलेला माईक बंद बॅगमध्ये आहेत. नियमबाहय आम्ही वागणार नाहीत.

**मा.महापौर-** सभाशास्त्राच्या नियमांचे उल्लंघन करु नका. प्रत्येकाचा पर्सनल स्पिकर तुम्ही ठेवू शकत नाहीत.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आम्ही त्याचा वापर केलातर बोला नां.

**मा.महापौर-** पर्सनल वस्ती आणता येत नाही.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याच्यापुर्वी आमचा आवाज दाबण्याचे काम झालेले होते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही वेळ कशासाठी आली. नगरसचिव यांनी खुलासा करावा. आम्ही बोलायला लागल्यानंतर माईक चालू करत नाहीत. आम्ही पंचवीस वर्ष सभागृहात आहेत. कुठल्याही सदस्यांच्या टेबलवरचा माईक बंद केला जात नव्हता. ही प्रथा मागच्या वर्षीपासून पडलेली आहे. टेबलवरचा माईक बंद केलातर आम्हांला कॉलर माईक सुध्दा आणता येईल. येथूनपुढे आदेश दयावेत की सगळे माईक चालू राहीले पाहीजेत. काय होईल आवाज येईल त्यासाठी सभागृह आहे. नगरसचिव खुलासा करणार असतीलतर सांगावे की आजपर्यंत असे झाले होते का.

**मा.महापौर -** आपण सगळे जण एकत्र उभे राहून बोलायचे म्हणलेतर सगळेच माईक कसे चालू राहतील. ज्यावेळेला एकजण बोलत असेल त्याचा माईक बंद केला जाणार नाही. एक व्यक्ती बोलत असेल त्याचवेळेस दुसरा बोलत असेलतर त्याचा बंद करायला सांगीतले, सगळेच बंद करायला सांगीतले नाही. कोणाचाही आवाज दाबण्याचे कारण नाही. प्रत्येकवेळेस तुम्हांला बोलण्यासाठी संधी दिलेली आहे. माईक सिस्टीम एकावेळेस जो बोलत असेलतर त्याचीच चालू राहील, बाकीच्यांनाही ते काय बोलतात हे समजले पाहीजे. प्रत्येकाना बोलण्याची संधी मिळणार आहे. एकावेळेस एकजण बोला. दत्ता काका आपण स्पिकर बाहेर ठेवावेत. आपला माईक बंद केला जाणार नाही. कोणाचाही माईक बंद केला जाणार नाही.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आम्ही स्पिकर आणला याचे कारण ज्यावेळेला सभागृहामध्ये मंगलाताई कदम, योगेश बहल आणि अन्य नगरसेवक बोलत असताना माईक बंद करा असे तुम्ही म्हणलेल आहे. आमच्या विरोधकाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करु नका. येथून पुढे ही आपल्याकडून अपेक्षा नाही. याच्यापुर्वी सभागृहामध्ये असे प्रकार घडलेले नाहीत. आता हा प्रकार घडला म्हणून ही वेळ आलेली आहे. या सभागृहामध्ये माईक आणण्याची वेळ आपण आणलेली आहे, आम्ही आणलेली नाही. आमचे हे माईक मी बाहेर ठेवतो, परत कधी वेळ आलीतर आम्ही कोणाचेही ऐकणार नाहीत. मी हे माईक बाहेर ठेवतो.

अ) मा.महापालिका सभा क्र- १३ दि. २०/२/२०१८, दि.२८/२/२०१८ (दु.२.०० व सायं.५.३५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्र- १५ दि. २०/३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे शिक्षण समिती नेमणे-

(टिप – शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत)

(टिप – शिक्षण समितीच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे शिक्षण समिती नेमणे- विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या आहेत.

१) शिक्षण **समिती**- शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

(शिक्षण समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- ०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ – ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना – ०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्या वतीने शिक्षण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी- ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- ०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील

सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत शिक्षण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित आण्णा बोदाडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे, २) मा.बुर्डे सुवर्णा विकास, ३) मा.बाबर शर्मिला राजू, ४) मा.सोनवणे शारदा हिरेन, ५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र, ६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा), ७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ, ८) मा.काळे उषा दिलीप, ९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या पालिका सदस्यांच्या शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेत आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करणेत आले.

ठराव क्रमांक - १८८ विषय क्रमांक - १
दिनांक – २२/६/२०१८ विभाग – मा.नगरसचिव

**<u>विशेष समिती</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील मा.शिक्षण समिती नेमण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे, तसेच

मा.शिक्षण समिती – मा.शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात

१) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे, २) मा.बुर्डे सुवर्णा विकास, ३) मा.बाबर शर्मिला राजू, ४) मा.सोनवणे शारदा हिरेन, ५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र, ६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा), ७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ, ८) मा.काळे उषा दिलीप, ९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

-----

**विषय क्रमांक २)** मा.आश्विनी भिमा बोबडे यांनी मा.क्रिडा, कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असून मा.क्रिडा, कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ चे. संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.नगरसचिव –** विषय क्रमांक २ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत.१) मा.आश्विनी भिमा बोबडे – पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते तथा सभागृहनेता मा.एकनाथ पवार यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.अण्णा बोदडे, यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे-

१) मा.कुंदन अंबादास गायकवाड, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -१८९ | विषय क्रमांक – २ |
| दिनांक – २२/६/२०१८ | विभाग – मा.नगरसचिव |

मा.आश्विनी भिमा बोबडे यांनी मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.कुंदन अंबादास गायकवाड या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

------

**विषय क्रमांक ३)** मा.वसंत प्रभाकर बोराटे यांनी मा.विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असून मा.विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे

कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ चे.संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.नगरसचिव –** विषय क्रमांक २ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा. विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा. विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत.१) मा.वसंत प्रभाकर बोराटे – पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते तथा सभागृहनेता मा.एकनाथ पवार यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.अण्णा बोदडे, यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे-

१) मा.सागर बाळासाहेब गवळी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

ठराव क्रमांक -१९० | विषय क्रमांक – ३
दिनांक – २२/६/२०१८ | विभाग –मा.नगरसचिव

मा. मा.वसंत प्रभाकर बोराटे यांनी मा.विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी

नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सागर बाळासाहेब गवळी या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

------

(नियुक्त समिती सदस्यांचा पुस्तक व फुल देवून सन्मान करणेत आला.)
(मा.आमोद कुंभोजकर, मुख्यलेखापरिक्षक व मा.ज्योत्सना शिंदे, प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ) यांचा मा.महापौर यांचे हस्ते सन्मान करणेत आला व त्यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन दिला.)

--------

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह काल शहरामध्ये पहिलाच पाऊस झाला आहे आणि आख्ख शहरात ठिकठिकाणी पाणी साचले आहे. अक्षरश: तळे तळे साचलेले आहे. आकुर्डी ग्रेड सेप्रेटर आपण जर पाहिला तर तो पुर्णपणे पाण्याखाली होता. पिंपरी मधील जो ग्रेड सेपरेटर आहे तो देखील पाण्याखाली होता. काही लोकांच्या गाडया स्लीप झाल्या. ॲक्सीडेंट झाले आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी आपल्याच महानगरपालिकेचे ग क्षेत्रीय कार्यालय काल जर तुम्ही पाहिले असतेतर आपल्या कैलासभाऊंचा वॉर्ड आहे तो. तिथे एक शाळेत जाणारी व्हॅन ती सुध्दा पाण्यामध्ये अडकली होती ते शाळेचे विदयार्थी शाळेमध्येच थांबले होते महापौर साहेब. स्मार्ट सिटी म्हणून ओळखला जाणारा आपला पिंपळे सौदागर परिसरामधे अनेक सोसायटयांमध्ये पाणी शिरले होते. निगडीचा सिग्नल असेल, निगडीच्या सिग्नलच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणात पाणी साचले होते. आपण जे नाले सफाईचे काम दिलेलं होते ते ठेकेदार नेमके काय काम करतात. पहिल्याच पावसामध्ये शहराची जर का ही अवस्था असेल तर येथून पुढे मोठया प्रमाणात पाऊस होणार आहे

असे हवामान खात्याने वर्तविले आहे. ४८ तासामध्ये महापौर साहेब, पाऊस मोठा पुणे वेध शाळेने दाखविला आहे. महापौर साहेब तात्काळ आपण जे कोणी ठेकेदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी अशी मी तुम्हाला नम्र विनंती करतो. त्याचप्रमाणे सर्वात महत्वाचा विषय म्हणजे पालिकेमध्ये कुठून ना कुठून तरी चर्चा होत असती. आज पुढारी सारख्या वर्तमानपत्राने देखील छापले आहे असा कोणता अधिकारी आहे की जो महिलांकडून शरीर सुखाची मागणी केली गेली होती. आयुक्त साहेब, सरळ सरळ त्याच्यामध्ये लिहिलेले आहे. की उच्चपद अधिका-यांची पालिकेत काम करणा-या एका महिलेला सेवापुस्तकामध्ये अनुकूल अहवाल लिहिण्यासाठी शरीर सुखाची मागणी केली गेली. तर ही बातमी खरी आहे का? या पिंपरी चिंचवड शहराचे आम्ही नगरसेवक आहोत. आणि या शहरामध्ये अशा प्रकारच्या बातम्या छापून येत असतील तर आम्हांला पण आमचे नागरीक त्या पध्दतीने बघतीलनां, मग आम्ही नगरसेवक म्हणून कसे काम करायचे महापौर साहेब. नक्की काय चालले आहे. याच्यावर तुम्ही खुलासा करावा. संबंधित जो कोणी अधिकारी असेल त्यालाही खुलासा करायला लावा. तसेच त्यांना बडतर्फ करावे अशी मी मागणी करतो.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब आम्ही गेल्या अनेक दिवसापासून ऐकतो की आपल्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे. आणि आपल्याकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतरही आपण कारवाई केली नाही असे नगरसदस्यांचे म्हणणे आहे. कालच्या एका वृत्तपत्रामध्ये कुठे वाचले मला आठवत नाही पण दत्ता काकांनी तो विषय उचलला. एकतर पहिली गोष्ट अशी आहे की साहेब अशी जर तक्रार आली असेलतर आपण जागेवर शासन करा. कोणीही असू दयात तो आणि दुसरं असे की या सभागृहामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त महिला निवडून आलेल्या आहेत आणि आम्हाला जर कोणी असा अबला, कमजोर आणि अशा प्रकारची वागणूक देत असेलतर ते आम्ही सुध्दा सहन करणार नाहीत. आमच सुध्दा ते कर्तव्य आहे परंतु त्याचबरोबर त्याचा सुध्दा आधार घेऊन समर्थ महिला भगिनींना लाजवण्याचे काम सुध्दा झाले नाही पाहिजे. आयुक्त साहेब, का नाही आपण इथ खुलासा केला. आपण वृत्तपत्रक वाचता. आपण प्रेसनोट काढायची, आपण सांगायचे होते की अस काही झाल नाही म्हणून आणि झालं असेलतर तक्रारदार महिला कोण आहे. तुमच्याकडे विशाखा कमिटी आहे. काय चौकशी, काय खर खोट ते आम्हांला कळलं पाहिजे नां. कुठल्यातरी एका महिला अधिका-याने सांगितलं की आमका अधिकारी मला म्हणतो जीन्स घालून का येत नाही. मग खर काय खोट काय याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. आज एका पदाधिका-याकडे उदया दुस-या पदाधिका-याकडे, परवा या अधिका-याकडे, तेरवा त्या अधिका-याकडे हा जो प्रकार आहे तो थांबला पाहीजे. तुमच कंट्रोल

नाही या अधिका-यांवरती. आमच्या भावनेचा तुम्ही इथ खेळ करु नका. या शहराचे आम्ही याठिकाणी नेतृत्व करतो आणि एखादा अधिकारी एखादया महीला अधिका-याबरोबर असे जर वागत असेलतर त्याची शहानिशा झाली पाहिजे आणि तो पर्यंत पुढचा विषय महापौर साहेब घ्यायचा नाही. कमिशनर साहेब यांनी खुलासा करायचा. काय कारवाई केली ते सांगावे. तक्रार खरी खोटी जे काही असेल ते सगळ सांगायचे आहे आणि नावानिशी सांगा साहेब.

**मा. मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर सचीन चिखलेचे मी आभार मानते. त्यांनी विषय वाचला त्यावेळी आम्हाला सभागृहामध्ये चांगले वाटले नाही. कमिशनर साहेब जर आपल्या अधिका-याचे नांव येत असेल, आपली महिला कर्मचारी असेल. आज ज्या वेळेला तक्रार येते त्या वेळेला त्या तक्रारीचे निरसन हे झाले पाहिजे. महिलांच्या बाबतीत जर असे कुठे घडलेय, तर ते अजिबात सुध्दा आपल्या शहराच्या दृष्टीने तर सोडाच सोडाच पण आपल्या महापालिकेच्या दृष्टीने सुध्दा अजीबात चांगले नाही आणि सभागृहात विषय येण्या आधिच कमिशनर साहेब तुम्ही जी कोणी महिला आहे त्याची शहानिशा करुन याच्यावर तुम्ही कारवाई करायला पाहीजे होते. तक्रार तुमच्याकडे आली. सभागृहात खरतर ५० टक्के पेक्षा जास्त महिला आहेत. आज २५ वर्षापेक्षा जास्त काळ महिला राजकारणामध्ये काम करतात. आणि हे काम करीत असताना त्या अधिकारी महिला, म्हणजे अधिकारी महिला म्हणून आम्ही त्यांची बाजू घ्यायची नाही असं होत नाही. आमच्या अधिकारी महिलेने सुध्दा सक्षम रितीने काम केले पाहिजे. आमच्या अधिकारी महिला जर सक्षम रितीने काम करीत असतील तर आमच्या सगळया नगरसेविका त्याच्यापेक्षा सुध्दा जास्त सक्षम रितीने काम करतील. कारण प्रत्येक अधिका-याकडे सगळया नगरसेविकांना जावे लागते. मग जर बघण्याचा दृष्टीकोण असा झाला तर आमच्या हया नगरसेविकांनी अधिका-यांच्या समोर जायचे कसं. उदया प्रश्न निर्माण होईल. आणि मग कार्पोरेशनमध्ये, बाहेर पब्लीक असे बोलते की राजकारण असे आहे, राजकारण तस आहे. आजपर्यंत आम्हाला असा कधी अनुभव आला नाही. अधिका-यांची तोंडाकडे बघण्याची पण हिंमत होणार नाही. परंतु जर अस कुठे होत असेल तर हे साहेब योग्य नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये असे कधी घडल नाही. हयाचा साहेब तुम्ही खुलासा करा. आणि त्या अधिका-यावर, आम्ही अस म्हणणार नाही की तो अधिकारी आता खरतर त्या जागेसाठी पात्र असेल पण तुम्ही शहानिशा करणे गरजेचे आहे. एखादी महिला ही तक्रार मागे घेऊ शकते. कुणाचा दबाव म्हणेल कुणाचे अमुक म्हणेल. साहेब शहानिशा करणे गरजेचे आहे. आजपर्यंत आम्ही २५ वर्षामध्ये अशा तक्रारी बघिततेल्या आहेत. परंतु साहेब हे सांगायला पाहीजे होत. उदया तुम्ही हे

आम्हाला सांगू शकता की मला हे माहिती आहे. परंतु याची शहानिशा झाली पाहिजे तो पर्यत पुढील विषय घेऊ नका. महापौर साहेब आपण चार दिवस सलग जीबी चालू ठेवू काही प्रॉब्लेम नाही कुणाला. पण या विषयाचे निरसन झाले पाहिजे. त्याशिवाय आमच्या महिला भगिनी सभागृह चालू देणार नाही एवढंच सांगते.

**मा. प्रियांका  बारसे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर सचीन चिखले यांनी एक गोष्ट प्रकाशामध्ये आणली आहे. महिलांवर अन्याय आणि त्यावर आवाज उठविण्याची क्षमता असलेली महिला तिने खर जर या गोष्टीची तक्रार केली असेल तर ती खोट बोलणारच नाही आणि खोट बोलली असेल तर त्याची शहानिशा हा शब्द माझ्यामते खूप छोटा आहे. शहानिशा करण्यापेक्षा त्या अधिका-याला पहिल्यांदा त्या खुर्चीवरुन बाजूला करणे महत्वाचे आहे. कारण त्याच्यापुढे अजून १०० महिला जात असतील. त्यामुळे शहानिशा  न करता पहिल्यांलादा  निलंबित करा आणि मग चौकशी समिती बसवा. कारण तो माणूस जोपर्यंत खुर्चीवर आहे. तोपर्यंत त्याच्या पाठीशी १०० हात राहणार आहेत त्याच्या डोक्यावर १०० लोकांचे आर्शीवाद राहणार आहेत. तो कोणाच्या ना कोणाच्या तरी पाया पडणार. चिरीमिरी देणार. आणि या प्रकणातून सुटणार आणि त्या महिलेला न्याय मिळणार नाही. तिला न्याय मिळण्यासाठी चौकशीच्या आधी निलंबित करणे जास्त आवश्यक आहे. कोणतीही महिला असा खोटा आरोप करणार नाही. आणि मी त्या महिलेचे सुध्दा अभिनंदन करते की तिने अन्याया विरुध्द आवाज उठविला मला यानंतरही बोलायचय परंतु हा विषय महत्वाचा आहे त्यामुळे हा विषय पहील्यांदा संपवा आणि खरच या क्षणी सुध्दा आयुक्तांच्या तोंडावरती बोट आहे ही माझ्या दृष्टीने खूप शरमेची बाब आहे मी आयुक्तांचा सुध्दा या गोष्टीसाठी निषेध करते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह  खरतर पंचवीस तीस वर्षे राजकीय प्रवास करत असताना माझ्या माहितीप्रमाणे जाहीर रित्या सभागृहामध्ये अशी चर्चा प्रथमच होत आहे. कालच्या आणि आजच्या कालखंडामध्ये बराचसा फरक आहे साहेब. आता सोशल मिडीया फार फास्ट झाली आहे. महानगरपालिकेमध्ये अशाप्रकारे, हया सभागृहामध्ये अशी चर्चा चालू आहे. एक सेकंदामध्ये जगभर बातमी पसणार आहे. आपली प्रतिमा आणि आपले विकासाच असलेले स्थान आणि अशा परिस्थितीमध्ये अशी वादग्रस्त चर्चा या सभागृहामध्ये होत आहे हिच आमच्या दृष्टीकोनातून आमच्या आयुष्यातील ही दुर्दैवी घटना आहे. आणि याच पाविञ्य जर टिकवायच असेलतर अधिकारी कोण आहे, तक्रार कोणी केली आहे. परंतु या सगळया परिस्थितीचं भान ठेवून आपण विस्तारपुर्वक चर्चा करीत बसण्यापेक्षा ताबडतोब खुलाशावर येऊन हा निर्णय त्वरीत करावा. मला वाटत हा विषय चर्चेचा

देखील होऊ शकत नाही. एवढे असे दळभद्री जर लोक असतील तर कशाला ठेवायचे, काय गरज आहे, का त्यांच्यावर महानगरपालिका चालणार आहे का. त्यांना आरामशीर इतक अभय दयायच आणि मग तक्रारदार महिलेने एखादया महिलेने धाडस करुन एखादी तक्रार केल्यानंतर एका व्यक्तीला एवढ जर अभय मिळत असेल तर त्या जागी दुसरी व्यक्ती कोणता आधार घेऊन तुमच्याकडे तक्रार करणार आहे. नगरसेवकाकडे सुध्दा येणार नाहीत. मला वाटत महापौर साहेब यावर फार चर्चा करण्यापेक्षा ताबडतोब कारवाई करावी अशी मी मागणी करतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह प्रथम मी सचीन चिखलेचे मनापासून आभार मानतो. गेली महिनाभर महानगरपालिकेमध्ये हे प्रकरण चालू आहे. अनेक वृत्तपत्रामध्ये या बातम्या सर्व शहराने नव्हेतर मला वाटत महाराष्ट्राच्या सर्व लोकांनी पाहिलेल असेल. काही वृत्तपत्रामध्ये नावे सुध्दा आलेली आहेत. यासाठी मी मा. आयुक्त यांना पत्र दिले होते. की साहेब वृत्तपत्रामध्ये अनेक चर्चा आलेल्या आहेत. ख-या खोटया याच ज्यावेळेस कुठल्या वृतपत्रामध्ये कुठली शहरामधली किंवा महानगरपलिके विषयी बातम्या येतात तर मा. आयुक्त साहेबांकडे अशी एक यंत्रणा आहे की त्या बातमीची शहानिशा करणे त्याच्यावर चौकशी करणे. किंवा अन्य काही करणं  हे काम आदरणीय आयुक्त साहेबांच असल्या कारणाने ते आयुक्तांनी  केले आहे किंवा नाही मला माहीत नाही. आपण इथ महिनाभर नव्हता. त्यामुळे हा प्रकार वाढण्याचे कारणच असे आहे की आपण महिनाभर इथ नव्हता. आपण आपल्या खाजगी कामासाठी बाहेर होता. त्या काळामध्ये हे सगळे प्रकरण घडले आहे. पण साहेब काही काळामध्ये ज्यावेळेस हे प्रकरण घडले त्यावेळेस आपण या ठिकाणी होता. आणि मला माझ्या भगिनींना माझी विनंती आहे. सिमाताई आपल्याला देखील माझी विनंती आहे, मंगलाताईही बोलल्या.  ही वस्तुस्थिती १०० टक्के घडलेली आहे. याठिकाणी अशी घटना घडली त्या महिलेने पोलीस चौकीमध्ये एफआरआय केला आहे. पण एफआरआय करताना एवढा मोठा प्रेशर आणला गेला की तो अधिकारी वरच्या पोस्टला आहे. कोणाला संलग्न आहे आणि म्हणून ते प्रकरण दाबण्याचे काम मा.आयुक्त साहेब जाण्याच्या आधी करुन गेलेले आहेत हे मी जाहीरपणे सगळया सभागृहामध्ये सांगू इच्छितो. आयुक्त साहेब आजपर्यंत आम्ही या सभागृहामध्ये १५ वर्षापासून आहोत. आम्ही या सभागृहामध्ये बंधूभाऊ, बहिणभाऊ या नात्याने  वागत आहोत. तुमच्या अधिका-यांच्या ऑफिसमध्ये  अनेक भगिनी आहेत. अनेक अधिकारी आहेत प्रत्येकाला कुठल्या ना कुठल्या कामासाठी त्या भगीनीला आपल्याकडे यायच असतं आणि अशा परिस्थितीमध्ये हे काही घडत असेल तर मला वाटत या अधिकारी वर्गावरचा विश्वास उडल्याशिवाय राहणार नाही असे मी याठिकाणी सांगतो. साहेब या

घटना सगळया आपल्याला माहिती आहेत. माझ्याकडे पेपरची कात्रणे आहेत. एका कात्रणामध्ये नावे सुध्दा आलेले आहेत. मला एक कळत नाही जर का पेपरमध्ये खोटी बातमी होती तर त्या पेपरवर कारवाई करायची होती. त्यावर कायदेशीर कारवाई करुन ही बातमी खरी आहे की खोटी आहे. आजही पेपरमध्ये बातमी येत असेलतर सभागृहामध्ये कोणाच नाव घेण्यापेक्षा मी हे आयुक्तांकड देतो आयुक्तांनी वाचाव. पेपरमध्ये आलेल आहे, आम्हाला माहीती आहे. शहरवासीयांना माहिती आहे. तुम्हांलाही माहिती आहे आणि मला ही माहिती आहे. माझ्या विरोधात एखादी बातमी आलीतर शहरवासीय १०० टक्के म्हणतात पेपरमध्ये आलय म्हणजे ही बातमी खरी आहे. याच्यावर आपण विश्वास ठेवायचा नाही. केशरी सारख्या पेपरला, सकाळसारख्या पेपरला, लोकमत सारख्या पेपरमध्ये, मोठमोठया वृत्तपत्रामध्ये बातमी आली आहे याची आपण मजाक करता. म्हणजे याचा अर्थ मला नक्की माहीत आहे की याच्यामध्ये काहीतरी पाणी मुरले आहे. आणि आपण खूप मोठी सेटींग करुन आम्ही पोलीस चौकीमध्ये गेलो होतो आम्ही एफआरआय मागण्याचा प्रयत्न केला परंतु तिथे सुध्दा एफआरआय देण्याचे काम झालेले नाही, आम्हाला दिले गेल नाही. साहेब यामध्ये तर लिहील आहे की पिंपरी चिंचवड महापालिकेतील महिला असुरक्षीत. काही पेपरला बातम्या आहेत महापालिकेतील कर्मचा-यावर केलेल्या अत्याचारावर दुर्लक्ष नको. साहेब, हे पत्र तुम्हांला मी देतो. नाव तर मी घेत नाही, तुम्ही सांगा. मला वाटत की लोकमत ला बातमी आलेली आहे हे नाव तुम्ही वाचलतर बरं होईल, आम्ही वाचून चुकीच होईल. त्या अधिका-याचे धाबे दणाणले. सगळे पेपर आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेची महिला असुरक्षित, जर महापालिकेची माझी भगिनी जर असुरक्षित असेल तर साहेब, मला वाटत एखादी महिला सुध्दा कुठल्या अधिका-या समोर जायची डेरींग करणार नाही. हा निंदनीय प्रकार आहे, हा निषेधार्थ प्रकार आहे. जो कोणी यामधला महाभाग असेल तो कुणाचाही असू देत, कुणाचाही असेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई होणे अपेक्षित आहे अशी सभागृहाच्या वतीने मी विनंती करतो. आणि हे जर झाले नाही आम्हाला जर कळाल हाच व्यक्ती आहे तर हमारे हिशाबसे हम उसका जवाब देंगे, असं मी सांगतो. माझ्याकडे सगळे प्रकरण आहे, पण तो माणूस कोण आहे हे शोधण्यासाठी मी आतापर्यंत थांबलो आहे. सचीनभाऊ हे सगळे प्रकरण सगळयांना माहिती आहे. पण आयुक्त यांनी गपचिळी भूमिका घेतलेली आहे. काय झाले आहे मला काही कळेना. कारण एखादया अबलेवर अत्याचार असं काही होत असेल तर ही बाब अत्यंत दुर्भाग्याची आहे. आपल्या महिला भगिनी सगळया सबला आहेत. पण आपलीच एखादी गरीब भगीनी असू शकते म्हणून कुठल्याही महिलांवर अत्याचार होणे, येथून पुढे असे काही घडणे हे आम्ही अपेक्षित धरु शकत नाहीत. ज्याने हे केले आहे

त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि या शहरामधील वृत्तपत्रामध्ये जेवढया बातम्या आल्या आहेत त्या बातम्यावर आपण काय केलेलं आहे. साहेब मी हा पेपर तुमच्याकडे देतो याच्यातील नाव आपण वाचून दाखवाव, ही बातमी आपण वाचून दाखवावी. मग सभागृहाला कळेल की हे कोणी केलेले आहे. सगळे सांगतील धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये निश्चितच हा वाईट दिवस म्हणावा लागेल. कारण अशा प्रकारची चर्चा होत आहे. पण ही चर्चा होत असताना खर तर आयुक्त साहेब आपल्या महापालिकेमध्ये एखादया महिलेने अशा प्रकारची तक्रार केली असेल तर तिची मानसिकता किती खराब झाली असेल तिने किती सहन केले असेल. असे असताना देखील आपण एवढया दिवस वृत्तपत्रामध्ये बातम्या येत असताना यावर कारवाई करणे गरजेचे होते. मागे देखील आदरनीय वैदयकीय अधिका-यांचे स्वीय सहाय्यक श्री. अजय चौधरी या व्यक्ती विरुध्द सुध्दा एका महिलेने तक्रार केली होती, आपण काय केले, तर आपण त्याची  फक्त बदली करुन ते प्रकरण दप्तरी दाखल केले होते. परंतु साहेब संपुर्ण सभागृहाला आज तुमच्याकडून अपेक्षा आहे की निश्चितच या प्रकरणाची तुम्ही कोणालाही नेमा चांगल्या प्रकारचे अधिकारी नेमुन याची चौकशी करा जर अधिकारी दोषी असेल तर साहेब त्याची धिंड या महापालिकेच्या परिसरामध्ये आपल्या सर्वांना काढावी लागेल. संपुर्ण शहराचे आपल्याकडे एक विश्वस्त म्हणून पाहात आहेत आणि या महापालिकेमध्ये असे जर घडत असेल तर आज शहर सुरक्षित नाही. आपण रोज वृत्तपत्रामध्ये वाचत आहोत. शहरामध्ये या घटना होत असतील आणि जर महापालिकेत अशी घटना होत असेल तर निश्चितच ते निंदनीय आहे. आणि या प्रकरणाची महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण गांर्भियाने चौकशी करुन दोषी अधिका-याला कडक शासन करावे अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. हे आम्हा महिला भगिनींना ऐकण्यास लाजीरवाणे वाटत आहे. खरतर या सभागृहामध्ये भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की मी वीस पंचवीस वर्षे आहे. मी सुध्दा या सभागृहामध्ये २० वर्षे आहे. परंतु अशी घटना कधीही घडलेली नाही. आज एक महिला भगिनी अधिकारी आहे. तिच्यावर अन्याय होत असेल तर खरोखर आपल्या महापालिकेमध्ये ही दुर्देवी गोष्ट आहे. आज सिमाताई सावळे, मंगलाताई कदम यांनी सांगितले आहे की या महापालिकेच्या सभागृहामध्ये आम्ही ५० टक्केपेक्षा जास्त महिला आहेत. आणि प्रत्येक महिलेला कुठल्या ना कुठल्या कारणास्तव अधिका-यांसमोर जावे लागते. मग कुठलेही काम असो मग एक असो, दोघी असो. पण त्या कामाच्या संदर्भात त्या महिलेला अधिका-यांसमोर जावे लागते आणि साहेब जर

अधिकारी महिलेवरच असा प्रसंग जर येत असेल तर महिला नगरसेविका कशा काय त्या अधिका-यांच्या समोर जाणार आणि कशी कामे आपल्या आपल्या वॉर्डातील होणार. परंतु साहेब मला एवढच सांगायचय की हा जो विषय आहे. इतक्या दिवस पेपरमध्ये येत आहे. आता दत्ता काकांनी पण वाचून दाखविले मग तो पर्यंत आपण थोडीतरी कारवाई केली पाहिजे होती. केली किंवा नाही. आपण विचारपूस केली का नाही हे आम्हाला पण माहीत नाही साहेब. परंतु अशा एका अधिका-याची आपल्या महापालिकेमध्ये वर्तणूक जर अशी असेल तर आपल्या या पालिकेमध्ये  त्या खुर्चीवर काम करण्याच्या योग्यतेचा तो अधिकारी नक्कीच नसणार आहे असं मी सांगते. कारण महिलांना जर सुरक्षितता नसेल अनेक ठिकाणी बाहेर काही गोष्टी घडतात परंतु आपल्या महापालिकेच्या महिला अधिका-यावर असा विषय होत असेल व तिची अतिशय मानहानी झाली असेल, तीच्या घरातील नातेवाईक मंडळी असतील आणि आज बाहेर जर थोडस वातावरण असेल तर त्या महिलेचे किती हे झाले असेल. म्हणजे आज एक महिला म्हणून आम्हाला सुध्दा वाटत की असा हा विषय घडला नव्हता पाहिजे. आणि एक महिलेची हया अधिका-याने अशी मानहानी करायला नव्हती पाहिजे. त्याला पण आई, बहीण असेल. त्याच्या पण नात्या गोत्यातील असेल. आपण बाहेर जर काम करीत असेल तर आपली आई बहीण म्हणूनच अधिकारी वर्गाने काम केले पाहिजे. आज याठिकाणी एवढ वाईट वाटत आहे की अशी ही गोष्ट या ठिकाणी घडायला नव्हती पाहिजे साहेब. खरोखर मी सुध्दा आपल्या सभागृहाच्या वतीने त्या अधिका-याचा निषेध करते आणि नक्कीच त्या अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे. अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह ख-या अर्थाने सचीनदादांच मनापासून कौतूक करावेसे वाटते की त्यांनी आज हा विषय सभागृहामध्ये छेडला. अनेकांनी पेपरमधल्या बातम्या वाचल्या, वर्तमानपत्रामध्ये वाचल, परंतु सभागृहात कसं बोलायचं असा प्रश्न सगळयांना पडला होता परंतु तो विषय छेडला. परंतु बोलत असताना जे शब्द उदगारले ते ऐकताना मात्र अंगावर शहारे उभे राहिले आणि वाईट ही वाटले की ज्या सभागृहामध्ये आपण समाजासाठी काम करण्यासाठी आलेलो आहोत, समाजामध्ये चांगल्या प्रकारचे बदल घडविण्यासाठी आलेलो आहोत त्याच ठिकाणी आपल्याला आपल्याच एका अधिका-याबद्दल आणि एखादया महिलेबद्दल अशा विषयावरती या सभागृहामध्ये चर्चा करण्याची वेळ येत आहे. हा निश्चितपणे अत्यंत दुर्देवी प्रसंग मला वाटत या सभागृहामध्ये आला आहे. परंतु महापौर साहेब, मी तुम्हाला सांगू इच्छिते की जर अशा प्रकारची तक्रार कमिशनर साहेब यांच्याकडे गेली असेल तर १०० टक्के कमिशनर साहेब त्याला दोषी आहेत अस

मला निश्चितपणे याठिकाणी वाटते. कारण ही पहिली घटना नाही महापौर साहेब या पुर्वी सुध्दा आयुक्त साहेबांना अनेक अधिकारी पत्र लिहीतात, सांगतात की मला हा त्रास आहे, या अधिका-यांनी मला अशी शिवी दिली आहे माझ्यावरती अशी काही घटना घडली असेल त्या त्या वेळेला आयुक्त साहेबांकडन सुध्दा संबंधित अधिका-यांवर कारवाई करत असताना त्यांच्याकडून तीतकीच ॲक्टीव्ह भूमिका घेतली जात नाही. हे या ठिकाणी खेदाने सांगावे वाटते. आणि ह्या घटना असतील त्या दोन पुरुषांमधल्या असतील दोन अधिका-यांमधल्या असतील त्याच्यावर जर साहेब तुम्ही ॲक्शन घेतली असती तर निश्चितपणे त्यावेळेस तुमच्यापर्यंत कम्प्लेंट आलेल्या आहेत. परंतु त्याच्यावरती कोणतीही अक्टीव्ह भूमिका घेतलेली नाही. आणि मग निश्चितपणे काय होते की ज्यावेळेस एखादया अधिका-यावर ती वेळ येते त्यावेळेस त्याला वाटत की ज्यांच्यापर्यंत मी ही माहिती सांगणार आहे, जे प्रमुख आहेत त्यांना सांगीतलतर माझ्यासाठी माझ्या बाजूने भांडणार कोण नसेल. त्यामुळे आपोआपच हे प्रकरण पेपरपर्यंत पोहचतात. न्यूज पेपर पर्यंत विषय जायलाच नको होता. हा तुमच्या लेव्हलला विषय आल्यानंतर तुम्ही तो सॉल्वह केला असता तुम्ही तो सॉर्टआऊट केला असता तर निश्चितपणे महानगरपालिकेची अशा प्रकारची बदनामी झाली नसती किंवा आमचा विषय चव्हाटयावर आला नसता परंतु तुमच्यामुळे हे वृत्तपत्रामध्ये गेलं आणि समाजामध्ये सगळयां लोकांना कळालं. साहेब तुमचे काम आहे हे. का त्या त्या वेळेला विषय निकाली निघत नाही. सन्मा. महापौर साहेब तुम्हाला विनंती आहे की मा. आयुक्त साहेबांना सक्त ताकीद दया की यापुढे अशा प्रकारच्या कोणत्याही घटना होत असतील संबंधित अधिकारी तुम्हांला पत्र देत असेलतर त्यांच्यावर दोन ते तीन दिवसामध्ये कारवाई झाली पाहिजे. जर तुम्हांला संबंधित महिलेची तक्रार खरच आली असेलतर संबंधित अधिका-याला तुम्ही निलंबीत केलच पाहिजे. महापौर साहेब तुम्हाला विनंती करते अशा प्रकारचे आदेश तुम्ही दयावेत.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आज महिला अधिका-यावर जो अत्याचार झालाय त्याला वाचा फोडण्याचे काम सचीन चिखलेने केलेले आहे त्याबद्दल त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की आता या विषयावर जास्त चर्चा न करता जे दोषी अधिकारी आहेत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई आपण केली पाहिजे. दत्ता काकांनी आत्ता सांगितले त्या अधिका-याला कोण पाठीशी घालतय. मला असे वाटत नाही की कुठल्या पक्षाचा नेता किंवा कुठल्या पक्षाचे पदाधिकारी अशा अधिका-यांना पाठीशी घालतील. जो कोणी पाठीशी घालत असेल त्यांनाही जनता त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही, एवढे मी आपणाला सांगू इच्छितो. आज भारतीय

जनता पार्टीच्या वतीने महिलांचा आदर केला जातो. आताच आपण पाहिले की शिक्षण मंडळामध्ये पाच महिलांना आम्ही संधी दिलेली आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की हा विषय इथ जास्त न घेता दोषी अधिका-यावर आपण निलंबनाची कारवाई केली पाहिजे. आयुक्त साहेब आपण हा चर्चेचा विषय न घेता दोषी अधिका-यावर निलंबनाची कारवाई करावी एवढी आपल्याला विनंती आहे.

**मा.सचीन चिखले -** या आधी सुध्दा हा प्रकार एका अधिका-यांनी केलेला आहे. त्यावेळेस आपण त्या विषयावर जास्त बोललो नव्हता. हा दुसरा प्रकार आहे. दर वेळेस हेच प्रकार घडतात का इथ.

**मा.महापौर -** सचीनभाऊ तुम्ही बोललेले आहेत. बाकींच्याना पण चर्चा करु दया. पहिल्यांदा तुम्हीच चर्चा केलेली आहे. आपण आयुक्त साहेब यांना आदेश देऊ.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह ज्या ज्या माझ्या महिला भगिनींनी या विषयावर आपले मत मांडले आहे. हे खर आहे या महापालिकेमध्ये महिलांना असुरक्षित वाटत असेल किंवा एखादया महिलेंला कोणी जर त्रास देत असेलतर हे सभागृह नाही तर, समाज सुध्दा अशा व्यक्तीला कधी माफ करणार नाही. खरतर सगळयांच्या भावना त्याच आहेत. सगळयांना असं वाटत की अशा व्यक्तीवर कारवाई झालीच पाहिजे. त्याच्यामुळे मी कोणी किती भाषण करायच काय करायच. मगाशी दत्ता काकांनी माझं ऐकलं. एखादया भगिनीचे नाव सुध्दा सांगणे खरतर अशा पध्दतीमध्ये खूप वाईट असतं. म्हणजे कोर्टामध्ये सुध्दा एखादया महिलेचे नाव आपण जाहीर करणे म्हणजेच एखादयाच्या नजरेआड हिला त्रास दिला का? हा तो माणूस होता का? त्या संदर्भामध्ये अशा प्रकारची परिस्थिती होऊ शकते. सभागृहाच्या भावना हया तीव्र आहेत. मा. महापौर साहेब मी तुम्हाला विनंती करतो. मा. आयुक्तांना या संदर्भामध्ये खरच कम्प्लेंट झाली का? कोण महिला होती. त्याच्यावर काय कारवाई केली? कशा पध्दतीने त्याने त्या महिलेला छळण्याचा प्रकार केला. मला अस वाटत की महापालिकेच्या वरीष्ठ अधिकारी त्या समितीचे सदस्य असून त्यांनी त्वरीत अशा पध्दतीच्या अधिका-याचे निलंबन करावे. अशा पध्दतीच्या घटना या महापालिकेमध्ये होणार नाहीत. खरतर महापालिकेच्या माध्यमातून या शहरातील महिला भगिनींचा आपण सन्मान करण्याचा प्रयत्न करतो. त्यांची सुरक्षा जपण्याचा आपण प्रयत्न करतो. अशा पध्दतीची प्रवृत्ती जर थांबवावयाच्या असतील तर त्याच्यामध्ये मा. कमिशनर साहेबांना, मा.महापौर साहेबांना मी विनंती करतो की कमिशरांनी या संदर्भात खुलासा करावा. आणि या विषयावर आपण त्वरीत कडक कारवाई करावी अशा पध्दतीची विनंती करुन थांबतो. धन्यवाद.

**मा.महापौर -** आयुक्त साहेबांना आदेश देतो की याबाबतीत खुलासा करावा.

**मा.आयुक्त–** मा.महापौर साहेब, सन्मा. सभागृह. आताच पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये महिला कर्मचारी असुरक्षित असल्याबाबत सविस्तर सभागृहामध्ये भावना व्यक्त झालेल्या आहेत. महिलांची सुरक्षितता आणि विशेषत: कर्मचारी महिलांची सुरक्षितता ही कुटूंब प्रमुख या नात्याने आयुक्त म्हणून माझी आहे. आणि या सभागृहात मी सांगतो आहे की ती जबाबदारी मी चोखीने १०० टक्केपेक्षाही जास्त जाऊन पार पाडत आहे. त्यामुळे सभागृहाने एक काकणभरही मनात विचार आणू नये की मी कोणाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे. पहिली गोष्ट समजून घ्यायची आहे की जर कर्मचा-यांना कुठल्याही प्रकारे भययुक्त वातावरण वाटत असेल तर माझे दार २४ तास उघडे आहे. केवळ कार्यालयाचे नाही तर घराचेही. याबाबतीत दुसरी गोष्ट मला सभागृहाला सांगावयाची आहे की या विषयाची सुरवात पहिल्यांदा मे महिन्याच्या सुरवातीला पेपरमध्ये, वृत्तपत्रामध्ये बातमीने झाली होती. आणि त्याचवेळेला याच विषयावरती मा.स्थायी समितीसमोर देखील चर्चा घडविण्यात आलेली होती. मा.स्थायी समिती समोर देखील मला याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता की याबाबतीत तथ्य आहे का? आणि त्यावेळेला मी मा. स्थायी समितीसमोर सविस्तर खुलासा देखील केलेला आहे की अशा स्वरुपाची कुठलीही तक्रार माझ्याकडे कुठल्याही महिला कर्मचा-याने आणलेली नाही. त्यानंतर कुठल्याही प्रकारची लेखी तक्रार, गोपनीय पत्र आमच्या टपालामध्ये किंवा अन्य कुठल्याही ठिकाणी दिलेले आहे का? याची शहानिशा करण्यात आली आणि अशा स्वरुपाची कुठलीही बाब समोर आलेली नाही. त्यानंतर एकवेळ अस समजून चुकलो की माझ्या पर्यंत येण्यासाठी कोणी कर्मचारी घाबरत असेलतर कर्मचारी संघटना ही तर कर्मचा-यांची आहे. त्याच्यामध्ये महिला कर्मचारी प्रतिनिधी आहेत. म्हणून महिला कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधीकडे देखील मी विचारणा केली की त्यांच्याकडे अशा स्वरुपाची कुठली तक्रार केलेली आहे का? काही महिला अधिका-यांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी वैयक्तिकरित्या मी चर्चा केली. तथापि, अशा स्वरुपाची तक्रार असल्याचे माझ्यासमोर निदर्शनास आणण्यात आलेले नाही. सभागृहाला मी सन्मानाने सादर करतो की यापुर्वी ज्या ज्या वेळेला तक्रार आलेली आहे. विशाखा समिती आपल्या इथ सर्वत्र कार्यालयामध्ये स्थापन आहे. विशाखा समितीसमोर या तक्रारी तात्काळ सादर केल्या जातात. विशाखा समिती प्रमुख हे त्या त्या विभागातील महिला अधिकारी किंवा कर्मचारी या समितीचे प्रमुख असते. त्यांच्यासमोर सविस्तर त्याची हेरींग घेतली जाते. क्लीस्ट स्वरुपाच्या या तक्रारी असतात आणि त्या गोपनीय पध्दतीने त्यांची चौकशी केली जाते. गोपनीय रित्या चौकशी केल्यानंतर त्याचा अहवाल गोपनीय पध्दतीने आयुक्तांसमोर ठेवला जातो. विशाखा समितीच्या शिफारशीनंतर त्याच्या वरती जे संबंधित अधिकारी कर्मचारी असतील त्यांच्यावरती

कारवाई केली जाते. ही कारवाई तात्काळ आणि कडक कुठल्याही प्रकारचा खुलासा त्यांच्याकडून न घेता केली जाते. अशा स्वरुपाची भूमिका ठेवून प्रशासन महिला कर्मचा-यांच्या संरक्षणार्थ काम करीत असते. आणि याबाबतीत वारंवार जो उल्लेख केला जातोय की आयुक्तांनी याच्यामध्ये मूग गिळून गप्प बसणे किंवा अशा स्वरुपाचे धोरण घेतले अशी जी वाच्यत्ता केली जाते ती अत्यंत चुकीची आहे. सन्मा. पदाधिका-यांपैकी काही जणांनी ही बाब निदर्शनास आणली होती. त्यांच्या समोर मी याबाबीचा वैयक्तिक रित्या वेळोवेळी भेटीमध्ये खुलासा केलेला आहे. नवनियुक्त मा.विरोधी पक्षनेत्यांनी माझी भेट घेऊन या विषयी मला सांगण्यात आले होते आणि त्यांना देखील त्यावेळेला सन्मानाने सांगण्यात आले होते की जर त्यांच्याशी कुठलीही महिला कर्मचारी विश्वासात बोलली असेल की माझ्यावरती असा असा प्रसंग ओढावण्यात आला होता तर त्यांनी माझ्या ते निदर्शनास आणावे मी कोणालाही स्पेअर करणार नाही. तथापि, अदयापपर्यंत कुठल्याही स्वरुपाची माहिती माझ्यासमोर आलेली नाही. सन्मा. वृत्तपत्र हे सजकपणे घटना समोर आणत असतात. तथापि, सदर प्रकारामध्ये अशा स्वरुपाची माहिती वृत्तपत्रामध्ये जी छापून आलेली आहे ती कॉमप्रेंसीव्ह नाही ती सजेस्टीव्ह आहे. सजेस्टीव्ह माहितीच्या आधारावरती प्रशासनाचे मनोबल खच्ची करणे हे कुठल्याही प्रकारच्या प्रशासकीय कार्यवाहीमध्ये न बसणारी बाब आहे. एखादया कर्मचा-यावरती टारगेट करण्याची प्रवृत्ती देखील त्याच्यामागे असू शकते, ही आहे असं म्हणण्याचा माझा दावा नाही. तथापि, कुठल्याही प्रकारच्या व्यक्तीगत तक्रारी माझ्याकडे व्यक्तीगत रित्या आलेल्या नसताना कोणीही कुठल्याही प्रकारची तक्रार मला व्यक्तीगतरित्या किंवा सामुदायिकरित्या किंवा कुठल्याही पदाधिका-यामार्फत आलेली नसताना कुठल्या पध्दतीने कुठल्या अधिका-यावर कार्यवाही करावी याचा देखील विचार याच सभागृहाने करण्याची आवश्यकता आहे. आत्ताच सभागृहामध्ये महिला कर्मचा-यांच्या बाजूने खुप योग्य विचार मांडण्यात आले. पण हे विचार मांडत असताना काही चुकीचे शब्द देखील वापरण्यात आले. माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की या प्रशासनामध्ये जे तुमच्या शहराच प्रशासन आहे, या प्रशासनामध्ये विश्वास दाखविण्याची आवश्यकता आहे. हे प्रशासन कुठल्याही प्रकारच्या भयास बळी न पडता काम करण्यास सक्षम आहे. इथ बसलेला प्रत्येक जो एचओडी आहे तो तनमनधन अर्पुण काम करतो आहे. चुका कधीकधी होतात त्यांच्यावरती त्या त्या वेळेला कार्यवाही करण्यासाठी सक्षम प्रशासन इथे आहे. मात्र कुठल्याही भयाच्या अधीन राहून काम करणे ही काही कुठलीही वृत्ती कुठल्याही प्रशासकीय कर्मचारी, अधिका-याला शोभा देणारी नाही किंवा आवडणारी नाही. विशेषत: आमच्या इकडच्या महिला कर्मचारी असतील किंवा अधिकारी असतील, ताठ मानेने चांगल्या रितीने काम करताना दिसत

आहेत. ज्या वेळेला विरोधी भूमिका घ्यायची वेळ येते ती देखील कडक शब्दामध्ये घेताना त्या दिसत आहेत. आणि अशा प्रशासनाच्या वतीने त्यांचं रक्षण करणे ही माझी जबाबदारी आहे. पण हे होत असताना तस वातावरण निर्माण करणे आणि त्याच्यासाठी पोषक अशा पध्दतीने समन्वयाने सभागृह आणि प्रशासनाने काम करणे या भूमिकेचा कायम अवलंब या प्रशासनाने केलेला आहे. म्हणून मी सन्मानपुर्वक या सभागृहासमोर मी सांगू इच्छितो की अशी जर कुठलीही केस माझ्यासमोर ज्या वेळेला निदर्शनास येईल त्या त्या वेळेला त्यांच्यावरती कडक कारवाई करण्याची भूमिका माझी आहे. अजुनही मला महिला कर्मचा-यांना सांगायच आहे की जर अशी घटना घडली असेल आणि अजुनही त्यांच्या मनावर कुठलाही दबाव असेल तर कुठलाही किंतु न बाळगता माझ्यासमोर त्यांनी येऊन विश्वासाने सांगावे त्यांचे अभय तर आहेच पण जो कोणी कितीही वरीष्ठ दर्जाचा अधिकारी असेल त्याच्यावर कारवाई तात्काळ करण्यात येईल याची तीतकीच दक्षता माझ्याकडून घेण्यात येईल. मात्र कुठलीही बाब केवळ संशयाची सुई काही कारण नसताना कोणी समोर कुठलाही पुरावा देत नसताना कोणालाही व्हेलीफाय करणे हे देखील आपण टाळणं तीतकच आवश्यक आहे. अन्यथा अधिका-यांचा मोडल देखील डाऊन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा सन्मानपुर्वक मी सभागहाला हा खुलासा सादर करतो की सक्षमपणे कुठल्याही अशा प्रकारची तक्रार माझ्या समोर आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आयुक्तसाहेब आपल्या शब्दांन आपण गहीवरुन आला होतात, एकदम आपले मन भरुन आले होते. साहेब याठिकाणी सांगायचे एवढच आहे की अशी जर का एखादया नाही अनेक वृत्तपत्रामध्ये तक्रारी आल्या असतील किंवा तक्रारवजा बातमी आली असेल तर सुमोटू खुलासा त्याठिकाणी व्हायला पाहीजे होता जो की आपल्या वतीने झालेला नाही आणि त्यामुळेच आज या सभागृहातील वातावरण बदलल आणि ते करायलाच पाहिजे होते ती सुध्दा तितकीच नैतिक जबाबदारी आपली आहे. यापुढे अशा प्रकारच्या जर तक्रारी आल्या, वाढतात या तक्रारी आम्ही सुध्दा कोणाकडे गेलो तर आम्हाला सुध्दा सांगण्यात येतं आम्ही सुध्दा काही देव नाहीत. पत्रकार बंधु जे आहेत. एखादया वेळेस अस होत की एखादा विषय घडतो आणि त्याची तक्रार करण्याची हिंमत तक्रारदारामध्ये नसते. तरी त्यामुळ कोर्ट सुध्दा सुमोटू कार्यवाही करतं. पोलीस स्वत:हून गुन्हा दाखल करतात आणि तशीच जबाबदारी आपल्याकडून अपेक्षित आहे म्हणून याठिकाणी आम्ही आपल्याला कठोर भाषेत बोललो. आपण याठिकाणी पित्याच्या भूमिकेत आहात आपण जर प्रशासन सांभाळत असाल तर ते सांभाळत असताना चांगल वाईट दोन्ही सुध्दा

आपल्या पदरात येणार आहे. आपण पत्रकारांना एकीकडे जबाबदार म्हटले तरी दुसरीकडे त्यांनी छापलेली बातमी खोटी आहे. असे ठरविले जर ते खोटं असेल तर तस ही सांगायच की ती खोटी आहे. कारण का तुमच्याकडे तशी तक्रार आलेली नाही. तसा खुलासा उदया सगळया वर्तमानपत्रामध्ये होवू दयात. जेणेकरुन या वादावरती पडदा पडेल. परंतु त्याचबरोबर आपण आपल्या अधिका-यांना महिला अधिका-यांना सुध्दा तंबी देणे गरजेचे आहे. आपण या ठिकाणी त्यांची पाठराखण केली तर त्यातून काही बातम्या पेरल्या जातात हे सुध्दा मी तेवढया जबाबदारीने या सभागृहामध्ये बोलते. मी सुध्दा या सभागृहाची जबाबदार सदस्य म्हणून या ठिकाणी वक्तव्य करते. हे काही साहेब कुठल्या नगरसेवकाने फसविलेले नाही. एका महिला अधिका-याच्या सुपीक डोक्यातुन निघालेली कल्पना आहे. हे सुध्दा तितक्याच जबाबदारीने सांगते. तुम्हाला जाहीर करताना त्रास होईल. मला जाहीर करताना त्रास होणार नाही. कारण त्याची वाच्यता मी वारंवार आपल्याकडे करतेय. आपण दुर्लक्ष करताय. आज या ठिकाणी जो कोणी अधिकारी होता आता आपण सांगीतल की त्याच नावच नाही किंवा तक्रारच नाही आम्ही तर फासावर दयायला निघालो होतो. हे कस पेरल गेलं, काय पेरल गेल, आपण सुध्दा प्रशासनातले चांगले तज्ञ आहात. तुम्ही सुध्दा नवीन नाहीत साहेब. आपल्याला सुध्दा कळत काय राजकारण घडतय. आपण त्याकडे हेतुपुरस्सर डोळेझाक करताय एवढच मला याठिकाणी सांगायचय. आपण जो खुलासा केलाय तो रास्त आहे. आपण त्याठिकाणी आपल्या प्रशासनाच्या वतीने लेखी खुलासा सर्व वृत्तपत्रांना जाऊ दया. आपल्याकडे कुठली तक्रार आलेली नाही. मा. महापौर साहेब आपण एका संवेदनशील विषयाला इतका वेळ दिला. आपले मनापासून आभार मानून याठिकाणी थांबते. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.महापौर -** प्रश्नोत्तरे

**मा.नगरसचिव -** आदरनीय महापौर साहेब, आदरनीय आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. माहे मे २०१८ चे मा.महापालिका सभेत मा.राहुल तानाजी कलाटे, नगरसदस्य यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. महापौर साहेब मी नगरसदस्य म्हणून आपल्याला प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नाची उत्तरे प्रशासनाने मला जी दिली आहेत त्या बद्दल प्रशासनाचे मी आभार मानतो. आणि दोनतीन वेळा ही सभा तहकूब झाली आणि आज सभा होत आहे त्याबद्दल मी आपले देखील याठिकाणी अभिनंदन करतो, आभार मानतो. पिंपरी चिंचवड शहर वाढत असताना शहराची लोकसंख्या जवळजवळ २५ लाख इतपर्यंत पोहोचलेली आहे. इथपर्यत पोहचत असताना या शहरात गेल्या १०-१५ वर्षात ज्या गोष्टीवर हे शहर घडतय ज्या

गोष्टीवर लोकप्रतिनिधी निवडून जातात तो शहरातला अतिशय संवेदनशील विषय म्हणजे अनधिकृत बांधकाम आहे. साहेब मी आपल्याला विचारल होतं की करसंकलन विभागाकडे किती बांधकामाची नोंद आहे. तर मला त्याचे उत्तर दिले आहे की ४,७८,७८७ बांधकामांची नोंद आपल्या करसंकलन विभागाकडे झालेली आहे. त्यातील ३,१३,०८५ बांधकामे नियमित आहेत आणि जवळजवळ १,७३,४८८ बांधकामे याठिकाणी अनधिकृत आपल्या शहरात आजपर्यंत आपल्या रेकॉर्डवर आहेत. मला गावडे साहेबांना असा प्रश्न विचारायचा आहे की यामध्ये प्राधिकरणामधील बांधकामे देखील धरलेली आहेत की नाही धरलेली आहेत? तसेच या शहरामध्ये आपण पाहिले असेल तर आपल्या शहरात झोपडपट्टीमध्ये राहणारी कुटूंबे आहेत. म्हणजे अस आपण गृहीत धरतो एकीकडे १,७३,४८८ ही कुटूंब ईलीगल घरात राहतात. त्याचप्रमाणे ईलीगल झोपडपट्टी घोषीतमध्ये १८९०० आहेत ही संख्या पाहिली तर जवळ जवळ ३७८०० ही कुटूंबे देखील या शहराच्या झोपडपट्टीमध्ये राहात आहेत. म्हणजे साहेब एकीकडे आपण कायदा आणतो आणि दुसरीकडे ईलीगल बांधकाम लीगल करावे म्हणून फक्त ५६ अर्ज आपल्याकडे येतात. ही माहिती आपणच या उत्तरामध्ये लिहिली आहे. परंतु शासनाने काढलेल्या अध्यादेशाप्रमाणे किती नागरीकांनी बांधकामे नियमित करणेसाठी अर्ज केले व किती बांधकामे नियमित झाली. व ती झाली असतील तर त्याची माहिती दयावी. शासनाने काढलेल्या अध्यादेशाप्रमाणे नागरीकांनी अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी आतापर्यंत ५६ अर्ज आलेले आहेत. त्यामधील एकही बांधकाम नियमित झाले नाही. म्हणजे साहेब, एकीकडे आपण शहरामध्ये पेढे वाटतो, एकीकडे आपण होर्डीग्ज लावतो आणि दुस-या बाजूला आपल्याकडे एकही अर्ज ईलीगल बांधकाम लीगल होण्यासाठी येत नाही. कुठेतरी ही वस्तुस्थिती देखील आपल्याला संपुर्ण सभागृहासमोर आणि शहरातील संपुर्ण नागरीकांना समजली पाहिजे की जवळजवळ २,११,२८८ कुटूंबे ही या शहरात ईलीगल, अनधिकृत बांधकामे करुन राहात आहे. ही संख्या आपण जर पाहिली तर कमीतकमी १० लाख लोक आजही या शहरामध्ये ईलीगली घरात राहातात. म्हणजे एकीकडे आपण त्यांच्याकडून टॅक्स घेतोय आणि दुसरीकडे कुठलीही व्यवस्था म्हणजे विलासराव देशमुख हे आदरनीय मुख्यमंत्री असताना जी गुंठेवारीची स्कीम आली त्यांची बांधकामे लीगल झाली. त्यानंतर आजपर्यंत या राज्यात कुठलेही बांधकाम लीगल झाले नाही असं तुमच्या या आकडेवारीवरुन दिसत आहे. मला वाटत की श्रीकर परदेशी साहेब आयुक्त असताना जयश्री डांगेनी जी केस केली त्यावेळेस आपणच कोर्टामध्ये ६५ हजार बांधकामे ईलीगल आहेत असे एफीडेव्हीट महापालिकेने दिलेले आहे. आज ती संख्या जवळ जवळ पावणेदोन लाखाच्या घरात आहे. याला कोण जबाबदार? मी अजुन प्रश्न

आपल्याला विचारला होता किती जागांवर आरक्षणे आहेत त्यापैकी किती विकसित झाली आहेत. मनपाच्या ताब्यात असलेल्या आरक्षणांवर किती बांधकामे झाली आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार एकूण १११५ आरक्षणे प्रस्तावीत केलेले आहेत. सोबत गावनिहाय आरक्षणाचा तक्ता जोडला आहे. या तक्त्यात आपण म्हणताय ३९५.३९ मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र आणि मनपाच्या ताब्यात न आलेले आरक्षणाचे क्षेत्र ७७२.४० आहे. म्हणजे आपण हा डीपी डेव्हेलपमेंट करीत असताना कुठेतरी आपण असफल झालो आहोत. म्हणजे आपण निम्मे आरक्षण देखील डेव्हलप करु शकलेलो नाही या शहराचे. एकूण आरक्षण आहे ११६७.७८६ हेक्टर असताना आपण फक्त ७७२ हेक्टर क्षेत्र आज आपल्या ताब्यात न आल्यामुळे आपण डेव्हलप करु शकलो नाही. म्हणजे आपण एका बाजूला शहराच्या झालेल्या विकासाचा ढिंढोरा पीटत असतो दुस-या बाजूला ही एक वस्तुस्थिती देखील नागरीकांच्यासमोर, आणि या सभागृहासमोर येणे गरजेचे होते. आज आपण या शहरामध्ये अनधिकृत बांधकामे करीत असताना तुम्ही पोलीस यंत्रणेवर आतापर्यंत जवळजवळ अडीच कोटी एवढा खर्च केला आहे. मी प्रश्न विचारला होता, प्रस्तुत विषयास अनुसरुन कळविण्यात येते की मनपाकडील पोलीसांच्या वर डिसेंबर २०१५ ते जुलै २०१६ पर्यंत ५६,७५,१६७ व जानेवारी २०१६ ते फेब्रुवारी २०१७ पर्यंत १,९२,२३,६९२ असे एकूण २,४८,९८,८५९/- पोलीसांना आजपर्यंत अदा केलेले आहेत. तर २,०५,०००/- खर्च केलेली रक्कम अदयापपर्यंत अदा करण्यात आलेली नाही. म्हणजे साहेब ही बांधकामे करीत असताना आपण एका बाजूला कोटयावधी रुपये बांधकामे पाडण्यावर खर्च आपल्या रेकॉर्डवरती दिसतो आणि दुस-या बाजूला जी लोक तुम्हाला नियमित बांधकामे करण्यासाठी अर्ज करतात त्या एवढया मोठया प्रचंड प्रमाणात रकमा आहेत. ती लोक स्वत:च बांधकाम लिगल करुन घेऊ शकत नाहीत. म्हणजे कुठेतरी आपण प्रशासनाने त्या गोष्टीवर कंट्रोल आणायचा का नाही आणायचा. एका बाजूला आपण पंतप्रधान आवाज योजनेची घरे बांधतो आणि दुस-या बाजूला आपण या शहरातल्या एक एक्करच्या वरची बांधकामे बंद करुन टाकतो. म्हणजे कुठेतरी ईडब्ल्यूएसची घरे जी एक एक्करच्या वरती २५ टक्के कंपलसरी आहेत. दुस-या बाजूला ती घरे आपण बंद करतो दुस-या बाजूला आपण पंतप्रधान आवास योजनेवर करोडो रुपये खर्च करतो. म्हणजे पालिकेच्या करोडो रुपयाच्या जागा, करोडे रुपयाचे टेंडर, शासनाचे अनुदान हे साहेब कुठेतरी सगळी विसंगती दिसते. म्हणजे आपण हे सगळ करीत असताना डेव्हलपींग साठी करतो का पॉझीटीव्ह अटीटयूड ठेवून करतो. म्हणजे आपण ईलीगल बांधकामे, आज कोर्टाचा साहेब तुम्हाला आदेश आहे आता आम्ही सत्ताधा-यावर नाही तो आपल्यावर डायरेक्ट आरोप करीत आहोत. हा पोलीसांचा रिपोर्ट आहे साहेब. मनपा निवडणूक २०१७ नंतर

वाकड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात करणेत आलेली अतिक्रमण कारवाई. हा रिपोर्ट वाकड पोलीस स्टेशननी सीपी मॅडमला सबमीट केला आहे. दि. ४/२/२०१७ अतिक्रमण कारवाई थेरगाव, गणेशनगर, राजकीय पक्षाचा प्रभाव शिवसेना, बंदोबस्त एक पोलीस पंधरा कर्मचारी. दि.१०/३/२०१७ पुनावळे ताथवडे राजकीय पक्षाचा प्रभाव शिवसेना एक पोलीस पंधरा कर्मचारी, दि.२५/३/२०१७ राहाटणी, विजयनगर, काळेवाडी, राजकीय पक्षाचा प्रभाव राष्ट्रवादी कॉग्रेस. एक पोलीस पंधरा कर्मचारी, दि. २४/३/२०१७ विजयनगर, काळेवाडी, राजकीय पक्षाचा प्रभाव राष्ट्रवादी कॉग्रेस एक पोलीस पंधरा कर्मचारी दि.३०/३/२०१७ अशी ही लीस्ट पाहिली तर म्हणजे १० टक्केच दि. ५/४/२०१७ तापकीर नगर काळेवाडी भाजपा पक्ष एक पोलीस पंधरा कर्मचारी. हे आम्ही नाही म्हणत हे तुमच्याच शासनाचे हे डिपार्टमेंट त्यांच्या शासनाच्या हेडला कळवतय. या भागात ज्या कारवाया होतात त्या कुठल्या राजकीय पक्षाच्या दबावाखाली होतात. ही वेळ का येते तुमच्या शासनाच्याच एका खात्याने दुसऱ्या खात्याला हे कळविण्यासाठी. एकाच बांधकामावर चार-चार वेळा कारवाई होते. ज्यावेळी आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना सांगत त्यावेळेस सांगतात आम्हाला आदेश आहे. तिथ समोर तुमच्या राजकीय पक्षाच्या लोकांची दुकाने आहेत ना म्हणजे तुम्हाला भारतीय जनता पार्टी, मी जबाबदारीने व्यक्त करतो तुम्ही लिस्ट दिलेल्यांवर कारवाई करता का. दहा लाख या शहरातील लोक ईलीगल बांधकामे करुन राहात आहेत ती लोक रस्त्यावर जर आली ना तर सगळयांचे धाबे दणाणतील. एका बाजूला त्यांची घरे नियमीत होत नाहीत आणि दुसऱ्या बाजुला तुम्ही कारवाई करताय. आणि या कारवाईवर कोटयावधी रुपये खर्च करताय. शासनाने काय सांगितल होत तुम्हाला कोर्टाने पण आदेश दिले होते. एक ईलीगली बांधकाम होऊ देऊ नका. तुमचे जर अधिकारी सक्षम असतील तर आणि बांधकामे होऊ दयायची नसतील तर कारवाई करणेची वेळ का येते तुमच्यावर. जेव्हा तो एक-एक, दोन-दोन मजले बांधकाम बांधतो त्यानंतर तुमच्या नोटीसा जातात. म्हणजे तुम्ही ज्यावेळेस पोलीस खात्याला कोटयावधी रुपये देतात त्यावेळेस तुमची यंत्रणा सक्षम करा ना. एक तर तुम्ही एका बाजूला बांधकाम परमिशन देता. दुसऱ्या बाजूला कोर्टही आदेश देत असते कुठेतरी याच्यात देखील साहेब सुसूत्रता आली पाहीजे. आज आपण या बांधकामांना सुविधा पुरवित असताना जे लोक लीगल घरामध्ये राहात आहेत त्यांच्यावर आपण अन्याय करीत आहोत. मी तुम्हांला काल फोन केलेला होता. त्यांच्याकडून तुम्ही एनओशा बंद केलेल्या आहेत. का तर आम्ही तुम्हाला पाणी देऊ शकत नाही. एका बाजूला तुम्ही म्हणता पाऊस पडला पाहीजे. साहेब टँकरने पाणीपुरवठा होतो. जमिनीतला साठा कमी होतो ना त्यानंतर टँकरने पाणीपुरवठा केला जातो. त्यावेळेस तुम्ही म्हणता की तुमच्या भागात पाणी कमी नाही. आज मी ज्या

भागाचे प्रतिनिधीत्व करतो तिथं १४ एमएलडीची गरज असताना तुम्ही १० एमएलडी पाणी देता. आतापर्यंत तुम्ही म्हणत होता, पाऊस उशिरा झाला म्हणून तुम्ही बांधकाम बंद करताय. आता तुम्ही म्हणताय की तुमचं वॉटर डिपार्टमेंटचे लाईन्स एका बाजुला आहे म्हणून तुम्ही पाणी बंद करताय. म्हणजे कुठेतरी तुम्हाला आत्मपरीक्षण कराव लागेल. एका बाजूला तुम्ही लीगल बांधकामाची परवानगी बंद करता आणि दुस-या बाजूला तुम्ही अनधिकृत बांधकामे पाडता कुठ जायच नागरीकांनी. तुम्हाला कुठेतरी एका डिसीजनवर थांबावे लागेल. आणि आज आम्ही जबाबदारीने सांगतो की या शहरात ईलीगल बांधकामांच्या कारवाया बंद करा आम्ही त्यांच्या बरोबर आहोत पण नवीन एकपण बांधकाम होऊ देऊ नका. आज तुमचे जर आकडे पाहिले तर कुठेतरी आम्हाला वाटल होत की दीडदोन वर्षात फरक पडेल. पण याच्यामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली. आता हे तुम्हीच दिलेले आकडे आहेत आम्ही कुठून घेतलेले नाहीत हे आकडे. म्हणजे एका बाजूला तुम्ही शहर विकासाचा दिंडोरा पिटतोय. एक चांगल क्लीन शहर तुमच्यासमोर आल होत. तुम्हाला फक्त डायरेक्शन दयायच होत. पण आज ही तुमचे अधिकारी आणि तुम्ही ठेकेदारांच्या मागे दिवसभर फाईल घेऊन फिरत असता. माझी आरोग्याची फाईल मला कन्सलटंट नेमायचा आहे. जो कोणी याठिकाणी लोकप्रतिनिधी चांगल्या पदावर येतो तो दिवसभर या फाईलींच्या मागे फिरतो. का वेळ येती ही या शहरावर. मागच्या वर्षी स्टँडीगला तीन हजार कोटीच रेकॉर्ड झाल आता कदाचित त्याच्याही पुढे होईल. ही वेळच नाही आली पाहिजे एवढे अधिकारी सक्षम पाहिजेत. प्रशासन सक्षम पाहिजे. लोकप्रतिंनिंधीना मला पद मिळाले आहे म्हणून मी त्या फाईल मागे फिरतो. आज आम्ही या शहरात दररोज पाहतो तुमच्याकडे सिस्टीमच नाही का. साहेब, जयश्री डांगे सारख्या लेडी ज्यावेळेस कोर्टात गेल्या त्यावेळेस या सगळया बाबी समोर आल्यात. त्यानंतर कोर्टाने देखील आपल्याला आदेश दिलेत. पण आपण ते आदेश पाळतो का. आज बिल्डींग परमिशनच्या अधिका-यांना सांगितल्यावर तो म्हणतो की आमच्या इथ पण डिपार्टमेंट केले आहे त्यामुळे आम्हाला कारवाई करायला अडचण होते. आज वाकडमध्ये स्थापत्य विभागाने पत्र दिलय की इथ शाळेचे आरक्षण आहे आम्हाला बांधकाम करता येत नाही. त्याची पण कारवाई करायला आम्हाला वेळ नाही. मी स्वत: १० वेळा त्या अधिका-यांना सांगितले की साहेब तिथं शाळा बांधायची आहे त्याच्यावर कार्यवाही करा. कुठल्यातरी बिल्डरने ती ऑलरेडी ताब्यात दिली आहे. कपांऊड वॉलचे टेंडर झाले आहे. आणि तो ठेकेदार कपांऊड वॉलचे काम करु शकत नाही. का तर तिथे ईलीगल बांधकाम बांधलेलं आहे. तुमच्या डिपार्टमेंटने तुमच्या डिपार्टमेंटला कळवून पण तुम्ही कार्यवाही करीत नाहीत. मग तुम्ही या सगळया कारवाया केल्यात त्याचे हे रेकॉर्ड आहे मग तुम्ही कोणाच्या

सांगण्यावरुन करता. आज २,११,२८८ कुटूंबे ही ईलीगली घरात राहतात. ३६ हजार कुटूंबे आज झोपडपट्टीमध्ये राहतात. त्याचा तुम्ही कुठे तरी पंतप्रधान आवास योजनेत समावेश केला का नाही केला. ४० हजार कुटूंब झोपडपट्टीत तुमच्या रेकॉर्डप्रमाणे राहतात. १,७३००० घर अनियमीत तुमच्या रेकॉर्डप्रमाणे आहेत. आडीच लाख लोक जरी आपण पकडलेतर आणि ही जर रस्त्यावर उतरलीतर, शेवटी राज्यकर्ता मान्य करतो तो मताला. तुम्हांला दर पाच वर्षांनी लोकांच्या समोर जायच नाहीतर आम्हांला जायच आहे. त्यामुळे आम्ही तुम्हांला म्हणु शकणार नाही हे पाडा आणि ते नका पाडू. तुम्ही कुठेतरी असफल आहात हे तुमच्या कागदावरुन दिसते. एका बाजुला चिंचवडमध्ये कारवाई अतीशय जोरात आहे. मला नाही कुठल्या शहराची वाटणी करायची पण तुम्हीच वाटणी केली. इकड बांधकाम बंद, तीकड बांधकाम चालू. आज तुम्ही चिंचवडमध्ये कारवाई करत असताना आम्ही म्हणणार नाहीत तुम्हांला इथ कारवाई करा. तुम्ही तीन्ही मतदारसंघाची करा. एकसारखी कारवाई संपुर्ण शहरावर का होत नाही. एका बाजुला तुम्ही शहर वाटून घेता दुसऱ्या बाजुला तुम्ही एका मतदारसंघाच बांधकाम बंद करता हा सुध्दा शहरातील जनतेवर अन्याय आहे. या शहरात राहणारा नागरीक हा पिंपरी चिंचवड शहरात राहतो. तो चिंचवड मधल्या मतदार संघात नाही राहत किंवा भोसरी मधल्या मतदारसंघात नाही राहत किंवा तो पिंपरी मधल्या मतदारसंघात नाही राहत तर तो या शहरामध्ये राहतो. आम्ही इथ जीबीत ठराव करु. महापालिका विकायची पण आपण त्याच्यावर काय निर्णय घेता. आपण त्याकडे कशादृष्टीने पाहताय. मी परवाच सांगीतल आहे आम्ही तुमचा आंबेडकर चौकात सत्कार करु पण निर्णय घेताना या शहरातले नागरीक आणि आज येथे १२८ नगरसेवक निवडून आले आहेत. कधी कधीतर वाटत होत आपण १२८ जण आमदार झालो की काय. आमचे आदरणीय, आमचे आदरणीय, आमचे आदरणीय. त्यांची पण जबाबदारी आहे. दहा दहा वेळा, पाटया लागलेल्या आहेत, होर्डींग्ज लागले आणि तुमच एक पण बांधकाम नियमीत नाही. आमच तुमच मी करणार नाही, लोकसभेच इलेक्शन असो, विधानसभेच असो, साहेब, याच्यावरती राजकारण होतं. याच लोकांना वर्कऑर्डर देता, त्याच लोकांवर कार्यवाया केल्या जातात, तेच लोक मतदानाला बाहेर पडतात. एका बाजुला आपण चांगली डेव्हलपमेंट करत असताना त्यांना म्हणतोय की नाही आता तुम्हांला पाणी नको. तुम्हांला आताच सगळया लाईन बदलाव्या लागतात. म्हणजे व्हिजनलेस काम याठिकाणी चालल आहे असा याठिकाणी मी आपल्यावर आरोप करतो. उदया कोर्टाचा आदेश असताना देखील या शहरात सगळ राजरोषपणे चाललं आहे. आम्ही पण सगळ पाहतो, आपण पण सगळ पाहता. आमची पण मानसीकता नाही की एखादया कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, त्याचे वडील आजारी आहेत, आई

आजारी आहे ते आमच्याकडे येतात. आम्हांला वाटत नाही कोणाला नौकरीपासून दुर कराव. पण साहेब, आपल्याकडन अशी ऍक्शन अपेक्षीत होते की काहीतरी कारवाई झाली असतीतर बाकीचे लोक सरळ झाले असते. आम्ही म्हणणार नाही कुणाला नौकरीवरुन काढा, कुणाला घरी बसवा. पण अशा पध्दतीने आपण जरब बसवायला पाहीजे होती की कुठलाही कर्मचारी भविष्यात चुकीच काम करताना दहा वेळा त्यानी विचार करायला पाहीजे की आपल्या डोक्यावर आयुक्त आहेत. तुम्ही असं पण सांगीतल आहे की कुटूंबप्रमुख म्हणून माझी जबाबदारी आहे. साहेब, दुस-या बाजुला तुम्ही शास्तीकर पुर्वलक्षी प्रभावाने लावला. शास्तीकर ईलीगल घराना लागतो त्यांनी खरतर लीगल केल पाहीजे. शास्तीकराच्या घरात राहण म्हणजे अक्षरशः भाडयाच्या घरात राहील्यासारख आहे हे शहरातल्या नागरीकाना कळालच आहे. ज्यावेळेस ते कळल त्यावेळेस वेळ निघुन गेलेली असेल. आज तुम्हीच दोन-दोन, तीन-तीन वेळेला ठराव केलेले आहेत. २०/४ ला ठराव झालेला आहे. नियमाशी विसंगीत असलेला ठराव विखंडीत होणेबाबत. मंत्रीमंडळात निर्णय होण्याच्या अगोदर जीबीला सुध्दा अधिकार होताना. दि.२०/४/२०१७ मा.महापालिका आयुक्त यांचेकडील दि.१८/४/२०१७ चे पत्र. म्हणजे आदिही ठराव केलेले आहेत आणि या वर्षीही २०/४ ला आपण पण पाठवलेला आहे.  हे पाठवत असताना तुम्ही परमीसेबल फ्लोअर स्पेस इंडेक्स, कंपौडींग चार्जेस दहा टक्केचे पाच टक्के करा म्हणता. पण हे करत असताना आमच्या भागात १० टक्के म्हणलतरी २०० रु. होतात. सेटबॅक्स येथे तुम्ही म्हणता ५० टक्केच १० टक्के करा. या क्रायटेरीयामध्ये आपण करायला गेलोतर आज ५६ अर्ज आले. मला नाही वाटत पुढे अर्ज वाढतील. येथेही तुम्ही म्हणतात charges equal to 10% of the land rate in current Annual Statement of Rates subject. हे साहेब कोणी पाठवायच शासनाला. याच्यामध्ये बरेच प्रश्न आहेत अजुन, ईलीगल बांधकामावर कारवाई करताना तुम्ही क्रायटेरीया काय लावता त्याच सुध्दा उत्तर प्रशासनान दिल पाहीजे. तुम्ही हे पाठवला याला सुध्दा चार महीने झालेल आहेत. कंपौडींग चार्जेस, डेव्हलपमेंटींग चार्जेस हे प्रचंड आहे. या सगळया बाबी सभागृहा समोर आल्या पाहीजेत. जनतेनी पण सत्ताबदल केला आहे त्यांनाही अपेक्षीत आहे की हे सगळे प्रश्न सुटतील पण हे जटील होत चाललेले आहे. तुमची मानसीकता हे प्रश्न सोडवण्याची आहे का हे प्रश्न वाढवण्याची आहे हे आता जनतेसमोर पण आल पाहीजे. या दहा लाख जनतेच्या भावनेशी सगळे खेळतात. मी आज जाहीरपणे सगळयांना सांगतो की, शिवसेना पक्षाच्या वतीने पण सांगतो या शहरातील नागरीकांवर कुठलीही कारवाई करण्यास आमचा विरोध आहे. तुम्ही कोर्टाचे आदेश असताना पण या दिड वर्षात सव्वा लाख बांधकाम का वाढली याच आत्मपरिक्षण सुध्दा प्रशासनाने आणि या सगळया लोकप्रतिनीधीने केल पाहीजे.

ज्यावेळेस आपण प्लॅनिंग करतो, डेव्हलपमेंट प्लॅन प्रमाणे करतो त्यावेळेस एवढया भागाल एवढ पाणी लागेल, तेवढया भागाला तेवढ पाणी लागेल अस करतो परंतु ईलीगल बांधकाम झाल्यानंतर सर्व यंत्रणा कोल्याप्स होतात. आमच्याकडे सुध्दा सदगुरु कॉलनीत या सगळया लाइन्स बदलल्या, आता वॉटर लाईन्स सुध्दा बदलणार आहेत. आता ड्रेनेज लाईन पण बदलण्याचे काम केले. हे सगळे करदात्यांचे पैसे आहेत. हे काही कोणाच्या खीशातले पैसे नाहीत. हे सगळ गांभीर्याने घ्याव लागेल. ११ लाख लोक आणि २ लाख ११ हजार कुटूंब ईलीगल घरात राहत असतीलतर सभागृहाला, प्रशासनाला, राज्यकर्त्यांना देखील गांभीर्याने या गोष्टीकडे लक्ष दयाव लागेल. नाहीतर काय होईल विमानातून शहरातील चांगले चांगले ब्रीज दिसतात. अहमदाबाद सारख होईल. आतमध्ये गेलोतर बाहेर कुठ पडता येत. अशाप्रकारे या शहराचा भुलभूलैय्या होवू नये. आपण याकडे गांभीर्याने पहाव. कुणालातरी लीस्टवर ठेवून कोणावर कारवाई करु नका, मी अनुभवतो. कोर्टाप्रमाणे तुम्ही कारवाई करा. त्यांना तुम्ही लीगली करानां ते तुमच्या हातात आहे. तुम्ही कारवाई करताना काय क्रायटेरीया पकडता याच्यावर प्रशासनाकडून उत्तर मिळाल पाहीजे. एवढी बांधकाम का वाढली, याचे उत्तर मला दयावीत.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर २०१५ ला अनधिकृत बांधकामे नियमित झाली असे जाहीर झाले त्यानंतर त्याचा एक क्रायटेरीया ठरला की कशा पध्दतीने ही बांधकामे नियमित होतील. १०० टक्के पेढे वाटले गेले, साखर वाटली गेली त्याच्यात काहीच गैर नाही. आज आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी प्रयत्न केला. आज पिंपरी चिंचवड मधल्या बांधकामामुळे महाराष्ट्रातल्या बांधकामांना एक कायदा आला. की अनधिकृत बांधकामे नियमित होणार आहेत. आज त्या दिवसानंतर पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्या बांधकामाची नोंद २०१५ पुर्वीची आहे अशा एकाही बांधकामावरती कारवाई झालेली नाही. असच जर आपण पाहिल गेल तर जे राज्यकर्त्यांच काम होत ते त्यांनी केलेले आहे. आता याच्यानंतर आपल्या शहरामध्ये आपल्या ज्या समस्या आहेत त्या कशा सुटतीलतर त्याच्यासाठी आपल्या अधिका-यांनी शासनाला पुन्हा एकदा पत्रव्यवहार करायची गरज होती. आणि ती देखील केलेली आहे. राजन पाटील साहेबांनी बसून ते केलय. आणि त्यानंतर जो आता नवीन प्लॅन पास होतो आज तीन्ही बाजूला तुम्हांला जर शेजारच्यांची एनओसी भेटलीतर तीन्ही बाजूला मार्जीन न सोडता अर्धा गुंठा, एक गुंठयात ते प्लॅन बसवितात. हे देखील लक्षात घेतले पाहिजे. आजची ही पुढची परिस्थिती झाली. आज पिंपरी चिंचवड शहराच्या शास्तीकराच्या भांडणासाठी आमदार लक्ष्मणभाऊ जगतापांनी जो प्रयत्न केला. शास्तीकर पुर्वलक्षी माफ करण्याला आज तो

माफ झाला. त्याठिकाणी ६०० स्केवर फुटाच्या आतील बांधकामे माफ. तर आता याच्यावरती पर्याय काय तर त्यादिवशी गावडे साहेबांबरोबर चर्चा केली. त्यांना मी सांगितल की काही ठिकाणी १००० स्केवर फुटाची बांधकामे आहे तर काही ठिकाणी १५०० स्केवर फुटाची बांधकामे आहेत. त्याच्या नोंदी तशा आहेत कारण काय एक कुटूंब आहे त्याला एखादा भाऊ आहे एक मुलगा आहे. आणि तो व्यक्ती कुटूंब प्रमुख आहे. त्या कुटूंबामध्ये तीन कुटूंबे तयार झाली. त्याच्यामुळे त्या बांधकामाची नोंद १८०० ते २००० स्केअर फुट आहे. आपण महापालिकेच्या स्तरावरती त्या कुटूंब प्रमुखाना त्यांचेकडून एफीडेव्हीट लिहून घेऊन त्यांच्याकडून त्याची वाटणी करुन ६००-६०० स्केअर फुटाच्या आतील बांधकामे बसवू शकतो आणि हे गावडे साहेबांशी चर्चा करुन गावडे साहेबांनी हे अस उत्तर मला दिलयं. आणि गावडे साहेब हे तुमच्याकडच उत्तर आहे. आज पिंपरी चिंचवड शहरामधली जेवढी अनधिकृत बांधकामे आहेत गावडे साहेबांशी माझी सखोल चर्चा झाली की साहेब आपण आतापर्यंतची जेवढी बांधकामे आहेत ती अशा पध्दतीने नोंदणी चालू करु. त्यादिवशी आपल्याकडे जी ५० टक्के बांधकामे आहेत त्यांच्या नोंदीच नाहीत त्या देखील बांधकामाच्या लोक नोंदी करतील आणि त्यामुळे अस करण्याचा आपण प्रयत्न करावा. आणि हे जर करता येत नसेल तर का करता येत नाही. याचा देखील आयुक्त साहेब खुलासा दयावा. आणि हे जर करायच नसेल तर कशा पध्दतीने प्रयत्न करायचा आपण महापालिकेच्या नगरसदस्य असताना आपण सगळयांनी मिळून काय करायच. आपण फक्त एक दुस-यावरती टिकाच करायची का आज राहुलदादा आज सगळयांनी पाहिल ना. आम्ही अहमदाबादला गेलो होतो तर त्याठिकाणी शेजारचा दुसरा पक्ष असेल त्याला सारथी पक्ष म्हणायचे. त्याला विरोधी पक्ष म्हणत नव्हते. इथ फक्त आपण विरोध करण्यासाठी एकत्र आलेलो नाही.

**मा. महापौर -** विषय सोडून बोलू नका. विषयाला धरुन बोला.

**मा.अभिषेक बारणे -** आज माझी एवढीच सन्मा सदस्यांना सभागृहाला विनंती आहे की सर्व सन्मा. सदस्यांनी अधिका-यांनी सर्व सन्मा. सदस्यांना एकत्र घेऊन बसून एकदाच काय तो तोडगा काढावा आणि या विषयावरती चर्चा करावी. जोपर्यंत याचे उत्तर निघत नाही तोपर्यंत फक्त ऐकायच. आणि सोडून दयायच अस करु नका. सगळया अधिका-यांनी समोर बसा. तर आम्हाला अजून अज्ञान असेल तर अधिका-यांनी सांगावे की अशी पाठपुराव्याची गरज आहे. राज्यकर्ते त्यांच्या लेव्हलला त्यांच्या पध्दतीने पाठपुरावा करतात. आपण देखील या महापालिकेचे नगरसदस्य यानात्याने सर्वांनी मिळून या गोष्टीची सखोल चर्चा करुन याच्यावरती उत्तर शोधले पाहिजे हीच विनंती करतो आणि थांबतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. या ठिकाणी राहुल कलाटे यांनी अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात प्रश्न विचारले होते. आणि त्याचे उत्तर प्रशासनाने याठिकाणी आपल्याला दिले आहे. आयुक्त साहेब मुळात ही आकडेवारी देत असताना हयाच्या पेक्षा अधिक जी घरे आपल्या शहरामध्ये अनधिकृत आहेत परंतु त्यांची नोंद नाही. ही जी संख्या आहे ती मुळात चुकीची आहे. गावडेसाहेब आपल्यालाही हे मान्य असेल की पिंपरी चिंचवड शहरात याच्यापेक्षाही जास्त घरे झाली आहेत. परंतु आपल्याकडे त्यांची नोंद करु शकलेलो नाहीत आणि राहुल कलाटे यांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला आहे ती लोक या अनधिकृत घरामध्ये राहतात. ती संख्या खूप जास्त आहे. आणि कुठलेही प्रशासन आले, आणि कुठलेही राज्यकर्ते आले याच्यावरती कार्यवाही होऊ शकत नाही जरी कोर्टाचे आदेश असेल तरी तेवढी सक्षम यंत्रणा प्रशासनाकडे नाही. आणि राज्यकर्त्यांची तशी मानसिकता नाही. आमच्या पक्षाची सत्ता होती काय आणि आता भाजपाची सत्ता आली. प्रत्येकाची इच्छा आहे की या शहरातला जो गरीब वर्ग आहे जो अनधिकृत बांधकामामध्ये राहतो. त्याच घर वाचल पाहिजे त्याला अभय मिळाले पाहिजे. त्याच घर अधिकृत झाल पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा आमच्या प्रत्येक नगरसेवकांची आहे. आणि सगळेच नगरसेवक म्हणून जेव्हा निवडून येतात तेव्हा त्याच्या आधी विधानसभा असतील, लोकसभा असतील. त्या प्रत्येक निवडणुकीमध्ये प्रत्येक पक्षाने या विषयावरती लोकांना आश्वासन दिल की आम्ही बांधकाम अधिकृत करु. सगळयांचीच मनापासून इच्छा आहे. म्हणजे आता अभिषेक बारणेनी काही गोष्टीचा उल्लेख केला तुमचे नेते मागच्यावेळेस आमच्या पक्षात होते त्यांनी त्यावेळेस सुध्दा प्रयत्न केला होता. आमच्याही पक्षाच्या नेत्यानी त्यावेळेस प्रयत्न केला होता परंतु मुळात अडचणीचा मुद्दा असा आहे की ही घरे अधिकृत आहे. आयुक्त साहेब आपल्याला या गोष्टीची चांगली कल्पना आहे. कुठल्याही शासनाला निर्णय घेत असताना जेव्हा अनधिकृत बांधकाम अधिकृत करायच. याच्यासाठी जी काय नियमावली अधिकृत घरासाठी आहे ती नियमावली डोळयासमोर ठेवून ही अनधिकृत घरे अधिकृत करावी लागतात. आणि ते करीत असताना आज परिस्थिती अशी निर्माण झाली. कोर्टाने सुध्दा शासनाला फटकारले की तुम्ही अशा चुकीच्या पध्दतीने घरे अधिकृत करु शकत नाही. त्याच्यामुळे जी काही नियमावली आहे त्या नियमावलीला अधीन राहून अनधिकृत बांधकामे त्याठिकाणी तुम्हाला अधिकृत करावे लागतील. अशा प्रकारच्या सुचना त्यावेळेस कोर्टाने शासनाला दिल्या. आणि त्यानंतर शासनाने जो निर्णय घेतला त्या निर्णयानंतर एकही बांधकाम अधिकृत झाले नाही. त्याच कारण अस की मुळात जो शास्तीकर भरायचा आहे त्याबाबत मागच्या वेळेस या संदर्भात मा.आयुक्त साहेब आपल्या समवेत मिटींग केली होती त्यावेळेस दादांनी

तुम्हाला विचारल होत की मागच्या काळामध्ये शास्तीकर नंतर घ्यायचो मुळ टॅक्स आधि घ्यायचो अशा प्रकारची तुम्हाला विचारणा केल्यानंतर तुम्ही खुलासा केला की कायदयामुळे मला तस करता येत नाही. परंतु मागच्या काळामध्ये आपण अशा पध्दतीने गावडे साहेब आपल्या आधीचे जे कोणी आयुक्त अधिकारी होते त्यांनी पहिला मुळ टॅक्स घेतला. आणि शास्तीकर बाजूला ठेवला होता. अशा प्रकारचे धोरण त्यावेळेस होत त्यामुळे टॅक्स पण जमा होत होता. शास्तीकर बाजूला राहत होता. परंतु तुम्ही आल्यानंतर हा निर्णय बदलला. आणि आज जी काही बांधकामे नियमित होत नाहीत. त्याच्यामागचे मुळ कारण अस आहे की शास्तीकर भरावा लागतोय. आता अभिषेक बारणेनी उल्लेख केला तेव्हा मागे आम्हीही होर्डींग पाहीले त्याठिकाणी पेढे वाटले आम्हांलाही आनंद झाला की शास्तीकर माफ झाला अशा पध्दतीचा निर्णय झाला असेलतर निश्चितपणे आम्ही या सरकारच मनापासून अभिनंदन करु. परंतु प्रत्यक्षात आपल्याला ज्यावेळेस जीआर येईल. मी गावडे साहेबांना त्यावेळेस दोनतीन वेळेला फोन केला होता की गावडे साहेब खर सांगा की अजुन तुमच्याकडे काही जीआर आला आहे का तेव्हा त्यांनी सांगितले की अजुन तरी आमच्याकडे जीआर आला नाही. त्यामुळे अजुनही त्या प्रकारची कार्यवाही आमच्याकडून करता येणार नाही. त्यामुळे सगळयांना शास्तीकर हा भरावा लागणार आहे. अशा प्रकारचे त्यांनी मला सांगितल तरी माझी आपल्या सगळयांना विनंती आहे की आपण आपल्या पक्षाच्या वतीने प्रयत्न करावा. म्हणजे अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्याच्या संदर्भात आता अभिषेक बारणे म्हणाले की कुठल्यातरी ठिकाणी ते सारथी पक्ष म्हणतात आम्ही जरी विरोधी पक्षात असलो तरी आम्ही तुम्हाला सहकार्याची भावना कायम ठेवणार आहे. विरोधाला विरोध आमचा कधीच राहणार नाही. अशा प्रकारच्या चांगल्या गोष्टींना आमचा सपोर्ट राहील याठिकाणी या शहरातल्या एवढया मोठया संख्येच्या नागरीकांना जर दिलासा मिळणार असेल तर १०० टक्के आम्ही तुमच्याबरोबर आहोत पण तुम्ही ते करा. मागच्या दिड वर्षाच्या काळामध्ये खूप होर्डींग्ज लागतात, परंतु कुठल्याही निर्णयाची अंमलबजावणी त्याठिकाणी होत नाही किंवा त्याचे रिझल्ट मिळत नाहीत ही अत्यंत दुर्देवाची बाब आहे. त्यामुळे  आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे.  आपण ख-या अर्थाने या शहराचे प्रमुख आहात आपल्यावर या शहराची जबाबदारी आहे. आपल्याला चांगल माहिती आहे की या शहरामध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे आजपण होत आहेत. मग तुम्ही चिंचवड मतदार संघामध्ये कारवाई करण्याचा प्रयत्न केला त्याठिकाणी तुम्हाला अनुभव आला. कारवाई करणे इतके सोपे नाही. कारण त्याठिकाणी नागरीक एवढया मोठया संख्येने त्याठिकाणी राहतात. त्यामुळे प्रशासनाला कारवाई करणे शक्य नाही. त्याच्यामुळे हा प्रश्न कधीच सुटणार

नाही. आम्ही यापुर्वी मागणी केली होती की गुंठेवारीचा कायदा झाला. आयुक्त साहेब त्या वेळेस गुंठेवारीच्या कायदयाप्रमाणे सगळी घरे नियमित झाली होती. त्याठिकाणी मार्कींगचा, कुठलेही विषय नव्हते परंतु नंतरच्या काळामध्ये हा कायदा करत असताना तशाप्रकारचे निर्णय होणे अपेक्षित होते परंतु न झाल्यामुळे आताही ही घर अधिकृत होत नाहीत आणि भविष्यातही कदाचित होणार नाहीत. जर अशाच पध्दतीचा आपण कायदा केला, मुळात तुम्हाला डीसी रुलमध्ये चेंजेस करावे लागतील. कारण पुर्वीची बांधकामे झालेली आहेत त्यांना पुर्वीचे परमीशन दिलेले आहे. अधिकृत घर बांधायला त्यांना जी परमिशन देताय त्यांना जे काही नियम लावताय तेच नियम हयांना लावणेची अपेक्षा कायदयाप्रमाणे आहे. परंतु हेच होत नाही. त्यामुळे तुम्हाला डीसी रुलमध्येच काही चेंजेस करावे लागणार आहेत. बिल्डींग परमिशन विभागाने खुलासा केला. पठाण साहेब होते मागच्या कालावधीमध्ये. आता राजन पाटील साहेब आहेत त्यांनी सकारात्मक याठिकाणी भूमिका घेऊन आपल्या नागरीकांना प्लॅन पास करण्यासंदर्भात काही रिलॅक्शेशन संबंधी शासनाकडे पाठविले पेपरला ही तशा प्रकारच्या बातमी आली होती. परंतु मुळात जो काही नियम आला त्यांच्यामध्ये कमीत कमी सहा मीटरचा रस्ता त्या घरापुढे पाहिजे. आपल्या शहरातील जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यांना तेवढा रस्ता नाही त्याच्या मुळे जो काय जास्तीचा एफएसआय वापरला आहे तो नियमित होवू शकत नाही त्यामुळे शहरातले एकही बांधकाम आज अधिकृत होऊ शकलेले नाही. त्यामुळे आयुक्त साहेब माझी आपणाला विनंती आहे प्रशासन म्हणून तुम्ही आम्ही महापालिकेच्या सभागृहामध्ये भाषण करतो. याठिकाणी सभागृहाने ही काही कायदे केले मागच्या सभागृहाच्या मिटींगमध्ये एकनाथराव तुम्ही शास्तीकराच्या संदर्भात निर्णय घेतला होता. त्यावेळेस आम्ही तुम्हाला सांगत होतो की तुम्ही ६००, १००० चा जो स्लॅब पाडला तो पाडू नका. आता अभिषेक बारणेंनी गावडे साहेबांना माहिती विचारली त्याच्यामध्ये त्यांनी आयडीया सांगितली. परंतु अभिषेक यांनी अशा प्रकारची माहिती सभागृहामध्ये सांगून तो पण मार्ग तुम्ही बंद केला. हा एक चांगला मार्ग होता. परंतु मला नाही वाटत आता प्रशासन अशा प्रकारची मदत करु शकेल. त्याच्यामुळे उदयाच्या काळामध्ये बांधकामे नियमित करण्यासाठी आपल्याला कायदयामध्ये आयुक्त साहेब बदल करावा लागेल. आणि मुळात एका बाजूला शासन प्रयत्न करते की गरीब माणसांना घरे दयायची पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून किंवा स्वस्त घरकुलाच्या माध्यमातून घरे देण्याचे प्रयत्न केले आहेत. एसआरएच्या माध्यमातून झोपडपट्टीवासियांना देखील घरे देण्याचा शासनाचा प्रयत्न होता. त्याच्या मागची भूमिका अशी होती की आपल्या शहरातल्या प्रत्येक माणसाला एक स्वत:चे घर मिळाले पाहिजे. आणि ते अधिकृत असले पाहिजे अशा प्रकारची शासनाची अपेक्षा

आहे. मागच्या शासनाची पण तीच होती परंतु या शासनाने पण केले आहे. परंतु हे करीत असताना एका बाजूला आपण अशा प्रकारची मदत करण्याची भूमिका घेतो. परंतु दुस-या बाजूला ही काही बांधकामे आहेत यांच्यावर कार्यवाही करण्याची भूमिका घेतली हा विरोधाभास आहे आणि हे कुठेतरी थांबले पाहिजे. महत्वाचा मुद्दा गेले काही दिवसांपासून शहरामध्ये जो गाजतोय तो म्हणजे चिंचवड मतदार संघामधील काही गावांना पाणी बंद करण्याचा निर्णय मा. स्थायी समितीने घेतला आहे. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केली की नाही मला माहीत नाही. परंतु हा निर्णय का घ्यावा लागतोय. आज आम्ही माहिती घेतली की पवना धरणामध्ये पाणी आहे. आणि पवनामध्ये पाणी असताना असे निर्णय घेणे आयुक्त साहेब चुकीचे आहे. आणि घ्यायचा होता तर पुर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी हा निर्णय घ्यायला पाहिजे होता. तस न करता ठराविक ठिकाणी ठराविक कामामध्ये अशा प्रकारचे निर्णय आपण घेतला ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. दुसरी गोष्ट एका बाजूला आपण अशी भूमिका घेतो अधिकृत बांधकामांना परवानगी थांबवितो पण दुस-या बाजूला अनधिकृत बांधकाम होत असताना कुठल्याही प्रकारचा अंकुश त्याठिकाणी प्रशासनाचा नाही. अनअथॉराईज कनेक्शनस मोठया प्रमाणात याठिकाणी शहरामध्ये आहेत. अनेक वेळा मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. की आपल्या इथल्या मेन लाईनवरुन सुध्दा कनेक्शन्स लोकांनी मारलेली आहेत. त्याच्यामुळे मोठया प्रमाणात म्हणजे आपल्याकडे पाण्याचा जो समतोल राहिला पाहिजे तो समतोल नाही. काही ठिकाणी १५०, २०० लीटर प्रती पाणी घरांना मिळत आहे. परंतु आपल्या इथ काही ठिकाणी ५०, १०० च्या आत पाणी मिळते अशा प्रकारची परिस्थिती विशेषत: ग्रामीण परिसर आहे आपल्या पिंपरी चिंचवड शहरातला. मग तो चिखली पासून, तळवडेपासून दिघीपर्यंत या परिसरामध्ये मोठया प्रमाणात पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे आयुक्त साहेब अशा प्रकारचा निर्णय होऊ नये अशा प्रकारची अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. मी या सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. परंतु प्रश्न विचारण्याची परंपरा यासाठी असते की आपल्या प्रभागाच्या कामाव्यतिरिक्त या शहराचे वास्तवदर्शन नेमके काय आहे. कोणत्या गोष्टीसाठी प्रशासन उदासीन असताना काय घटना या शहरामध्ये घडत असतात. आणि अनधिकृत बांधकामांचा विषय तर एवढा ज्वलंत आहे की यावर अनेकांच्या राजकीय पोळया भाजल्या गेल्या. यातून अनेक राजकरण घडत गेले. काहींचा कार्यक्रम झाला, काहींचा कार्यक्रम झाला नाही. अजुनही एक वर्षे राहीले असल्या कारणाने राहुल कलाटेंनी व्यवस्थित संधी साधून योग्य प्रश्न विचारला. आणि ख-या अर्थाने जो ज्वलंत प्रश्न आहे जे विदारक चित्र आपल्यासमोर आहे ते सगळ

सभागृहाला पाहीला मिळाल. खर तर कोणत कुटूंब किती वाढवांव. तो त्या त्या कुंटूंब प्रमुखाला त्याचा अधिकार असावा, तो महानगरपालिकेने घेऊ नका. नाही तर काय होईल की ६०० स्के.फूट आहे. त्यांची जर अजुन इच्छा असेल जर अजुन दोन अपत्य त्याला व्हावी तर तो अधिकार आपण कशाला घ्यायचाय. कायदेशीर कारवाई आपण काही करु नका. जे नियम आहेत. नियमाप्रमाणे चाललो आहे त्यावर लक्ष दया. मला एकच दुर्देवी घटना वाटते आयुक्त साहेब. आम्ही प्रश्न विचारतो या प्रश्नने संपुर्ण शहराचे विदारक चित्र आमच्या सभागृहाच्या समोर येते. तो प्रश्नोत्तरोचा तास संपतो. मुळ विषयाला सुरवात झाल्यानंतर या प्रश्नाच प्रशासनाने काय नियोजन केले आहे तुमच्यासमोर काही उद्दिष्ट आहेत की नाहीत. मी उदाहरण सांगतो की एकरमध्ये १०० घरे होण्याची क्षमता असेल तर त्यानुसार ती पाणीपुरवठा योजना असते त्यानुसार ड्रेनेज योजना असते त्याठिकाणी संपुर्ण मैलाशुध्दीकरण योजना असते आणि त्याच ठिकाणी त्या १०० घरांवर एक एकरमध्ये ५०० जर घरे झाली तर त्याचा दुष्परिणाम परिणाम या शहरातल्या सर्व करदात्यांना भोगावा लागतो. आणि मग एकाच पावसात संपुर्ण शहर जलमय होऊन विस्कळीत होते. त्या परिणामास आम्ही नगरसेवक जबाबदार नाही. प्रशासन जबाबदार आहे. दोन हजार पंधरा कोटीची घरे तुम्ही सांगताय. आणि एक लाख, दिड लाख घरे परत होतात. आज जर कोण प्रशासन उठून आयुक्त उठून जर सांगत असतील या शहरामध्ये एकही अधिकृत बांधकाम चालू नाही. तरी आम्ही यापुढे असले फालतू प्रश्न तुम्हाला विचारणार देखील नाहीत. सरासपणे कामे चालू आहेत. परत या नोंदीमध्ये राहुल कलाटे प्राधिकरण हद्दीमधील घरांचा उल्लेख नाही. एमआयडीसी हद्दीतील घरांचा बांधकामांचा उल्लेख नाही. काही ठिकाणी मी प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी सांगितल की ती कायर्वाही आमची नाही. टॅक्स तुम्ही घेताय. विकासाची कामे आपण करतो. आणि कारवाईच्या बाबतीत प्राधिकरणाने प्राधिकरणाच्या हद्दीतील कारवाई करायची. आजही त्या हद्दीत कामे चालू आहेत. हे सगळ करीत असताना हा करदात्याचा पैसा विस्कळीत होऊन दिशाहीन होतो. मी मागे पाणीपुरवठयावर प्रश्न विचारला होता. ८०-९० कोटी रुपये आपले जातात. २०१५ च्या पुर्वीच्या घरांना जर अभय देणार असाल, हे जर प्रलंबित प्रश्न असेल त्यानंतर घरे झालीच नाहीत का मग तो खर्च कुठल्या तिजोरीमध्ये जातोय. आज वर्गीकरणाचे हयाचे त्याचे विषय तुम्ही ज्या ठिकाणी कामे चाललेली आहेत त्या कामावंर लक्ष केंद्रीत करुन प्रशासन फक्त त्यांचा पाठपुरावा करत. ३५०-४०० कोटी रुपयांची वसुली बाकी आहे. नाही लक्ष दिले. अनधिकृत बांधकामे सर्रासपणे चालू आहेत. नाही लक्ष आणि अशा पध्दतीने जर तुम्ही कामे करीत राहीलात तर काय आम्ही प्रश्न विचारणारच आहोत. उदयाच्या वर्तमानपत्रामध्ये आम्ही प्रश्न विचारला म्हणून आमची

नावे येतील. मग याचे परिणाम संपुर्ण २५ लाख जनतेला भोगावे लागत आहेत. हयाच्यावर काय नियोजन आहे तुमचं काहीही नियोजन नाही. आणि हे प्रश्न विचारुन काय केले काही केले नाही. पाणीपुरवठयावर प्रश्न विचारुन आज सहा महिने झाले. त्यावर आज पर्यंत मला एक पत्रही आम्हाला दिलेले नाही. की तुम्ही जे मार्ग सुचविलेले आहेत. त्या मार्गावर आम्ही ही क्रीया केली आहे ही प्रतिक्रीया केलेली आहे. त्यानुसार एवढे पैसे आमचे वाचलेले आहेत. असे एकही पत्र आलेले नाही. त्याच गांभीर्य नाही, निविदा निघाल्या पाहिजेत. कामे नवीन दिलीत किंवा कुठली आनंददायी घटना घडलेली नाही. असे काही तरी कृत्य प्रशासनाने केले तर या सर्व गोष्टीला मूठमाती देण्याचे काम प्रशासनातून चालू आहे. काहीही उपाययोजना साहेब चालू नाहीत. मला यावर खरतर मी अधिकृतरीत्या पक्षनेते यांना विनंती करतो की हा विषय जो दीड लाख, दोन लाख घरांच्या संदर्भातील आहे की नाही पाणीपुरवठा त्यांना होत आहे. पाणीपट्टी वसुल होत आहे की नाही. हा अधिकृतरित्या विषय समितीच्या माध्यमातून आला पाहिजे. संपुर्ण सभागृहाला हे चित्र समोर एकदा येऊ दया या ठिकाणी राहुलदादा यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारलेला आहे. परंतु त्याचे गांभीर्य भविष्यामध्ये कोणत्या पध्दतीने राहणार आहे. या परिस्थितीमध्ये मागच्या वर्षी किती टक्के साठा पवना धरणामध्ये होता. अस काय झाल की पटकन तुम्हाला बांधकाम परवानगी बंद करावी लागली. सर्व शहरामध्ये करा ना. याठिकाणी या सगळया परिस्थितीमध्ये मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब आपण आमचे पिठसीन अधिकारी आहात आपण या परिस्थितीचे गांभीर्य सुध्दा घ्या. पुढचा बदल कधी होईल, काय होईल तो भाग सोडून दया. पण हया ठिकाणी तुमच्या हातामध्ये काय आहे आणि जाताना आपण काय केले. याच एक तरी आनंदायी घटना तुमच्या आयुष्यामध्ये निर्माण करा की मी हे आदेश दिले. हे पैसे वसुल केले. ३५०-४०० कोटीची वसुली आहे. कोणी लक्ष देत नाही. ६०० स्के. फूट झाले. अभिषेकने सांगितल्याप्रमाणे. त्यालाही एक अपत्य झाल्यानंतर त्याने हळूहळू २०० स्के.फूट वाढविले. हया २०० स्के. फुटाची नोंद नाही या ६०० स्के. फुटामध्ये, हे कोणाचे नुकसान होत आहे. याच गांभीर्य याठिकाणी आपण घेणे अत्यंत आवश्यक आहे. हया विषयावर किती जरी बोललो तरी तो विषय आपण अशाच पध्दतीने ठेवणार आहात. परंतु राहुल कलाटे यांना माझी विनंती आहे की हे प्रश्न विचारल्या नंतर या प्रश्नचे परत एकदा आपण वर्गीकरण करुन परत पुढच्या सभेत विचारु. यावर वारंवार हा प्रश्न विचारुन यावर हयांच काय उत्तर येत प्रशासनाचे. नाहीतर प्रशासनाचे काय निविदा प्रक्रिया चालू आहे, कार्यवाही चालू आहे. या सगळया आनंददायी घटना त्यांच्या दृष्टीकोणातून चाललेल्या असतात. आयुक्त ऐकत असतात. काम करत असतात परंतु हे विदारक चित्र आपल्यासमोर आहे. याची वसुली

कोण करणार. आणि करदात्यांचा पैसा आहे. महापौरांना आपण अनेक वर्ष रहाव अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करीत असताना जर आपला कालखंड बदलला तर एक चांगल काम आपल्या हातून घडावं अशी मी मागणी करतो.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर राहुल कलाटे यांनी हा चांगला विषय आणला आहे. पण या विषयातून मला राहुल दादांची भूमिका समजलेली नाही. एकीकडे चिंचवड मतदार संघामध्येच कारवाई झाली अस त्यांनी सांगीतल. तसेच त्यांनी जो उल्लेख केला तो वाकड पोलीस स्टेशनचा उल्लेख केला आहे. त्यांनी सांगितले की तिथे शिवसेनेचे नगरसेवक आहेत, कार्यालय आहे त्याचठिकाणी कार्यवाही केली. खरतर वाकड पोलीस स्टेशन हा एरिया काळेवाडी, थेरगाव, रहाटणीतील आमचा काही भाग, रावेत, पुनावळे आणि वाकड असा आहे. या ठिकाणी प्रशासन आहे, मा. आयुक्त आहेत. की कुणाला डोळयासमोर ठेवून भारतीय जनता पार्टीने ही कारवाई करण्याचे आदेश देत नाही. या शहरातील जडणघडण होत असताना येथील इंफ्रास्ट्रक्चर डेव्हेपमेंट चांगले झाले आहे. सुनियोजीत जर शहर आपल्याला करायच असेलतर त्या शहरातील अनधिकृत बांधकामे हा जो आकडा दिला आहे तो त्याच्या डबलही असेल. आयुक्त साहेब आम्ही वारंवार तुम्हाला प्रशासनाला सांगितल की साहेब कारवाई करा. काही ठिकाणी कारवाईला तुमचे लोक गेले त्याठिकाणी शिवसेनेचे योगेश बाबर आले होते त्याठिकाणी तुम्ही कारवाई थांबविली. मला कळल नाही की बारा मीटर रोडचा प्रश्न आहे. गेली सात ते आठ वर्षापासून मी त्या भागामध्ये आहे त्या लोकांना आम्ही मोबदला दयायला तयार आहे. डबल पैसे दयायला तयार आहे. तर काही ठिकाणी भारतीय जनता पार्टी जर विकास करीत असेल तर किंवा कुठलाही पक्ष विकास करत असेल तर विरोध करायच काही कारण नाही. राहुल कलाटेची एक भूमिका मला कळली नाही की चिंचवड मतदार संघामध्ये बांधकामे करणेसाठी स्थायी समितीमध्ये हा ठराव करणेत आला. खरतर हा ठराव फक्त ४ महिन्यांपुर्वी करायच चाललय. साहेब पिंपळे सौदागरच्या परिसरामध्ये पिंपळे गुरव, पिंपळे निलख याठिकाणची पाण्याची परिस्थिती पाहिली तर तिथले लोक सांगतात की आपण दररोज किती ५०३ एमएलडी पाणी उचलतो. आणि शहराला गरज आहे ४००- ४५० एमएलडीची. तर साहेब जर तुम्ही सांगा माझ्या माहितीप्रमाणे आता तांबे साहेब आहेत यापुर्वी दुधेकर साहेब होते. फक्त ४० टक्के पाणी चिंचवड या भागामध्ये आहे. १०० टक्के जर पाणी लागत असेल तर तिथे फक्त ४० टक्के पाणी मिळते. अशा परिस्थितीमध्ये जे नागरीक तिथे रहिवासी आहेत. अशा नागरीकांना पिण्याचे पाणी प्राधान्याने देण्यात येत आहे. नवीन होणारी बांधकामे म्हणजे पिंपळे सौदागरमध्ये पाहिले तर वर्षाला दिड ते दोन हजार फ्लॅट होत आहेत. इंफ्रास्ट्रक्चर

डेव्हलपमेंट लॅण्ड ऍक्वीझेशन करीत असताना खूप काही अडचणी आल्यात. मी तर वारंवार प्रशासनाला सांगत होतो बांधकाम परवानगीच्या कामकाजाला आम्ही कधीच विरोध करणार नाहीत. राहुल कलाटेनी जर परिस्थिती पाहिली असती तर सगळयात जास्त कारवाई सांगवी पोलीस स्टेशन भागामध्ये झाली आहे पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, रहाटणीचा काही भाग, पिंपळे निलख येथे वारंवार कारवाया चालू आहेत. हयाच्या अगोदर जी बांधकामे झालीत ती बांधकामे साहेब अधिकृत करणेचा आपण प्रयत्न करीत नाहीत. शास्तीकर किती कमी करता येईल. तुम्हाला त्याच्यातील माहिती आहे. पण याच्यातून काय होतय की वारंवार आपल्यावरती आरोप होत आहे. हे सगळ करीत असताना एकटयानेच शहराची जबाबदारी घेतली आहे असे काही नाही. प्रशासनाने देखील जबाबदारी घेतली पाहिजे. या शहरामध्ये अनधिकृत बांधकामे होत असताना आपले ही त्याठिकाणी लक्ष पाहिजे. आपले शहर सुनियोजित असले पाहिजे. स्मार्ट सिटी ही स्मार्ट सिटी म्हणताय पण अजूनही काही स्मार्ट सिटी झालेलो नाही. काही भागामध्ये हीच परिस्थिती ओढावलेली आहे. जर आपण ईलीगल बांधकामांवरती कंट्रोल आणले नाहीतर या शहराची वाट लागेल. आज इथ १२८ नगरसदस्य बसलेले आहेत. ते १०० टक्के यातून वाचणार नाहीत. ०५ स्वीकृत सदस्य पण आहेत. पण ते काही बोलत नाहीत. साहेब या शहराचे राहुल कलाटे यांनी सांगितले ज्यावेळेस आम्ही १२८ जण नगरसदस्य म्हणून या सभागृहामध्ये आलो. राहुल कलाटेनी सांगितले की आमदार झाल्यासारखे वाटले. अहो, मी त्यांना सांगतो की खरोखर तुम्ही या महानगरपालिकेचे विश्वस्त आहात. साहेब मी कुठल्या पक्षाच्या बाजूने बोलत नाही पण या शहराचा विचार आपल्याला करावयाचा आहे. ही वस्तुस्थिती आहे साहेब. चिंचवड मतदार संघाची वस्तुस्थिती आहे साहेब. मी तुम्हालाही वारंवार सांगितले आहे. पाणीपुरवठयाचा चार्ज आता पठाण साहेब यांचेकडे दिला आहे. पिंपळे सौदागर मध्ये नजीकच्या काळामध्ये तुषार कामठे यांनी एक मिटींग घेतली होती. सर्वात जास्त तक्रारी कुठल्या तर पाणीपुरवठयाच्या आहेत. तुषार कामठे शेजारी बसलेत त्यांनाही विचारा. हीच परिस्थिती पिंपरी चिंचवड शहरामध्ये ब-याच ठिकाणी आहे. म्हणजे आम्ही जो मा. स्थायी समितीने निर्णय घेतला आहे तो बरोबर आहे. प्रशासनाने परिस्थिती सुधारावी व त्याच्यानंतर हा बांधकाम नियमीत करण्याचा जो ठराव केला आहे तो पाठीमागे घेण्यात यावा. खरतर जो विषय होतो. वारंवार आपण आमच्या नेत्यांवरती आरोप करता. अस आमच्याकडून काहीही होणार नाही. साहेब शास्तीकराचा विषय आता अभिषेकने सांगितला. तरी शास्तीकरामध्ये ४,७८,७८७ घरांची कर आकारणी केलेली नाही. नवीन बांधकामांना आपण कशा पध्दतीने करणार आहोत. याबाबत खुलासा व्हावा. एवढे बोलून थांबतो.

**मा.संदीप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आता चिंचवड विधानसभा मतदार संघातील नवीन तीस हजार फुटापेक्षा जास्त बांधकामांच्या संदर्भात याठिकाणी चर्चा होत असताना याठिकाणी महापौर साहेब मी खेदाने सांगू इच्छितो की खरतर हा निर्णय शहरातील नागरीकांना पाणीपुरवठयातून दिलासा देण्यासाठी करायचा असता तर तो निर्णय आता न करता उन्हाळयात केला असता आणि संपुर्ण शहरासाठी केला असता तर माझ्या मते हे एक दिलासा दायक ठरले असते. आणि त्यापेक्षा पुढे जाऊन ज्या धरणातून आपल्याला पाणीपुरवठा होतो त्या धरणातील पाणीसाठा वाढविण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी याठिकाणी प्रयत्न करण्याची गरज होती. त्याच्यातील गाळ काढलातर पाणी साठविण्याची क्षमता देखील वाढू शकते. त्याचप्रमाणे आंद्रा आणि भामा या धरणातून पाणी आपल्या शहरात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असं याठिकाणी मला वाटतं. आणि खरतर अमृत योजना, आणि २४x७ या ज्या योजना आहेत. या योजना खरतर अगदी मुंगीच्या पावलाने येतात की काय अस या ठिकाणी वाटते. खरतर या सर्व गोष्टींवर सर्व पक्षांनी एकत्र मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. नागरीकांना पाणीपुरवठा तसेच सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा आपण उपलब्ध करुन देऊ शकलो नाही तर त्या नागरीकांकडून मिळकतकर वसुल करण्याचा आपल्याला कुठलाही नैतिक अधिकार नाही. असे मी याठिकाणी सभागृहाला सांगू इच्छितो आणि याठिकाणी थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. खरतर राहुलचे मी मनापासून आभार मानेल. यापुर्वीही सभागृहामध्ये अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात चर्चा झाली आहे. ही चर्चा होत असताना ज्यावेळेस आपण ईलीगल बांधकामे शहरामध्ये किती आहेत, कशी झाली हे जे प्रश्न विचारलेले आहेत हे प्रश्न विचारताना आयुक्त साहेब ज्यांनी ही उत्तरे दिलेली आहेत ती अतिशय सुंदर अशी उत्तरे आहेत ती वस्तुस्थितीमध्ये अजिबात नाहीत. ती वास्तव्यामध्ये अजीबात नाहीत. आम्हाला अशी अपेक्षा होती की खरी उत्तरे मिळावीत. आणि जे प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नामध्ये जी माहिती दिलेली आहे ती किती बरोबर आहे आणि किती चुकीची आहे. ती मला वाटत परत एकदा प्रश्नोत्तर परत आल्यानंतर मी सांगेन. आज महापौर साहेब आपण बघितल असेल की ४,७८,७८७ बांधकामे पिंपरी चिंचवड शहरामध्ये पुर्ण आहेत. त्यामध्ये ३,१३,०८५ बांधकामे नियमित करणेत आलेली आहेत आणि १,७३,४८८ ही बांधकामे अनधिकृत आहेत असे आपण म्हणले आहे. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की आमच्या काळामध्ये मला वाटत २००८ च्या काळामध्ये लालजी वंजारे हा कोर्टामध्ये गेला त्यावेळेस साधारणत: ६६ हजार बांधकामे ही अनधिकृत होती आणि त्यासंदर्भात कोर्टाने आदेश/निर्णय दिला. त्यानंतर खरतर हा उदयोग हा

अधिकृत/अनधिकृतचा विषय शहरामध्ये वाढला. त्यानंतर जयश्री डांगे या सुध्दा २०१० च्या दरम्यान कोर्टात गेल्या. या दरम्यान हे विषय कोर्टात गेले. महापौर साहेब, आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो की, ही बांधकामे होत असताना शहर बकाल होत आहे तुमचे म्हणणे आहे. हे जे प्रश्न विचारलेत मी तर खरच म्हणेल “श्रवण आजब तुझे सरकार” म्हटले तरी चालेल. एवढी बांधकामे होत असताना आपली यंत्रणा सक्षम असताना, एवढा आपला पोलीस बंदोबस्त घेतलेला आहे. बीट निरिक्षक दिलेले आहेत. हे सर्व असताना ही बांधकामे होतातच कशी. याला कोण पाठीशी घालतेय. मग आमच्यातला नगरसेवक असेल किंवा अन्य कोणी तुमचे अधिकारी असतील. कोणाची घेवाण-देवाण होते का, कोणाचे आर्थिक व्यवहार होतात का. हे सुध्दा बघितल पाहिजे. पण अनधिकृत बांधकाम करायच्या माध्यमातून आरक्षणावर किती बांधकामे असा एक सुंदर प्रश्न आहे, किती जागावर आरक्षणे आहेत त्यापैकी किती विकसित झाली आहेत, मनपाच्या ताब्यात असलेल्या आरक्षणांवर किती बांधकामे झाली आहेत. साहेब तुम्ही या विषयावर खर लक्ष दयायला पाहिजे होतं. आणि या विषयावर चर्चा करणे म्हणजे सभागृहाच लक्ष किंवा आमच्या नगरसेवकांना कळल असतं. मनपाची किती आरक्षणे आहेत आणि कितीवर बांधकामे केलेली आहेत. हेच माहिती नाही आमच्या नगरसेवकांना. महापौर साहेब ही अपेक्षा होती की आपल्याकडून उत्तर येण्याची किंवा आमच्या राहुलला उत्तर देण्याची. जर शहरामध्ये ११५५ आरक्षणे मंजुर केलेली आहेत सोबत गावनिहाय आरक्षणाचा तक्ता जोडला आहे. एवढे दिले. साहेब त्यांनी मागितल होतं या ताब्यात आलेल्या आरक्षणावर किती बांधकामे झालेली आहेत. त्याच उत्तर कुठे साहेब, का उत्तर मिळाल नाही हयाच साहेब. जर हे उत्तर मिळाल असत तर आमच्या सभागृहाला अथरॉईज काय, अनअथरॉईज काय, करतय कोण, मदत करतय कोण साहेब माझ्याकडे ही आख्खी फाईल आहे. मी जर कोर्टात गेलो ना तर आपले चांगले चांगले अधिकारी, हे सगळ वाचून दाखवू का साहेब. तर बराच वेळ जाईल यामध्ये. मी ज्यावेळेस कोर्टात जाईल त्यावेळेस सांगेन. पण आपल्या अधिका-यांनी शहरामधल्या जेवढे जेवढे आरक्षणे आपल्या महानगरपालिकेचे आहेत त्यावर अनेक ठिकाणी महानगरपालिकेने स्वत:च्या खर्चाने बांधकामे केलेली आहेत. मग त्याला जबाबदार कोण आमचे गोरगरीब, कोणाच्या आया, बहिणी यांचे दागदागिने मोडून स्वत:ची जी काही घरे बांधून राहतात. त्यावर रितसर त्याचा सातबारा केला जातो. त्याचा रितसर मोबदला दिला जातो. त्यांची घरे आपण बीनधास पाडू शकतो. माझ्या आईबहीणींचा तळतळाट घेऊ शकता. मग जिथ महानगरपालिकेच्या अधिका-याने सक्षम अधिका-याने आयुक्तांच्या सहीनिशी जिथ निधी गेला. ती बांधकामे आपण बांधली गेली त्याला कोण जबाबदार. महानगरपालिकेची आरक्षण किती आहेत यासोबत तक्ता जोडला गेलाय.

त्यामध्ये आपल्या ताब्यात किती आलेली आहेत असं पण विचारल होतं. त्याचाही निर्णय आपल्याकडन दिलेला नाही. मग जर राहुल कलाटेच्या प्रश्नांची उत्तरे जर आपल्याला प्रशासन नीट देत नसेल. सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असेल तर हे नक्की काय कुठल्या पध्दतीने काम चालेल आहे आपल साहेब. माझी आपल्याला विनंती आहे राहुलभाऊ आज आपल्या महानगरपालिकेची अनेक आरक्षणे ताब्यात नाहीतच साहेब. इथ दिलेले आहे की एकूण आरक्षणे १७२ आणि ताब्यात आलेली आरक्षणे आहेत मला वाटत एकूण १७२ ठिकाणे. नंतर १७० हेक्टर ७३ आर ही क्षेत्र आपल्या ताब्यात. आणि आपल्या ताब्यात नसलेले क्षेत्र १४ हेक्टर ९८१ आर. साहेब, हि सुध्दा दिशाभूल केलेली आहे. आकडेमोड केलेली आहे. अक्च्यूअली मला चांगल आठवतय यात अनेक आरक्षणे आपली आपण ताब्यातच घेतलेली नाहीत. साहेब आम्ही अनेक वेळा सभागृहामध्ये बोंबलून सांगितल होतं. की जी आरक्षणे आहेत, त्याला कपाऊंड बांधा. आणि तिथं महानगरपालिकेचा बोर्ड लावा. माझ्या सारख्या सर्व सामान्य कार्यकर्त्याला तुम्ही आपला शेतकरी असेल, एखादा बिल्डर असेल. किंवा अन्य कोणी असेल. तो तिथं जातो आणि त्याला तो जागा घेतो, बांधतो आणि मग नंतर महानगरपालिका जागी होती की तिथं महानगरपालिकेचे आरक्षण आहेत आणि मग ते पाडा. अजुनही तुम्ही आम्ही राष्ट्रवादीमध्ये असताना सुध्दा अनेकवेळेस सभागृहामध्ये चर्चा केली. चांगले निर्णय सांगण्याचा आम्ही प्रयत्न केलाय. ज्यावेळेस आमचे अ आणि ब झालय. त्यावेळेस महापौर तिथे होते. म्हणून महापौरांना सांगतोय. तुम्ही असताना आमच्याकडे ही महापौर होते. त्यावेळेला ग्रामीण भागासाठी चर्चा केली असताना त्यावर आपण म्हणल होतो की जी आरक्षणे आहेत त्यावर कपाऊंड करा. ती ताब्यात असो अगर नसो. पण ती जागा ताब्यात मिळेपर्यंत म्हणजे तिथे तोपर्यंत कोणी जाणार नाही कोणी फसणार नाही. कुणी माणूस फसणार नाही. किंवा तिथे जागा घेताना-देताना सुध्दा घेणा-या-देणा-याची फसवणूक होणार नाही. असा आम्ही विचार केला होता. साहेब ते सुध्दा आजपर्यंत घडले गेल नाही. साहेब आम्हाला कळल शास्तीकर माफ झाला. अनधिकृत बांधकामाचा निर्णय झाला. आम्ही ते पेपरला वाचल. फेकबाजी झाली. आज जे जे काही लोक बोलले ना, मगाशी भाऊसाहेब बोलले ना. काही लोकांची चांदी झाली. शास्तीकर माफ करतो, अनधिकृतचा प्रश्न सोडतो, रेडझोनचा प्रश्न सोडतो काही आमदार झाले. काही आमदारांच्या सभा झाल्या. मी लोकांना सांगितले की आपला शास्तीकर सुटणार आहे, रेडझोन सुटणार आहे. आज काही ठिकाणी साखर वाटली जाते, पेढे वाटले जात आहेत. मला वाटत आखखी साखर संपली, बाकी सर्व साखर इथं आली. हे करीत असताना आहो पण मूळ विषय काय. आम्ही आयुक्तांना सांगू इच्छतो की आम्ही त्यावेळेस सभागृहामध्ये विषय मांडला होता.

६०० नाही १००० स्केअर फूटापर्यंत शास्तीकर माफ करा. १००० चे २००० पर्यंत आम्ही सभागृहाने तो निर्णय दिला होता. आयुक्त साहेब आपण त्या निर्णयाला आमचा फाटा मारला. तिथं तो ठराव विखंडीत केला निर्णय आमचा. तुमचेच उत्तर आहे हे. शासन निर्णयाची अंमलबजावणी महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येत असून १००० स्केअर फूट कारपेट क्षेत्राच्या निवासी अवैध बांधकामांना शास्तीची आकारणी करु नये. असा केलेला महापालिका सभा ठराव क्रमांक ०८ दि. २०/४/२०१७ नियमाशी विसंगत असल्यामुळे ठराव विखंडीत करणेत येत आहे. साहेब, आपण आम्हाला अडचणीत आणताय. जो सभागृहाने ठराव केला तो १०० टक्के माफी त्यानंतर ५० टक्के माफी त्यानंतरचा निर्णय तो असा व्हावा. असा आम्ही सभागृहाने केलेला निर्णय आहे तो तुम्ही बीनदास्तपणे शासनाला विखंडीत करण्यासाठी पाठविला आहे. साहेब आमच्या ही काही यावेळेस पुर्वीचे महानगरपालिकेचे आमदार, जे सत्ताधारी होते त्यांच्या काळामध्ये हा निर्णय घेतला गेलेला आहे. आम्ही शास्तीकराबाबतचा निर्णय या सभागृहामध्ये फेटाळला. आणि शासनाला जो पाठविला तो जसाचा तसा मंजुर होऊन आला. आम्ही फेटाळलेला जो ठराव तो परत इथं आला. मग हयाला कारणीभूत सुध्दा आताचे जे नेते स्वत:ला समजतात ते नेते सुध्दा त्या काळामध्ये शास्तीकराला जबाबदार आहेत आता ते म्हणतात की प्रश्न सुटलाय. तेच म्हणताय की हे झालय. आम्ही गावडे साहेबांना विचारले की साहेब शास्तीकराचा जीआर आला का हो. शास्तीकराचा जीआर आला नाही. तर मग जीआर आला नाहीतर पेढे वाटले कसे बॅनर लागले कसे आलय कुठून. लोकांनी समजायच काय, जनताही संभ्रमात आहे. आपण लोकांसाठीचा जो चांगला निर्णय घ्याल त्यासाठी आम्ही नक्कीच मला वाटत आता आमच्या अजित भाऊंनी सांगितलं. जो चांगला निर्णय घेतला आम्ही त्यास विरोध करणार नाही. चांगल्या निर्णयास आम्ही सक्षमपणे पाठीमागे राहू. अस मी आज तुमच्या नेत्यांना किंवा तुम्हांला सांगतो साहेब. पण चुकीचे करीत असताना चुकीचे संभाषण चालू असताना तिथं आम्ही १०० टक्के विरोध करु. या निमित्ताने मी सांगतो साहेब हे पक्षनेते असताना हे सांगणे गरजेचे आहे की ज्यावेळेस आपण महानगरपालिकेमध्ये ठराव करतो आणि ठराव विखंडीत करुन ठराव शासनास पाठविणे. तुम्हाला कोणाला आयुक्तांनी विचारले होते का मी असा ठराव त्याठिकाणी पाठवितो. आणि तो ठराव माझ्याकडे पेपर आहे. आणि त्यांचेच उत्तर आहे. आयुक्तांची सही आहे याच्यावर असं सगळ असताना तो मारुती भापकर म्हणलाय ना. मला वाटत त्यांनी चांगल उत्तर दिलंय.त्यांच्या मताशी मी पण सहमत आहे. की आपण आमच्या महानगरपालिकेच्या नागरीकांची फसवणूक करतात. तर तुमची घरवापसी करण्यासाठी आम्हाला वेळ लागणार नाही. मला वाटत साहेब आपण सभागृहाची दिशाभूल करीत आहात. अस

माझा नक्कीच आरोप आहे. आणि हे जे आणतायना यास आपण सुध्दा हयाला कारणीभूत आहोत. सगळया लोकांचा, जनतेचा नक्की निर्णय काय तर मला वाटत खरंच अभिषेक भाऊ तुम्ही गावडे साहेबांना आणून तो निर्णय आता आपण काही करु शकत नाही. कोणी ६०० फुटाची घरे डीव्हाईड करायची कोणी २००० स्के. फुटाची घरे डीव्हाईड करायची हे पण मागितल होतं. हयाच्यातून शास्तीकरामध्ये किती फायदा होणार आहे. त्याच मी उत्तर मागितल होत त्यामध्ये माझ्याकडे आकडेवारी सुध्दा आहे. आपला ठराव होता ६०० स्केअर फूट बांधकामाचा. माझी आयुक्त साहेब किंवा महापौर साहेब यांना विनंती आहे की अनधिकृत बांधकामांच्या विषयामध्ये आपण गांभीर्य ठेवा. शास्तीकराच्या विषयामध्ये आपण गांभीर्य ठेवा. शास्तीकराचा जो काही विषय शासनाकडे पाठविला आहे. तो पुन्हा एकदा आमची सभागृहाची मदत लागली तर परत घ्या. आमच्याकडून शासनाच्या बाबतीत काही लागत असेल तर आमच्याकडून ती मदत करुन अनधिकृत बांधकामाबाबत लोकांवर चाललेला जो अन्याय आहे तो थांबवावा आणि कुठे तरी कुठल्या नियमात बसत असेल तर ते तुम्ही थांबविलेलं आहे कुठली अनधिकृत बांधकामे लीगल झालेली आहेत. साहेब मला अजुन एक माहिती पाहिजे होती की आपल्याकडे जी बांधकामे लीगल करण्यासाठी जे अर्ज केलेले आहेत. लीगल अर्जांमध्ये ५६ अर्ज आले आहेत. या ५६ अर्जामधील नावे आणि गावे जर वाचली ना साहेब. कुठल्या गावातून आलाय आणि कुठल्या नावाचा हा माणूस आहे. हा जर मिळाला तर अजुन चांगले होवून जाईल आणि साहेब हे ५६ अर्ज का आले. याच सुध्दा आपल्याला आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. परंतु त्याची मुदतच संपलेली आहे अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याची जी आपण मुदत आपल्या सभागृहामध्ये ठेवली होती किंवा आपण जी मुदत दिली होती. त्याची मुदत देखील मला वाटतं संपली आहे. मुदत संपत असताना हे लोक का आले नाहीत आपल्याकडे. साहेब आम्ही अनेक वेळा आपल्याला दत्ताकाकांना या संदर्भात देखील प्रश्न विचारला होता. की हे काम करीत असताना जी बांधकामे आहेत. याकरीता जी नियमावली आपली आहे ती सुधारण्याची गरज आहे. ती नियमावली महानगरपालिकेची जी आपण बांधकामे लीगल करण्यासाठीची जी नियमावली आहे तिच्यामध्ये खरतर सुधारणा करणे गरजेचे आहे. साहेब या निमित्ताने मी आपल्याला असे ही बोलतो की साहेब इकडे लक्ष ठेवा. मी तुमच्या चांगल्या साठीच सांगत आहे. आयुक्त साहेब यासाठी मला वाटत. आपण नागपूरवरुन आलेला आहेत. नागपूर पॅटर्न म्हणून घरांचा डेमो तयार केला. मला वाटत केरळमध्ये काही तरी आहे. मला वाटत की बेंगलोर मध्ये एक ठिकाणी हा डेमो आहे. एक गुंठयाचं, अर्धा गुंठा, दिड गुंठा, दोन गुंठे, तीन गुंठे रेसिडेनसीयल फक्त घर. त्याची जर आपण डिझाईन करुन दिली. एखादयाच्या समोर आमच्या एखादयाला किंवा प्लॅन

किंवा घर बांधायचे आहे त्याला. तर ते जर आपण केल तर त्याने त्यानंतर त्या पध्दतीने त्या घराचे डिझाईन आपल्याकडे दिले. प्लॅन करुन पेपर आपल्याकडे दिले. आपण त्वरीत मंजुरी दिली. तर मला वाटत अनधिकृत बांधकामे थांबल्याशिवाय राहणार नाही. अशी मला खात्री वाटते. हे करीत असताना आपण नियमावलीमध्ये शिथीलपणा केला किंवा लोकांना जर अनधिकृत बांधकामे १०० टक्के थांबवावयाचे असेल तर त्यांना सुध्दा पर्यायी व्यवस्था आपण काही तरी केली पाहिजे. नाहीतर इकडे आपण अनधिकृत बांधकामे थांबली पाहिजेत. आणि एका बाजूला बघितल तर आपली नियमावली किचकट आहे. त्यामुळे मला वाटत सातच अर्ज होते साहेब. पण आता ही चर्चा जास्त झाल्यामुळे ५६ अर्ज आले आहेत साहेब. आणि हे अर्ज कोणाचे आहेत याची माहिती आम्हाला देणे गरजेचे आहे. म्हणून महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे. अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, किंवा आता जे हे चाललय आहे राहुलभाऊंचा विषय त्यांनी विचारलेले प्रश्न, हे सगळे करीत असताना आपण हयामध्ये लक्ष घालून, आयुक्त साहेब आपण यामध्ये लक्ष घालावं. यानंतर यापुढे शहरात अनधिकृत बांधकाम होणार नाहीत. जस मी सांगितल त्याप्रमाणे डेमो करावे. पण राहते घर आहेत त्याला जर तुम्ही असा डेमो केला तर मला वाटत शहरातील अनधिकृत बांधकामे थांबतील. अस मला वाटतय महापौर साहेब मला बोलण्यास वेळ दिल्या बद्दल धन्यवाद.

**मा.ॲड.सचीन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर आज अतिशय चांगल्या विषयावरती या शहरातील नागरीकांचा अतिशय जिव्हाळयाचा विषय असलेला अनधिकृत बांधकाम आणि शास्तीकर या विषयावर आपण चर्चा करतोय. खरतर या शहरातील नागरीकांनी अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी आणि शास्तीकर माफ करण्यासाठी गेले अनेक वर्ष त्यासाठी झटत आहेत. परंतु या शास्तीची या शहरातील नागरीकांनी धास्ती घेतलेली आहे. या सभागृहामध्ये कुठल्या नेत्यांच्या नावाचा उल्लेख करणे मला योग्य वाटत नाही. काही वेळापुर्वी आमचे सहकारी मित्र अभिषेक बारणे यांनी नेत्यांच्या नावांचा उल्लेख केला. त्यांनी या सभागृहामध्ये सांगितल की नेत्यांनी हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले परंतु जाहीररित्या मी याठिकाणी सांगेन की जोपर्यंत शासनाचा जीआर येत नाही तोपर्यंत तो प्रश्न सुटला अस म्हणता येणार नाही. पेढे वाटले, बॅनर्स लावले किंवा आणखी आनंदोत्सव साजरा केला तर तो जिव्हाळयाचा प्रश्न आहे. तो असा नुसते पेढे वाटून सुटणार नाही. या सभागृहामध्ये मला वाटत कुठल्या नेत्यांच्या नावाचा उल्लेख न करता माझ्या मित्राला आठवण करुन देईन की ज्या नेत्यांनी अनधिकृत बांधकामांचा प्रश्न सुटत नाही. शास्तीकर माफ होत नाही. त्यामुळे ज्या नेत्यांनी दुस-या पक्षात जाऊन जनतेविषयी अतिप्रेम, जनतेविषयी अतिशय आत्मीयता दाखविण्याचा प्रयत्न

केला त्या घटनेला ४ वर्षे पुर्ण झाली. तो प्रश्न सोडविणे तर... सन्मा. महापौर मी विषयावरच बोलतोय. मी एवढच सांगतो मी सन्मा. महापौर साहेब या सभागृहाच्या माध्यमातून मी माझ्या मित्राला आठवण करुन देतोय की त्या नेत्यांनी शब्द दिला होता की आम्ही अनधिकृत बांधकामाचा प्रश्न सुटत नाही म्हणून आम्ही दुसरी कडे जातो पण ४ वर्षे झाले. केंद्रात, राज्यात सगळीकडे सत्ता आहे मग हा प्रश्न का सुटत नाही. तर सांगायच तात्पर्य एवढच आहे. आम्ही सत्तेत जरी असलोतरी आम्ही जनतेच्या बाजूने राहणार आहोत. जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आम्ही सतत प्रयत्न करीत असतो. माझ एवढच म्हणण आहे की मी या सभागृहाला सांगू इच्छितो की या जनतेच्या प्रश्नांशी खेळू नका. राजकरण, सत्ता निवडणूक आल्या की तुम्ही म्हणता की आम्ही हा प्रश्न सोडवू. प्रत्येक वेळी तुम्ही नागरीकांच्या भावनेशी खेळण्याच बंद करा अशी माझी कळकळीची विनंती आहे. कुणीपण असेल नेता, लक्षात घ्या आपण या सभागृहामध्ये नागरीकांचे प्रतिनिधीत्व करतोय. कुठल्या वैयक्तिक नेत्याविषयी माझ मत नाही. कोण काय करतय त्याच्याविषयी मला काही म्हणायच नाही. परंतु फक्त दक्षिणसारखे झाले नाही पाहिजे. आपण काय बोललो त्याच आपल्याला भान राहिले पाहिजे. म्हणून या सभागृहाच्या माध्यमातून जाहीर आवाहन करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आता याठिकाणी अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नोत्तरे संदर्भात सुरुवात केली होती. त्यांना जनतेचा असलेला कळवळा, असलेले प्रेम, येणा-या निवडणुका हया सगळयांचे जमून आलेल गणित या बद्दल त्यांनी केलेली प्रश्नोत्तरे, त्याबद्दल तुमचं मनापासून कौतुक. आता दत्ताकाका साने पण बोलले एवढी बांधकामे झाली. एका दिवसाततर झाली नाहीत, तुम्ही आम्ही या सभागृहामध्ये गेल्या १५ वर्षापासून आहोत. आम्ही बेंबीच्या देठापासून बोंबलायचो. तुम्ही थांबवा, थांबवा, थांबवा परंतु ती थांबली नाहीत. कारण ज्या ज्या वेळेस थांबवावयाला गेलेत अधिकारी त्या त्या वेळेस आपल्या सारखेच लोक जाऊन उभे राहिले. आणि म्हणून या संपुर्ण शहरामध्ये लोण पसरले गेले आहे. या सभागृहातल्या कुठल्याही नगरसेवकाला नाकारता येणार नाही. त्याची सत्यता अशी आहे की खरच या शहरातल्या घराचे जे दर आहेत ते गगनाला भिडलेले होते. आणि सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर दर गेलेनंतर काही घर बांधण्याचा विषय झाला आणि त्याच बरोबर जे व्यावसायिक आहेत ज्यांनी छोटे प्लॉट घेऊन तिथं धंदा केला. त्यांच्यावर निश्चितपणे आयुक्तसाहेब कठोर कारवाई व्हायला पाहिजे होती. आणि ती प्रशासनाकडून झाली नाही. याचे साक्षीदार सुध्दा या सभागृहामध्ये मी, हे शहर, आम्ही सगळेजण आहोत. आता इथ सगळयांनी सांगीतल की कोणीही राजकारण करायचं

नाही. नेत्यांचे नाव घ्यायच नाही. मग कोणी राजीनामा दिला, कोणी पक्ष सोडला, हो सोडला लक्ष्मणभाऊनी पक्ष. त्यावेळेस न्याय दिला नाही. त्यावेळेस ते राष्ट्रवादी संलग्न होते. राष्ट्रवादीचे आमदार नक्कीच नव्हते. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला आणि त्यांच संलग्नता जे होत ते त्यांनी तेथून सोडलं. त्याच बरोबर या शहरातील आताचे जे खासदार आहेत शिवसेनेचे आम्ही त्यांच्याबरोबर खांदयाला खांदा लावून नागपूरला मोर्चा काढला आहे मग ते बेगडी प्रेम होतं का. शिवसेनेचे अनेक दिग्गज नेते, या शहरातून अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत आम्ही मोर्चा काढू लागलो होतो. मग ते बेगडी प्रेम होत कां. अजिबात नाही. त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार जे जे योग्य वाटल ते ते त्या त्या वेळेस निर्णय घेतले गेले. तुम्ही आम्ही राजकारणी आहोत आपण संन्यासी नाहीत. ज्या वेळेला जो तगडा पक्ष होता त्याला खाली खेचण्यासाठी जे जे राजकारण करता येण्यासारखे होते ते ते सगळे राजकारण तुम्ही, आम्ही मिळून केलेले आहे. कशाला सांगायचे मी नाही त्यातला. मला माहित नाही. आम्ही काही तरी वेगळे. हा आव आणण्याची गरज नाही. विषय काय आहे की मागच्या १५ वर्षाच्या काळात त्या प्रश्नावरती काथ्याकुट झाला नाही. त्याच्यावरती एकही जीआर निघाला नाही. त्याच्यावरती एकही सोल्यूशन काढल गेल नाही. भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर किमान जीआर तर निघाला. मान्य आहे ते ६०० फुटाच्या घरांनाच आम्ही त्याठिकाणी त्या नियमामध्ये सूट दिली. एका सर्व सामान्य व्यक्तीला किती फुटाचं घर लागतं. तर आपण मार्केटमध्ये जर सर्व्हे केला तर लक्षात येईल की या शहरात बिल्डर आहेत, वन बीएचके जो बांधतो तो ५०० ते ५२५ फुटाचाच बांधतो. म्हणून त्यामध्ये जास्तीत जास्त सूट देऊन त्याठिकाणी ६०० फुटापर्यंतचा नवीन जीआर आणला. तो जीआर आणल्यानंतर सुध्दा आम्ही अस म्हटल का की अनाधिकृत बांधकाम पाडा. आम्ही सांगितल की ज्याठिकाणी व्यावसायिक बांधकाम आहेत तीतर पाडलीच पाहीजेतनां. कारण मग जी लोक याठिकाणी करोडो रुपये भरुन आपल्याकडे जे बिल्डर आहेत ते सभागृहामध्ये सुध्दा आहेत. तुम्ही त्याठिकाणी विकसन शुल्क एवढ मोठ भरायचं आणि मग अशा प्रकारचे जे लोक दुकानदारी करतात त्यांनातर तुम्हीच पाठींबा देतायनां. आमच काहीच म्हणण नाही साहेब. आणि मग ईमानदारीनं जो काम करतोय त्यांच्या डोक्यात धोंडा का घालायचा. आणि म्हणून सर्वसामान्य गोरीगरीब जनतेला याचा लाभ मिळावा “सबका साथ सबका विकास” आमच धोरण गरीबांच आहे. याठिकाणी स्टँडींगने पाणीबंदीचा निर्णय घेतला. आयुक्त साहेब आपल्यालाही माहीती होत. स्टँडींगने निर्णय घेतला. मग काही तरी आर्थिकच असल पाहिजे. स्टॅण्डींग आहेच आर्थीक, ओपनली केलयना, सगळयांनाच माहिती आहे. सगळे आर्थीकच विषय इथ आहेत. परंतु स्टँडींगला अधिकार नसतानीच स्टँडीगने त्याठिकाणी निर्णय घेतला आहे

ते महत्वाच आहे. पण तसा निर्णय घेण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. स्टँडींगने निर्णय घेतला तो ठराव करुन या जनरल बॉडीकडे पाठवायाला पाहिजे होता. आणि मग नुसत त्या शहरातल्या भागाचा नाही, टिका करता म्हणून नाहीतर हेअरींग करण्याचे काम सुध्दा त्यांनी केलं. तुमच्या नेत्यांना सांगा सभागृहामध्ये सुचना आम्ही करायला. तुम्ही पत्र दया तसे, घेऊ आम्ही निर्णय त्याच्यावरती. परंतु ताकाला जायचं आणि भांड लपवायच आणि मग घेतलेल्या निर्णयावर सुध्दा तुम्ही जर का टिका कारणार असालतर तस ते काही योग्य नाही. आता ऑलरेडी याठिकाणी आम्ही निर्णय जाहीर केलाय ६०० स्केअर फुटापासून ते १००० स्केअर फुटापर्यंतच्या बांधकामांना पुर्वलक्षी प्रभावाने त्याठिकाणी आपण सुट देतो. मग त्याच्यातही आपल्याला प्रॉब्लेम आहे साहेब. प्रॉब्लेम कशामध्ये आहे. आपण खरोखर याची अंमलबजावणी करायची नाही, की अंमलबजावणी होऊ दयायची नाही, की लोकांमध्ये संभ्रम निर्माण करायचा आहे. जशी सत्ता आमच्या कडे आहे तसा आमचा सारथीपक्ष म्हणून, मित्र पक्ष म्हणून शिवसेना सुध्दा आमच्या बरोबर आहे आणि त्यांनी सुध्दा मोर्चे काढलेले आहेत, त्यांनी सुध्दा धरणे धरलेली आहेत. इथ आम्ही कुंडया फोडलेल्या आहेत. मंगलाताईंनी आम्हाला पार्टीच्या भाषेत सुनावलेले आहे याठिकाणी सभागृहनेता म्हणून. आम्ही विसरलेलो नाहीत ताई. आम्ही केलीत की सगळी नाटके. मग आम्ही त्यावेळेस करत होतो त्यावेळेस ती नाटके होती का, तर अजिबात नाही. आणि आता नाटके करणारी ही जी आमच्याबरोबर होती. आता आम्ही काय करायला लागलो म्हणून ती नाटक बनायला लागली. अस नाही तुम्ही एक समजून घ्या. तुमची भूमिका ठरवा काय करायच आहे. विरोध आहे डायरेक्ट विरोध करा. बरोबर आहेतर मग बरोबरच म्हणा. प्रश्नोत्तर चांगले आहेत, शहराचा प्रश्न सुटला पाहिजे. विचारा पण योग्य. पण टारगेट करु नका. हो लक्ष्मणभाऊ चांगलेच आहेत, त्यांनी चांगला निर्णय घेतला का तर हो चांगलाच निर्णय घेतला. नेता म्हणून माझी पाठराखण करणं कामच आहे. कारण की नेता चुकत नसतो, कार्य करत असतो म्हणून नेता हा नेताच असतो आणि कार्यकर्ता म्हणून आपण इथच आहोत. तरी याच सुध्दा भान ठेवले पाहिजे. परंतु ज्यावेळेस आपण मर्यादा ओलांडून, पातळी ओलांडून एखादयावरती टिका करतो तर आपण सुध्दा त्या त्या निर्णयात त्या त्या वेळेस सामील होतो. एवढच मला याठिकाणी मा. महापौर सांगायचय. याठिकाणी खूप चांगली चर्चा झालेली आहे. मला अस वाटत की लवकरात लवकर आपण हे विषय संपवून पुढच्या विषयाकडे गेलात तर बर होईल धन्यवाद महापौर साहेब.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह मी थोडसं नियमाकडे लक्ष वेधू इच्छितो. आपली सर्वसाधारण सभा दु.२.०० वाजता सुरु

झाली. नियुक्तयांमध्ये अर्धा पाऊण तास याठिकाणी गेला. शिक्षण समितीच्या सदस्यांची निवड आपण केली. मी पाहतोय गेले अडीच तास गटनेते राहुल कलाटे यांनी विचारलेल्या प्रश्नावर राहूल कलाटे बोलले अन्य सर्व सन्मा.सदस्य बोलतात. पण मी सभागृहाचे याठिकाणी लक्ष वेधू इच्छितो की महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार चर्चा सत्रासाठी एकच तास वेळ दयावी अशा प्रकारची अधिनियमामध्ये तरतूद आहे. गेली दोन अडीच तासापासून चर्चा चालू आहे. विषय चांगला आहे, वाईट आहे त्या गोष्टीकडे मी जाणार नाही. परंतु एक तासापेक्षा जास्त चर्चा प्रश्नोत्तरावर करता येत नाही. सभागृह कितीही तास चालू शकते त्याच्यावर बंधन नाही. त्यामुळे भरपूर चर्चा याठिकाणी झालेली आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की आपण हे चर्चासत्र याठिकाणी थांबवावे. दोन जीबी होणार आहेत. भरपूर विषय आहेत. त्याच्यामध्ये सुध्दा बरेच लोक चर्चासत्रामध्ये सहभागी होणार आहेत. त्यामुळे सभागृहाच्या पुढच्या विषयाकडे आपण जावे. धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, महापौर साहेब आपले आभार आणि सत्तारुढ पक्षनेत्यांचे आभार. मा. महापौर साहेब आणि विशेषत: आयुक्त साहेबांना याठिकाणी विनंती करायची आहे की सगळी आकडेवारी, माहिती, गोषवारा आपण प्रांजळपणे इथ मांडलेले आहे. जे सत्य आहे ते तुम्ही जनतेसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आयुक्त साहेब हया सभागृहामध्ये असणारे जेवढे जुने नगरसदस्य आहेत. सर्व पक्षातले आहेत आम्ही पहिल्यापासून बोलत असतो की अगदी ज्या वेळेला बांधकाम सुरु होताना खड्डा खणला गेला, कॉलम भरायला लागले की त्यावेळेला पाडून टाका. मग तो कोणाच्या वॉर्डातला असू दया. तिथ ऐकण्याची काही कसर ठेवायची नाही. परंतु एकदा का आयुक्त साहेब मजले दोन मजले, तीन मजले बांधले गेले. आणि मग शेवटी तो कामगारच असतो, तो गरीबच असतो. त्याने कुठलेतरी कर्ज काढलेले असते. कुठेतरी सोने तारण ठेवलेले असते. आणि मग अशा परिस्थितीमध्ये तो घर बांधण्याचा प्रयत्न करीत असतो. मग त्यावेळेला त्या भागातल्या नगरसेवकांना साहजिकच त्याला सांभाळण्याचे काम तो तिथ आहे म्हणून प्रयत्न करतो. दुसरी एक गोष्ट अशी की आयुक्त साहेब हया विभागाला तुम्ही रेव्हेन्यु मधुन येणारा एक चांगला अधिकारी दया. प्रभागवाईज स्कॉड तुम्ही करा. कारण इथ असलेला अधिकारी त्यांचे संबंध त्या भागातल्या नगरसेवक असतील किंवा जुने आमच्यासारखे पाच पाच, सात सात टर्म झालेले नगरसदस्य आहेत. त्यांना सुध्दा ते प्रेशर आणतात. त्यामुळे त्यांना प्रॉब्लेम असा येतो की एका बाजुला तुमचा प्रेशर दुसऱ्या बाजुला आमचा प्रेशर. आणि त्यामध्ये काय होत त्या विभागात बदलीच नको. बिल्डींग परमिशन डीपार्टमेंटच नको. या ऑफीसरची बदली कर त्या ऑफीसरची बदली

कर. परंतु तुम्हाला अपेक्षित असलेले यश मिळत नाही. त्यामुळे आम्ही तुम्हाला कायम सांगत असतो की रेव्हेन्यूव डिपार्टमेंटचा एखादा कडक अधिकारी ठेवा, चांगले स्कॉड ठेवा, पोलीस यंत्रणा आहे, पैसे आहेत सगळं आहे. काम सुरु होताच जर पाडल गेल तर लोक धाडस करणार नाहीत. परंतु तुम्ही स्वत: पाहिलेले आहे. तुमच्या निदर्शनास आलेले आहे. पत्रकाराने वर्तमान पत्रामध्ये छापलेले आहे. चार-चार पाच-पाच सहा-सहा मजली अनधिकृत इमारत बांधली जाते तोपर्यंत कारवाई ही होत नाही. हे खरतर प्रशासनाचे दुर्दैव आहे. दुसरी गोष्ट मा.महापौर साहेब याठिकाणी आता शासनाचा जीआर आणला, याठिकाणी आता ताई पण बोलल्या. परंतु आपण पाहील असेल की शासनाने काढलेल्या आदेशानुसार आतापर्यंत फक्त ५६ अर्ज आले आणि त्यातल्या एकालाही रेग्युलराईज करता आलेलं नाही. मग याचा अर्थ ही जी नियमावली आली ती स्क्रॅपच करावी लागणारनां. किंवा मगाशी एका सन्मा. सदस्यांने सांगितले की बाजूची भींत न पाडता मार्जीन साईडला न सोडता, फ्रंट मार्जीन न सोडता अर्धा, एक गुंठयामध्ये करता येतं. ही माहिती आपण जनतेपर्यंत दिलेली आहे का. याला आपण पब्लीसिटी दिली आहे का याला आपण वर्तमानपत्रातून अशी काही जाहीरात दिली आहे का, प्रभागवाईज आपण याची जनजागृती केली आहे का, की जेणे करुन अशा पध्दतीने साईडला मार्जीन नाही, तर मग लोक घरे रेग्युलराईज करायला येतील. ताईंनी आता सांगितले की बिल्डर ५०० ते ५५० फुटा पर्यंतची घरे करतो. ६०० फुटाच्या वरती आपण शास्तीकर भरतोय. मग ते बिल्डरने बांधलेले घर तर अनधिकृत नसत. शेवटी जे चाळीमध्ये राहतात ते तेथेच राहतात आणि अनधिकृत घरे करतात, त्यांना याचा फायदा मिळालाच नाही. १००० च्या पुढे केलेला आहे. आणि त्या निर्णयाचा काहीच उपयोग झालेला नाही. आणि आता सिमाताईंनी सांगतांना सांगितले सत्ताधा-यांना खाली ओढण्यासाठी आम्ही सर्वांनी मिळून ताकद लावली. आम्ही मान्य करतो की तुम्ही ताकद लावली. त्यामध्ये तुम्ही यशस्वी झाला. आता पण तुम्ही यशस्वी व्हावे अशी आमची इच्छा आहे. नागरीकांना तुम्ही स्वप्न दाखविलेले असेल ते तुम्ही करुन दाखवा. नुसता फतवा काढून, मिठाई वाटून, पेढे वाटून, गाजावाजा करुन, नेत्यांची नावे घेऊन त्यांना पुढारपण देवून प्रश्न नागरीकांचे सुटणार नाहीत. सत्तेचा उपयोग आपण चांगल्यासाठी करावा. शहरातील नागरीकांचे प्रश्न सुटावेत. याठिकाणी बसलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांना मी मनापासून विचारतो की त्यांनी त्यांच्या छातीवर हात ठेवून मनापासून सांगावे त्यांना त्यांच्या वॉर्डामध्ये ही अडचण नाही का. त्यांना त्यांचे नागरीक विचारीत नाहीत का, की घोषणा केली होती आम्ही प्रश्न सोडवू आणि का सोडवत नाहीत. त्याच्या ही पलीकडे जाऊन मी सभागृह नेत्यांना व महापौर साहेब तुम्हालाही विनंती करतो की निदान राष्ट्रवादीच्या काळामध्ये ज्यावेळेला राजीव

जाधव आयुक्त होते त्या काळामध्ये शास्तीकर वगळून आपल्याला सामान्य कर घ्यायची मुभा होती. तेव्हा मला अस म्हणायच एकनाथराव की शासन निर्णय घेईल तेव्हा घेईल. निदान तुम्ही पालकमंत्र्यांना सांगा, संबंधित नगरविकास मंत्र्यांना सांगा जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत किमान सामान्य कर घेण्याची मुभा तरी नागरीकांना दया. तो पण तुम्ही बंद केलाय, नागरीकांना अडचण होते. आज होतय काय आपल्या तिजोरीमध्ये पैसा येत नाही. साहेब, कितीतरी रिटायर्ड लोक असे आहेत त्यांना परत दम दिला जातो की नळ कनेक्शन कट करु, घराला सील लावू. परंतु रिटायर्ड झालेली माणसे आज पेशंट झालेली आहेत, त्यांचे ब्लडप्रेशर वाढतेय, त्यांची शुगर वाढतेय. आज त्यांच्याकडून टॅक्स घेतला जात नाही. त्यामुळे आपल्या तिजोरीमध्ये पैसा जमा होत नाही आणि दुस-या बाजूला आपण अस म्हणतो की आपल सॉफ्टवेअर अस आहे. ते सॉफ्टवेअर अलाऊ करत नाही. मग शेवटी हा सॉफ्टवेअर बनविणारा पण माणूसच आहे ना. आपणच बनविलेले सॉफ्टवेअर आहे ते. त्यामध्ये अमेंडमेन्ट काय करायची ते तुम्ही करा, तो बदल करा. निदान सामान्यकर घेण्यास सुरुवात करा. तो शास्तीकर देतोयतर घ्या तुम्ही. आज या ठिकाणी बसलेले भारतीय जनता पार्टीचे अनेक नगरसेवक आहेत ते सुध्दा मागे म्हणत होते. मी स्वत: ऐकलेले आहे त्यांच्या ऑफिसमध्ये बसताना मित्र आहेत ते म्हणले की तुम्ही शास्तीकर भरु नका, तुम्ही टॅक्स पण भरु नका, शासन निर्णय घेणार आहे. म्हणजे आज सगळे नगरसेवक सांगताना सर्वांना असे सांगतात तुम्ही शास्ती भरु नका. सर्वच्या सर्व नगरसेवक सांगतात. भारतीय जनता पार्टीचे लोक सांगतात कारण ते मॅजॉरीटीमध्ये आहेत. मग मला अस म्हणायच आहे की आपण असं नागरीकांना किती दिवस फसविणार आहेत. किमान तो निर्णय केव्हा होईल तेव्हा होईल. तो पर्यंत आपण त्यांना सामान्य टॅक्स भरुन घेण्याची मुभा दयावी अशी माझी विनंती आहे. दुसरं मा. आयुक्त साहेब, आपण टॅक्स भरणेसाठी जाहिरात करतोय. १२ तारखेपर्यंत तुमच्या टॅक्सची बिले छापून आली नव्हती. नागरीक आता घरामध्ये येतात कारण तुम्ही तो प्रिंटींगचा ठेकेदार बदलून टाकलाय. तो पिंपरी चिंचवडमध्ये कोणतरी ठेकेदार होता. आज तो तुमचा अधिकार आहे, स्थायी समितीचा अधिकार आहे. तो ठेकेदार बदलला तर बदलला, पुण्याला दिले. पुण्यावाल्याने त्याच्यामध्ये २०१८ ऐवजी २०१७ छापून टाकले. परत ते दुरुस्तीला दिले. नागरीक आता येतात आणि म्हणतात की आज २२ तारीख उजडली आहे. आम्हाला अदयाप टॅक्सच्या पावत्याच मिळालेल्या नाहीत. आम्हाला अजून टॅक्सची मागणीच होत नाहीय तर आम्ही टॅक्स भरायचा कसा. आम्ही संबंधित अधिका-याला विचारले तर अधिकारी म्हणतात आमचं नाव सांगू नका परंतु आताच आम्हाला १२,१४ तारखेला बिले छापून मिळालेली आहेत. आता आम्ही ते लिहणार आणि आता आम्ही त्या

कॉम्प्यूटरच्या प्रींट काढणार आणि मग नागरीकांना बिले देणार. माझी आपल्याला विनंती आहे आयुक्त साहेब संबंधित विभागाला सांगून आपण त्याची मुदत १५ दिवस वाढवावी किंवा १ महिना मुदत वाढवावी जेणेकरुन त्या रिटायर्ड लोकांना किंवा महिलांना सामान्य करामध्ये ५० टक्के सूट देतो. ज्येष्ठांना  आपण १० टक्के सूट देतो. इतरांना आपण ०५ टक्के सूट देतो. ती सामान्यकराची सूट तरी किमान त्या लोकांना मिळविण्यासाठी तुम्ही त्या मुदतीमध्ये वाढ करावी. दुसरी गोष्ट अशी की माझ्या वॉर्डामध्ये कारवाई करीत असताना आपण बाहेरगावी जाण्याच्या आधी या ठिकाणी राऊत मॅडम सुध्दा बसलेल्या आहेत. मी तुम्हाला विनंती करुन सांगितले होते की आयुक्त साहेब १८-१८ वर्षे २०-२० वर्षे ही मंडळी तिथं  व्यवसाय करीत आहेत आणि आज व्यवसाय करताना तुम्ही त्या टप-या काढू नका, तोडू नका, त्यावेळेस तुम्ही ऐकले नाही. तुम्ही त्यावेळेला सांगितले की चेंज ऑफ व्हिव मी काढणार. आज संततुकारामनगर भाजीमंडईमध्ये जे तुम्ही तीन गाळयांची परवानगी दिलेली आहे त्या तीन गाळयांचे चेंज ऑफ व्हिवच चेंज झालेल आहे.  तो कुणाच्या परवानगीने केलाय. तुम्ही त्यांना मान्यता दिलीय. त्याला भूमि जिंदगीने मान्यता दिलीय. त्याठिकाणी खालच्या बाजूला भाजीमंडईमध्ये रेस्टॉरंटचे आरक्षण होते. ते रेस्टॉरंट काढून तुम्ही त्याठिकाणी तीन शॉप अलॉट केलेले आहेत. कोणत्या नियमाने केलेत, कोणाला दिलेत, कसे दिलेत. त्याला काय धोरण आहे. म्हणजे चेंज ऑफ व्हिव तुम्ही करु शकता चेंज ऑफ व्हिव टपरीधारक करु शकत नाही, गरीब करु शकत नाही. जे तुम्ही करु शकता ते सामान्य माणूस करु शकत नाही. काय आदर्श ठेवणार तुम्ही त्यांच्यासमोर. तुम्हाला विचारल होत परवानगी घेऊन केलय हे. तो मागासवर्गीय गरीब गंगावणे, तो फाळके, आवडे हया लोकांच्या तुम्ही एका दिवसात १८ वर्षापासूनच्या टप-या काढून टाकल्या. मी तुम्हाला स्वत: विनंती केली, साहेब, त्याच लायसेन्स आहे तर तुम्ही म्हणाला आदेश दाखवा. आता कशाला आदेश पाहिजे, की तुम्ही कशा पध्दतीने हया परवानग्या दिल्या. बाकीच्या ज्या बेकायदेशीर टप-या आहेत त्या काढा म्हटल तर त्या काढत नाहीत. मग महापालिकेने चुकायच का, महापालिकेने चुकीच काम करायच का. मग नागरीकांना आम्ही काय बोलाव.मा. आयुक्त साहेब, अशा पध्दतीने वागणं असेल तर  इथ काही लोक म्हणतील आता की भारतीय जनता पार्टी असं करु नका तसं करु नका म्हणते. परंतु माझ म्हणण अस आहे आयुक्त साहेब अशा पध्दतीने कोणता पण निर्णय होता कामा नाही. आज सत्ताधा-यांना माझी विनंती आहे ठीक आहे जे नगरसेवक आहेत, ते त्या त्या पक्षाच्या सत्ताधा-यांचा उदो उदो करतील. केले पाहिजे तो त्यांचा धर्म आहे. परंतु नागरीकांना जे आश्वासन दिले आहे त्याची पुर्तता मात्र आपण करावी,  त्यांची फसवणूक होणार नाही याची दक्षता आपण घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो. धन्यवाद.

**मा. एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह दोन वेळा उभा राहिलो दोन्ही वेळेला बसलो. खरतर राहुलदादा मी अभिनंदन करीन तुमचं. एक तासाचा नियमाने वेळ असताना, साडेतीन-चार तास, या विषयांवर आपण चर्चा करतोय. खरतर योगेशभाईंचे मी दत्ताकाका विरोधी पक्षनेता झाल्यानंतरचे आक्रमक भाषण ऐकले. त्यांना या शहरामधल्या लोकांची चिंता आहे. त्यांनी ज्या पोटतिडकीने गेल्या १५-२० वर्षापुर्वीचा इतिहास या ठिकाणी सगळयांसमोर सांगितला. दत्ताकाका मला आता बोलू दया ना. दत्ताकाका तुमचा आवाज तर आम्ही दाबला नाही ना. जेवढा वेळ तुम्हाला बोलायच होत तेवढा वेळ तुम्हाला मा. महापौरांनी बोलण्याची संधी दिली. आता आमचा नका दाबू, आता बोलू दया. आणि खर तर सगळया विशेषत: अनधिकृत बांधकामांच्या संदर्भामध्ये किती बांधकामे आहेत, ज्या ज्या वक्त्यांनी भाऊसाहेब भोईरांनी खूप चांगल बोललं. अजित गव्हाणेंनी चांगल भाषण केले. सचीन भोसलेने तर आमच्यावर टिका केली. त्यांचं म्हणण प्रामाणिकपणान होत की आम्ही पेढे वाटले नाही पाहिजे. साखर वाटली नाही पाहिजे. खरतर पिंपरी चिंचवडच्या शहराला म्हणजे दत्ताकाका बोलता बोलता तुमच्या मनामध्ये अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये आपल्या पार्टीची भूमिका काय आहे, हे खरतर राष्ट्रवादी कॉग्रेसने आणि शिवसेनेने एकदा ठरविले पाहिजे. आमची भूमिका काय आहे. अनधिकृत बांधकामे नियमित करणे ही तुमची भूमिका आहे. शास्तीकराच्या संदर्भात खरतर हे सगळे जुने विषय आहेत. म्हणजे सिमाताई ज्यावेळेस बोलत होत्या हे खर आहे. या शहरामध्ये अनधिकृत बांधकामाच्या विरोधामधल आंदोलन करायला नामदेव ढाके आम्ही सर्वजण होतो, शिवसेनेवाले खूप नंतर उतरले. नंतर म्हणजे हे आता आता दोन-तीन वर्षापुर्वी लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीच्या अगोदर त्यामुळे हा इतिहास आहे. खरतर या गोष्टींच्या संदर्भात मी सभागृहाला एवढंच सांगेन या शहरामध्ये अनेक बांधकामे म्हणजे १,७५,००० बांधकामे असेल सव्वादोन लाख बांधकामे असतील ७५,००० असतील जी काही संख्या राहुलदादा तुम्हाला दिली. खरतर मी लक्ष्मणभाऊंचा विशेष उल्लेख केला आहे. खरतर हे व्यासपीठ आहे ते लक्ष्मणभाऊंच सभागृह नाहीय. तर मी एवढच सांगेन लक्षात ठेवा कुणी तरी सांगितल की एखादा नेता आमच्या पक्षात होता आणि त्यावेळेस त्यांनी केले. खरतर एक गोष्ट आपल्या सगळयांनी मनामध्ये धरली पाहिजे ती खरी आहे. म्हणजे राष्ट्रवादीशी संलग्न असून सुध्दा या शहरामधल्या लोकांची बांधकामे नियमित होत नाहीत म्हणून सत्तेवर पाणी फेरणारा तो

आमदार होता हे लक्षात ठेवा आणि हे आपण विसरतोय. गेल्या १५ वर्षापासूनचा अनधिकृत बांधकामाचा विषय या शहरामध्ये आहे. कुठल्या राजकीय नेत्यांना वाटले, कॉंग्रेसला वाटलं, राष्ट्रवादी कॉंग्रेसला वाटलं. की हा प्रश्न सुटला पाहिजे. या प्रश्नाच वेळोवेळी निवडणुकीच्या काळामध्ये राजकारण करण्याचे काम खरतर आता आमची सत्ता आली. २०१४ ला केंद्रात आणि राज्यात आमची सत्ता आली. महापालिकेमध्ये मागच्या वर्षी आमची सत्ता आली. १५ वर्षे राज्यामध्ये तुम्ही सत्तेमध्ये आहात. खोटी आश्वासने कोणी दिली. आठवा ती मागची निवडणूक. मला आठवतय की मी खूप लहान कार्यकर्ता होतो. एका विधानसभेच्या निवडणुकीच्या काळामध्ये मी सांगतो ना तुम्हाला. खोटा जीआर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी खोटा जीआर वाटला.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर तुमच्या सर्वांचे भाषण मी शांतपणे ऐकले. शास्तीकराच्या संदर्भामध्ये राहुलदादा तुम्ही बोलले, योगेश बहल बोलले. शास्तीकराचा निर्णय सुध्दा भारतीय जनता पार्टीने केला. हे लक्षात ठेवा. हे या सभागृहाच्या माध्यमातून लोकांना सांगण्याची गरज आहे. एक गोष्ट लक्षात ठेवा.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर -** पक्षनेते विषयावरती बोला.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर -** विषय क्रमांक ४ वाचावा.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- १९१ विषय क्रमांक- ४

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/कावि/२२५/२०१८ दि.१०/४/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९३ दि.२५/०४/२०१८

३) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६२८ दि. २/०५/२०१८

झोनिपु विभागामधील जी विकासकामे चालू आहेत किंवा पुर्ण झाली आहेत, त्यासाठी दि.३१/०३/२०१८ पुर्वी बिलाची रक्कम देता येणे शक्य नाही अशा ठेकेदारांना

अंदाजपत्रकीय रक्कम तातडीने उपलब्ध करुन बिले अदायगी करण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना मा.आयुक्त पिं.चिं. मनपा यांनी दि.३१/०३/२०१८ चे पत्र क्र.स्था/लेखा/७/कावि/२५३/१८ अन्वये केली आहे. त्यास अनुसरुन झोनिपु स्थापत्य विभागाकडील वर्गीकरण करणे बाबतची प्रस्तावात नमुद केलेली विकास कामे समायोजित करून, सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशिर्षामध्ये वाढ/घट करुन सुधारीत तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

(भांडवली वाढ/घट र.रू.१७,९०,६७३/-) (महसुली वाढ/घट र.रु.३१,७५,५३१/-)

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- १९२ विषय क्रमांक- ५

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/५०३२/२०१८ दि.१७/०४/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९५ दि.२५/०४/२०१८

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ह या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/ मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/ प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.४,२८,६६,४७२/- (अक्षरी र.रू.चार कोटी अठ्ठावीस लाख सहासष्ठ हजार चारशे बाहत्तर फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- १९३ विषय क्रमांक- ६

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.लेखा/६/कावि/५०३४/२०१८ दि.१७/०४/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९६ दि.२५/०४/२०१८

सह शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील जलनि:सारण इ, ह क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. प्रस्तावात नमुद केले प्रमाणे विभागाअंतर्गत र.रु.१२,००,०००/- (अक्षरी र.रू. बारा लाख फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- १९४ विषय क्रमांक- ७

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.लेखा/६/कावि/५०३१/२०१८ दि.११/०४/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९७ दि.२५/०४/२०१८

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील ग या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रू.७३,२६,०००/- (अक्षरी र.रू.त्रयाहत्तर लाख सव्वीस हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- १९५ विषय क्रमांक- ८

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.लेखा/६/कावि/५०२९/२०१८ दि.१७/०४/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९८ दि.२५/०४/२०१८

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील फ या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद

झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.५,०८,३९,५९०/- (अक्षरी र.रू.पाच कोटी आठ लाख एकोणचाळीस हजार पाचशे नव्वद फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, ज्यावेळेला बजेटची मिटींग चालू होती त्यावेळेला आम्ही तुम्हांला सांगत होतो की प्रभागामध्ये हा प्रॉब्लेम झालेला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ९

दिनांक – २२.६.२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५०३०/२०१८ दि.१७/०४/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२५९९ दि.२५/०४/२०१८

शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील इ या क्षेत्रिय कार्यालयाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची दि.३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. सदर बिलांची अदायगी करणे आवश्यक आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे र.रु.२,२६,७१,०००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी सव्वीस लाख एक्काहत्तर हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

उपजिविका अभियान या केंद्र शासन पुरस्कृत नागरी बेघराना निवारा या घटकांतर्गत पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र. पिंपरी कॅम्प १९., वाणिज्य व भाजीमंडई इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे व दुरुस्त करणे प्रस्तावित आहे. सदर कामाचा विस्तृत DPR प्रकल्प अहवालास मनपा सभा ठराव क्रमांक ७२ दि.१९/०८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सबब खालील प्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.१९, पिपरी कँप वाणिज्य व भाजीमंडई इमारतीमधील जुने रात्रनिवारा केंद्र वाढविणे व दुरुस्त करणे. | १,००,००,०००/- |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८७ दि. २०/०४/२०१८ मधील अनुक्रमांक ६ अन्वये प्रभाग क्र. २ मधील ताब्यात असलेले डी.पी.रस्ते विकसीत करणे या कामामध्ये खालीलप्रमाणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत व कामाच्या नावात बदल करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | ठराव क्र. १८७, दि.२०/०४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ ची मंजूर तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील डि.पी.व | ३७ | १६२ | विशेष योजना | ४०,००,००,००० | २,००,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नॉन डि.पी.रस्ते विकसीत करणे. | | | | | | |

तसेच खाली नमुद केलेली कामे व त्याची अंदाजपत्रकीय रक्कम दि.२७/०३/२०१८ च्या मा.महापालिका सभेमध्ये समाविष्ठ करणेबाबतचा ठराव करणेत आलेला आहे. सदरची कामांची निविदा प्रक्रिया करणेकामी खाली नमुद केलेल्या कामाच्या पुढे तरतुदीप्रमाणे वाढ करणेस, व वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ ची तरतूद | सन २०१८-१९ साठी असणारी तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ जाधववाडी कुदळवाडी मधील अस्तित्वातील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | २५ | १५० | ३०,००,००,००० | - | २,००,००,००० | |
| २ | प्रभाग क्र. २ बो-हाडेवस्ती बनकरवस्ती मधील | २६ | १५१ | ३०,००,००,००० | - | २,००,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अस्तित्वातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे | | | | | | |
| ३ | प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी बनकरवस्ती बारणेवस्ती मध्ये ठिकठिकाणी रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक व गटर्स करणे. | १२ | ६६ | ३७,५०,००० | - | २०,००,००० | |
| ४ | प्रभाग क्र. २ मोशी देहु आळंदी रस्त्याच्या बाजूच्या परीसरातील भागात पेव्हींग ब्लॉक व गटर्स करणे. | १२ | ६९ | ३७,५०,००० | - | २०,००,००० | |
| ५ | प्रभाग क्र. २ | १९ | १०० | ७५,००,००० | - | ५०,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मध्ये जाधववाडी, बनकरवस्ती, बो-हाडेवाडी येथे कमानी उभारणे | | | | | | |
| ६ | प्रभाग क्र. २ चिखली मधील से.नं. १६ राजेशिवाजी नगर मध्ये फुटपाथ विकसीत करणे | २७ | १७५ | १,५०,००,००० | - | ५०,००,००० | |
| | एकूण | | | ६३,००,००,००० | - | ५,४०,००,००० | |

तसेच केंद्रशासनाने भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना “सर्वांकरिता घरे २०२२” मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात शासनाने कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणुक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR (Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकासमंडळाच्या कार्यालयाकडे सादर

करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मागणी सर्व्हेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार पिंपरी स.नं.१७५ पै. येथील मनपाचे ताब्यातील प्लॉटवर HDH (Houses for Dis houses) च्या आरक्षित जागेवर घरकुल प्रकल्प राबविणेचे नियोजन करणेत आले आहे. सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील बेघरांसाठी घरे (HDH) या आरक्षणांतर्गत सदर जागा ताब्यात आलेली आहे.

तक्ता अ

या प्लॉटचे क्षेत्रफळानुसार येथे २५० घरे बांधणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या संभाव्य खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं. | जागेचे एकुण क्षेत्र चौ.मी. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र चौ.मी. | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ५७ (HDH आरक्षित) | १७५ पै | ४२८३.७६ | ४२८३.७६ | २५० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. प्लॉटला संलग्न रस्त्याचे प्रयोजन झालेनंतर निविदा काढण्यात येईल. |

तक्ता ब

सदर प्रकल्पाचे अंतर्गत पाणी, ड्रेनेज, दिवाबत्ती व इतर सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणारा अंदाजपत्रकीय खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत दुरुस्ती | रस्ते | पावसाळी गटर व Rain Water harvesting | पा.पु. | डेनेज | मल शुध्दीकरण केंद्र (STP) | घन कचरा व्यवस्थापन S.W.M. | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण रु. लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व आकडे लक्ष मध्ये | | | | | | | | | | |
| १ | पिंपरी | २.०० | २०.०० | १२.०० | ४.०० | २०.०० | ३०.०० | १.०० | ५.०० | ९४.०० |

तक्ता क

सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) खालीलप्रामणे-

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| पिंपरी स.नं.१७५ पै. | ७९ | २५० | २३,००,५०,०००/- |

प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा. र.रु.९,२०,२००/- इतका आहे. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१६८८/- इतका येत आहे.

सदनिकाच्या खर्चाचे वाटप खालीलप्रमाणे.

१) केंद्रशासन - रु.१.५० लक्ष अनुदान

२) राज्यशासन - रु. १.०० लक्ष अनुदान

३) लाभार्थी हिस्सा- रु. ६.७० लक्ष

एकूण - रु. ९.२० लक्ष

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिका निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणा-या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्यांकडून घेणार नाही.

तक्ता ड

पंतप्रधान आवास योजनेकरिता प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशिल | प्रकल्प खर्च | Infra खर्च | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | २३,००,५०,००० | ९४,००,००० | २३,९४,५०,००० |
| २ | ५% Contingencies सह | २४,१५,५२,५०० | ९८,७०,००० | २५,१४,२२,५०० |
| ३ | २% Work Charges establishment Charges सह | २४,६३,८३,५५० | १,००,६७,४०० | २५,६४,५०,९५० |
| ४ | ५% भाववाढ (Escalation) | १,१५,०२,५०० | ४,७०,००० | १,१९,७२,५०० |
| एकूण (३+४) | | २५,७८,८६,०५० | १,०५,३७,४०० | २६,८४,२३,४५० |
| एकूण रु. | | २५.७९ कोटी | १.०५ कोटी | २६.८४ कोटी |

वरील तक्ता-ड नुसार केंद्रशासन, राज्यशासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधुन पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २५० सदनिका बांधणेकामी र.रु.२५.७९ कोटी व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणा-या र.रु.१.०५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. व पिंपरी स.नं.१०९ पै व ११० पै आरक्षण क्र. ७९ या जागेवर यापुर्वी मा.महापालिका सभेने व शासनाने मंजुर केलेल्या पंतप्रधान आवास योजनेचा प्रकल्प त्याऐवजी पिंपरी स.नं. १७५ पै येथील आरक्षण क्र. ५७ येथे राबविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा. चंद्रकांत नखाते –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- २०२ विषय क्रमांक – १५

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/०६/कावि/५०३५/२०१८ दि.१७/४/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६०५ दि.२५/०४/२०१८

पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता भाग-३ मध्ये ठेकेदार अनामत या लेखाशिर्षावर र.रु.१५० कोटी तरतुद करण्यात आलेली होती. दिनांक ६/१/२०१८ पर्यन्त एकूण र.रु.१४७.२८ कोटी प्रत्यक्ष खर्च झाल्याने सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजपत्रकात र.रु.१०० कोटी वाढ करुन पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता भाग-३ मध्ये ठेकेदार अनामत या लेखाशिर्षावर र.रु.२५० कोटी तरतुद करण्यात आलेली होती. दिनांक १६/३/२०१८ पर्यंत एकूण र.रु.२४९.९८ कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला असून एक लाख छत्तीस हजार शिल्लक होते. सदरचे आर्थिक वर्षामध्ये बयाणा व सूरक्षा ठेवीची रक्कम मोठया प्रमाणात घेतल्या गेल्याने ही तरतुद मुदतीपूर्वीच संपलेली आहे व ठेकेदारांकडील बयाणा व सूरक्षा ठेवीची रक्कम अदा करणे प्रलंबित होते. यापुढे मार्च १८ वर्ष अखेरीस साधारणतः १० दिवस कालावधी बाकी असल्याने त्यावर वाढीव र.रु.१५० कोटी तरतूद करणे आवश्यक होते वाढीव अनामत रकमेसाठी दि.२०/३/२०१८ च्या मा.महापालिका सभेत उपसूचना सादर करुन वाढ करणे शक्य होते. मात्र सदरची उपसूचना मंजूर होण्यास ७ ते ८ दिवसाचा कालावधी जाणार असल्याने तोपर्यंत अनामत परतावा प्रकरणे प्रलंबित ठेवणे योग्य होणार नव्हते, र.रुपये १५० कोटीची रक्कम तातडीने अदा करणेकामी तरतूदीत वाढ करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मध्ये नमूद केलेप्रमाणे ठेकेदार अनामत रकमेवर र.रु.१५० कोटी वाढ करणेत आलेली आहे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) नुसार "कोणत्याही आणिबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा मनपाच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणिबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्या त्या अधिनियमान्वये दुस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा

प्राधिका-या शिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे परंतू आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाचे तरतूदीन्वये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महापालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे. मा.आयुक्त यांचेकडील दि.१९/३/२०१७ चा प्रस्ताव अन्वये सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात भाग-३ मध्ये र.रु.१५०,००,००,०००/- (अक्षरी र.रु.दीडशे कोटी फक्त) लेखा विभागाकडील "ठेकेदार अनामत" या लेखाशिर्षावर वाढ करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार वाढ करण्यात आलेल्या रक्कमे विषयीचे इतिवृत्त अवलोकन करणेत आले. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश नसलेले व काम करणे आवश्यक असलेले काम खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचा प्रथमत: अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार खाली नमुद केलेल्या कामांचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व सदर कामांच्या नावासमोर दर्शविलेली अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (२०१८-१९) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण येथील अंतर्गत रस्ते आवश्यकतेनुसार कॉंक्रीटीकरण करणे. | ५,००,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण सर्व्हे नं.९ येथे वाहनतळ विकसित करणे. | २,००,००,०००/- |
| | एकूण | ७,००,००,०००/- |

तसेच रावेत येथील जलउपसा केंद्र येथे पवना नदीमधील व इनटेक चॅनल मधील गाळ व कचरा काढणे या कामाचा महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन त्यासाठी होणा-या र.रु. ४०,००,०००/- चे खर्चास

प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच बी.आर.टी.एस.विभागाकडील विविध विकास कामांना काळेवाडी फाटा (धर्मवीर संभाजी महाराज चौक) ते पिंपरी (काळेवाडी)ग्रेड सेपरेटर बांधणे या कामाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात नाव व तरतूद नसल्यामुळे सदर कामास व अंदाजपत्रकीय खर्चास रु. १४००००००/- यांस नव्याने प्रशासकीय मान्यता दि. १६/१०/२०१७ रोजीच्या मा.महापालिका सभा अन्वये मंजुर करण्यात आली होती. तथापि जी.एस.टी. कर प्रणाली व डी.एस.आर. आणि एस.एस.आर. या दरसूचीतील दर फरक तसेच काही तांत्रिक बदलाव केल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेत वाढ झाली असून सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३५००००००/- यांस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकात समाविष्ठ खालील कामांस अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेबाबत व तसेच आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधुन वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | प्रशासकीय र.रु. | पान क्र. | अनु.क्र. | आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ मध्ये ताब्यात आलेल्या डीपी रस्त्याला प्रकाश व्यवस्था करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ३८ | १००००००० |
| २ | प्रभाग क्र.२ मध्ये विविध ठिकाणी विदयुतविषयक काम करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ३९ | १००००००० |
| ३ | प्र.क्र. २ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४० | १००००००० |
| ४ | प्र.क्र. २ मधील नियोजीत रस्त्यावर दिवाबत्तीवी व्यवस्था करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४१ | १००००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्र.क्र. २ मध्ये नव्याने होणा-या उदयानामध्ये विदयुतविषयक व इतर अनुषंगिक कामे करणे. | उदयाने | २००००००० | ३२० | ११ | ७०००००० |
| ६ | प्र.क्र. २ मधील उदयानांमध्ये विदयुतविषयक नुतनीकरणाची कामे करणे. | उदयाने | २००००००० | ३२० | १२ | ७०००००० |
| ७ | प्र.क्र. २ मधील विविध ठिकाणी CCTV बसवणे | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | | | १००००००० |
| ८ | प्र.क्र २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे या कामात विदयुतविषयक कामे करणे. | इमारत,शाळा,शॉपिंग सेंटर | १००००००० | | | ४०००००० |
| | एकुण | | १५००००००० | | | ६८०००००० |

तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये भाग-३ जमा व खर्चात शिक्षक कल्याण निधी नावाचे लेखाशिर्ष नाही व शिक्षक सोसायटी या लेखाशिर्षावर अपुरी तरतूद असल्याने शिक्षक कल्याण निधी नावाचे नविन लेखाशिर्ष भाग तीन मध्ये निर्माण करण्यास आणि जमा व खर्च बाजूस र.रु.२०,०००/- (र.रु. वीस हजार फक्त) तरतुद करण्यास व शिक्षक सोसायटी लेखाशिर्षावर जमा व खर्च बाजूस र.रु.

१०,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दहा कोटी फक्त) वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ९ मधील आण्णासाहेब मगर स्टेडियम अंतरराष्ट्रीय दर्जाचे व संपुर्ण स्टेडियमचे एकत्रीतरित्या नियोजन करून करावयाचे आहे. त्यामुळे प्रभाग क्र. ९ मधील अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे प्रेक्षक गॅलरी, हॉस्टेल बिल्डींग बांधणे व मैदाने विकसीत करणेचे काम याच प्रभागामध्ये इतर ठिकाणी करणे आवश्यक आहे. प्रभाग क्र. ९ मधील अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे प्रेक्षक गॅलरी, हॉस्टेल बिल्डींग बांधणे व मैदाने विकसीत करणे या कामाअंतर्गत मुस्लीम दफनभुमी येथे संरक्षणभिंत (Retaining wall) बांधणे व प्रभाग क्र.९ मध्य इतर वॉर्डस्तरीय स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये खालील कामाचा समावेश आहे कार्यालयीन कामकाजाकरिता सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. (पा.क्र. २६९ अ.क्र.२१०)

| लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. (सन २०१८-१९ साठी) | सुधारित अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|---|---|
| स्थापत्य उदयाने | पिंपरी प्रभाग क्र. २१ मधील आ.क्र. १६६ येथे उदयान विकसीत करणे. | २१ | २२५०००० | ५००००००० |

तरी सदरच्या विषयास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा विशेष योजनेअंतर्गत समावेश करणेस व या विषयास अनुसरुन नागरिकांच्या सोयीच्या व पर्यटनाच्या दृष्टीने सदर ठिकाणी खालील कामे करणे आवश्यक आहे. प्रभाग क्र. १० मध्ये वाहतुक विषयी वर्दळ पाहता ट्रॅफिक आयलँड विकसित करणे अत्यंत महत्वाचे आहे जेणेकरुन अपघाताचे प्रमाण कमी होईल. तसेच मोरवाडी मध्ये मुलांसाठी खेळाचे मैदान अस्तित्वात नाही तरी सदर

ठिकाणी खेळाचे मैदान मुलांसाठी व नागरिकांच्या सोयीच्या दृष्टिने विकसीत करणे महत्वाचे आहे सबब खालीलप्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. १० मधील विविध चौकांचे सुशोभिकरणाची कामे करणे. | ८,००,००,०००/- |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र. १० मधील आरक्षण क्र.९४ खेळाचे मैदाने विकसित करणे. | ८,००,००,०००/- |

प्रभागातील आवश्यक बाबीचे अवलोकन करता खालील चालु कामे सन २०१८-१९ वर्षातील अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र. | संबंधित विभाग | लेखाशिर्षक | कामाचे नाव | अंदाजपत्रकातील रक्कम | सन २०१८-१९ ची आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ मुख्यालय स्थापत्य | स्थापत्य विषयक कामे करणे. | अ प्रभागात विविध कार्यक्रमांकरीता मंडप व्यवस्था करणे (उदघाटने, क्रिडा स्पर्धा,भुमीपुजन इ.) | २५००००० | ० |
| २ | अ मुख्यालय स्थापत्य | स्थापत्य विषयक कामे करणे. | अ प्रभागात विविध कार्यक्रमांकरीता मंडप विषयक कामे करणे. | १५००००० | ० |
| | | | एकूण | ४०००००० | ० |

तरी वरील चालु कामे सन २०१८-१९ मध्ये समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा विशेष योजनेअंतर्गत समावेश करणे या विषयास अनुसरुन दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान या केंद्र शासन पुरस्कृत नागरी बेघराना निवारा या घटकांतर्गत पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र. पिंपरी कॅम्प १९., वाणिज्य व भाजीमंडई इमारतीमधील जुने रात्र निवारा केंद्र वाढविणे व दुरुस्त करणे प्रस्तावित आहे. सदर कामाचा विस्तृत DPR प्रकल्प अहवालास मनपा सभा ठराव क्रमांक ७२ दि.१९/०८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सबब खालील प्रमाणे नविन कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.१९, पिपरी कँप वाणिज्य व भाजीमंडई इमारतीमधील जुने रात्रनिवारा केंद्र वाढविणे व दुरुस्त करणे. | १,००,००,०००/- |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८७ दि. २०/०४/२०१८ मधील अनुक्रमांक ६ अन्वये प्रभाग क्र. २ मधील ताब्यात असलेले डी.पी.रस्ते विकसीत करणे या कामामध्ये खालीलप्रमाणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत व कामाच्या नावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | ठराव क्र. १८७, दि.२०/०४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ ची मंजूर तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील डि.पी.व नॉन डि.पी.रस्ते विकसीत करणे. | ३७ | १६२ | विशेष योजना | ४०,००,००,००० | २,००,००,००० | |

तसेच खाली नमुद केलेली कामे व त्याची अंदाजपत्रकीय रक्कम दि.२७/०३/२०१८ च्या मा.महापालिका सभेमध्ये समाविष्ठ करणेबाबतचा ठराव करणेत आलेला आहे. सदरची कामांची निविदा प्रक्रिया करणेकामी खाली नमुद केलेल्या कामाच्या पुढे तरतुदीप्रमाणे वाढ करणेस, व वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ ची तरतूद | सन २०१८-१९ साठी असणारी तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ जाधववाडी कुदळवाडी मधील अस्तित्वातील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | २५ | १५० | ३०,००,००,००० | - | २,००,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र. २ बो-हाडेवस्ती बनकरवस्ती मधील अस्तित्वातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे | २६ | १५१ | ३०,००,००,००० | - | २,००,००,००० | |
| ३ | प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी बनकरवस्ती बारणेवस्ती मध्ये ठिकठिकाणी रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक व गटर्स करणे. | १२ | ६६ | ३७,५०,००० | - | २०,००,००० | |
| ४ | प्रभाग क्र. २ मोशीदेहु आळंदी रस्त्याच्या बाजूच्या परीसरातील भागात | १२ | ६९ | ३७,५०,००० | - | २०,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पेव्हींग ब्लॉक व गटर्स करणे. | | | | | | |
| ५ | प्रभाग क्र. २ मध्ये जाधववाडी, बनकरवस्ती, बो-हाडेवाडी येथे कमानी उभारणे | १९ | १०० | ७५,००,००० | - | ५०,००,००० | |
| ६ | प्रभाग क्र. २ चिखली मधील से.नं. १६ राजेशिवाजी नगर मध्ये फुटपाथ विकसीत करणे | २७ | १७५ | १,५०,००,००० | - | ५०,००,००० | |
| | एकूण | | | ६३,००,००,००० | - | ५,४०,००,००० | |

तसेच केंद्रशासनाने भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांकरिता घरे २०२२" मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात शासनाने कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून

नेमणुक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR (Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकासमंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मागणी सर्व्हेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार पिंपरी स.नं.१७५ पै. येथील मनपाचे ताब्यातील प्लॉटवर HDH (Houses for Dis houses) च्या आरक्षित जागेवर घरकुल प्रकल्प राबविणेचे नियाजन करणेत आले आहे. सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील बेघरांसाठी घरे (HDH) या आरक्षणांतर्गत सदर जागा ताब्यात आलेली आहे.

तक्ता अ

या प्लॉटचे क्षेत्रफळानुसार येथे २५० घरे बांधणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या संभाव्य खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं. | जागेचे एकुण क्षेत्र चौ.मी. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र चौ.मी. | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ५७ (HDH आरक्षित) | १७५ पै | ४२८३.७६ | ४२८३.७६ | २५० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. प्लॉटला संलग्न रस्त्याचे प्रयोजन झालेनंतर निविदा काढण्यात येईल. |

तक्ता ब

सदर प्रकल्पाचे अंतर्गत पाणी, ड्रेनेज, दिवाबत्ती व इतर सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणारा अंदाजपत्रकीय खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत दुरुस्ती | रस्ते | पावसाळी गटर व Rain Water harvesting | पा.पु. | ड्रेनेज | मल शुध्दीकरण केंद्र (STP) | घन कचरा व्यवस्थापन S.W.M. | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण रु. लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व आकडे लक्ष मध्ये | | | | | | | | | | |
| १ | पिंपरी | २.०० | २०.०० | १२.०० | ४.०० | २०.०० | ३०.०० | १.०० | ५.०० | ९४.०० |

तक्ता क

सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) खालीलप्रामणे-

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| पिंपरी स.नं.१७५ पै. | ७९ | २५० | २३,००,५०,०००/- |

प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा. र.रु.९,२०,२००/- इतका आहे. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१६८८/- इतका येत आहे.

सदनिकाच्या खर्चाचे वाटप खालीलप्रमाणे.

४) केंद्रशासन - रु.१.५० लक्ष अनुदान

५) राज्यशासन - रु. १.०० लक्ष अनुदान

६) लाभार्थी हिस्सा- रु. ६.७० लक्ष

एकूण - रु. ९.२० लक्ष

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिका निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणा-या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्याकडून घेणार नाही.

तक्ता ड

पंतप्रधान आवास योजनेकरिता प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशिल | प्रकल्प खर्च | Infra खर्च | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | २३,००,५०,००० | ९४,००,००० | २३,९४,५०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ५% Contingencies सह | २४,१५,५२,५०० | ९८,७०,००० | २५,१४,२२,५०० |
| ३ | २% Work Charges establishment Charges सह | २४,६३,८३,५५० | १,००,६७,४०० | २५,६४,५०,९५० |
| ४ | ५% भाववाढ (Escalation) | १,१५,०२,५०० | ४,७०,००० | १,१९,७२,५०० |
| एकूण (३+४) | | २५,७८,८६,०५० | १,०५,३७,४०० | २६,८४,२३,४५० |
| एकूण रु. | | २५.७९ कोटी | १.०५ कोटी | २६.८४ कोटी |

वरील तक्ता-ड नुसार केंद्रशासन, राज्यशासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधुन पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २५० सदनिका बांधणेकामी र.रु.२५.७९ कोटी व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणा-या र.रु.१.०५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व पिंपरी स.नं.१०९ पै व ११० पै आरक्षण क्र. ७९ या जागेवर यापुर्वी मा.महापालिका सभेने व शासनाने मंजुर केलेल्या पंतप्रधान आवास योजनेचा प्रकल्प त्याऐवजी पिंपरी स.नं. १७५ पै येथील आरक्षण क्र. ५७ येथे राबविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १६

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.स्था/बीआरटीएस/१४८/२०१८ दि.३/५/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६३७ दि.९/०५/२०१८

बोपखेल गावासाठी दापोडी येथून CME हद्दीतून जाणारा रस्ता मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दि.१३/५/२०१५ रोजी CME द्वारे बंद करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यापुर्वी सुचविल्याप्रमाणे मुळा नदीवरील पुल ते खडकीतून जाणारा Elphistone Road व्हाया टँक रोड हा रस्ता पक्क्या स्वरुपात करण्याच्या अनुषंगाने या विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. दि. २४/६/२०१६ रोजी पिंपरी चिंचवड मनपामार्फत Defence Estate Officer (DEO) यांचेकडे बोपखेल वासियांसाठी मुळा नदीवर स्वरुपातील पुल व पक्का रस्ता बांधणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला. मनपामार्फत सादर प्रस्तावास अंतिम करणेकामी संरक्षण खात्याचे विविध विभागांचे अधिका-यांचा समावेश असणारे Board of Officers चे दि.८/८/२०१६ रोजी गठण करण्यात आले आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने संरक्षण खात्याचे विविध विभाग जसे की, Station Head Quarter (Station H.Q.), Ammination Factory Kirkee (AFK), Defence Estate Officer (DEO), Kirkee Cantonment Board (KCB), Army Base Workshop (ABW) यांचे प्रतिनिधी समवेत वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. या बैठकादरम्यान संरक्षण खात्याचे विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या विविध सूचनांचा अंतर्भाव करुन पिंपरी चिंचवड मनपामार्फत दि.०५/१०/२०१६ चे पत्रान्वये अंतिम प्रस्ताव Board of Officers यांचे समोर ठेवण्यात आला आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.Civil/BRTS/1028/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये Station Commandant, ब्रिगेडीयर धिरज मोहन यांना विषयांकित पुलाचे प्रस्तावाचे अनुषंगाने सद्यस्थितीबाबत आढावा बैठक आयोजित करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच पत्र क्र. Civil/BRTS/1027/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये, श्री.मनिष ठाकुर (IAS) जॉईंट सेक्रेटरी (Works) केंद्र शासन यांना विषयांकित बोपखेल गावासाठीच्या पुलाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी विनंती केलेली आहे.

उपरोक्त नमुद दिनांक २/१/२०१८ D.O. Letter चे अनुषंगाने राजेंद्र पवार, रक्षा संपदा अधिकारी, पुणे मंडल यांनी त्यांचे दि.४/४/२०१८ चे पत्रान्वये विषयांकित, बोपखेल गावासाठी मुळा नदीवर पूल बांधणे व पोहोच रस्ता बांधणे कामी आवश्यक असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेची किंमत र.रु.२५,८१,५१,२००/- असलेबाबत कळविले आहे. तसेच उपरोक्त नमुद जागेच्या बदल्यात संरक्षण विभागात कोणती जागा

हस्तांतरीत करणार अथवा जागा हस्तांतरण बाबत मनपाचे काय म्हणणे आहे हे कळविण्यास सांगितले आहे.

वरील सर्व बाबींचे अनुषंगाने निर्णय घेताना खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१) बोपखेल गावासाठी बांधावयाच्या पोहोच रस्ता हा मनपा हद्दी बाहेरचा आहे.

२) सदर पूल व रस्ता बांधणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.८९०, दि.२० जुन २०१६ अन्वये र.रु.४२.०० कोटी एवढ्या खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

३) मनपाने दि.५/१०/२०१६ रोजी संरक्षण खात्याकडे सादर केलेल्या अंतिम प्रस्तावात पूल व रस्ता बांधणेसाठी संरक्षण विभागाची आवश्यक जागा विनामोबदला (Free of Cost) मिळावी अशी विनंती केली आहे.

वरील विवेचन विचारात घेऊन, सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भिमाबाई फुगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो- मे.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे/पिंपरी चिंचवड शहरामध्ये व्हावे यासाठी गेली अनेक वर्षापासुन पुणे, पिंपरी चिंचवड मधील नागरिक, कामगार, सर्व वकील-बार असोसिएशन व पुणे विभाग प्रयत्नशील आहेत. पुणे शहर हे विदयेचे माहेरघर असल्याने येथे शिक्षणासाठी आलेले लोक नंतर नोकरी-धंदयासाठी इथेच स्थायिक होतात. पुणे/पिंपरी चिंचवड शहरात मा.उच्च न्यायालय, मुंबईचे खंडपीठ नसल्याने समाजातील सर्व घटकांना, नागरिकांना मुंबई येथे वारंवार जावे लागते. त्यामुळे जनतेचा नाहक खर्च होतो व वेळही वाया जातो. पुणे/पिंपरी चिंचवड शहरात मे. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ निर्माण झाल्यास समाजातील सर्व घटकांची, पुणे क्षेत्रातील जनतेची गैरसोय दुर होईल व दावे वेळेवर निकाली निघण्यास मदत होईल. अशी सर्व पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह नजिकच्या जिल्हयातील नागरिकांची इच्छा आहे. सदर मागणी रास्त असून नागरिकांच्या हिताची व मे.न्यायालयाच्या कामात गतिमानता आणणारी आहे. तरी मे. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे/पिंपरी चिंचवड शहर क्षेत्रामध्ये होणेसाठी मान्यता देणेत यावी व तसे शासनास कळवणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या मंजुर विकास योजनेत काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावरील चिंचवड येथे पवना नदीजवळ ४५ मी. रस्त्याच्या

दोन्ही बाजूस चढण्यास व उतरण्यास रँप आवश्यक आहे. तरी चिंचवड येथील स.नं. ६४ मध्ये ४५ मी. रस्त्यावर चढणेसाठी १२ मी. रँप व रॅपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३००० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच चिंचवड येथील स.नं.६६ व ६५ मध्ये ४५ मी. रस्त्यावरुन उतरणेसाठी १२ मी. रँप व रँपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३६०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर दोन्ही क्षेत्र मंजूर विकास योजनेत रस्त्यासाठी आरक्षित नाही.

तरी चिंचवड येथील स.नं. ६४ मध्ये ४५ मी. रस्त्यावर चढणेसाठी १२ मी. रँप व रॅपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३००० चौ.मी. क्षेत्र व स.नं.६६ व ६५ मध्ये ४५ मी. रस्त्यावरुन उतरणेसाठी १२ मी. रँप व रँपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३६०० चौ.मी. क्षेत्र असे एकूण ६६०० चौ.मी मनपा विकास योजनेत आरक्षित नसलेले क्षेत्र नविन भूसंपादन कायदयानुसार किंवा खाजगी वाटाघाटीने तातडीने ताब्यात घेणेबाबत मान्यता मिळणेकामी व उपरोक्तबाबत मा.आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार देणेत यावे. सबब उपरोक्त रँपसाठी आवश्यक आरक्षित नसलेले क्षेत्र नविन भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा. घुले नानी उर्फ हिराबाई :-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड शहरामध्ये बोपखेलकडे जाण्यासाठी सीईएमइकडे जाणारा वर्षोनुवर्षे रस्ता बंद करण्यात आला आहे. बोपखेल वासियांना **गेले** अनेक वर्षे वनवास सहन करायला लागला आहे. पिंपरीला किंवा पुण्याला जाताना १५ ते २० किमी वळसा घालून जावे लागायचे त्यामुळे बोपखेल वासियांचा वेळ व पैसा वाया जायचा. मुलांना नोकरीला जाणा-यांची मोठी आडचण झाली आहे. काही मुलांना शिक्षणापासूनही वंचित रहावे लागले. रस्त्यासाठी आंदोलनेही झाली. त्यामुळे २०० बोपखेल वासियांना तुरुंगवास ही भोगावा लागला आहे. तसेच जवळजवळ तीन वेळा उपोषणासाठी बसावे लागले. तसेच महिला डिलीव्हरीसाठी व नागरीकांना, अटॅक सारख्या रग्णांना आपले प्राणही गमवावे लागले. मात्र आज बोपखेल गावाच्या या मुलांना आंदोलनामुळे खूप त्रास झालेला आहे. आज आंदोलनामुळे आत गेलेले १०० ते १२५ मुले आहेत. तर त्या मुलांना नोकरी मिळत नाही.

नोकरी मिळण्यासाठी पोलीसांकडील व्हेरीफिकेशन मागतात. वॉचमनची जरी नोकरी मागितली तरी पोलीस व्हेरीफिकेशन मागतात. तरी त्या मुलांनी करायच काय. त्यांच्या वर तर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. कोणी वॉचमनची नोकरी देत नाहीत किंवा बिगारी कामासाठी गेल तरी ४०० ते ५०० रुपये मिळणार त्याच्यातून अर्धे पैसेतर येण्याजाण्यातच जाणार आहेत. रस्त्यामुळे खूप मुलांचे नुकसान झालेले आहे. आज मुलांचे लग्नाचे वय झालेले आहे. स्थळ जर आली तर विचारतात की सर्व्हीसला कुठे आहे, शेती आहे का, सांगणार तर काय सांगणार ना. आई वडीलांना या गोष्टीचे खूप दु:ख झालेले आहे. तर आज मी सभागृहाला विनंती करते की आज त्यांच जे दु:ख आहे त्यांच्या डोक्यावर जे ओझे आहे त्यासाठी सर्व सभागृहाने हात लावला तर त्यांचे ओझे उचलले जाईल माझी एवढीच विनंती आहे. आज माझ गाव अनाथ झालेले आहे तरी या गावासाठी म्हणजे एखादया मुलाला आईवडील नसेल तर ते मुल कस अनाथ झालेले असतं तस बोपखेल गाव अनाथ झालेले आहे. एवढी विनंती आहे की सगळयांनी सहकार्य करा. मात्र भाजपा सरकारमुळे ही गैरसोय टळणार आहे. बोपखेल वासियांच्या समस्या टळणार आहेत. आज सर्वसाधारण सभा यास मान्यता देईल अशी खात्री आहे. “सबका साथ सबका विकास” असे म्हणणारे मा.मोदी साहेब यांचे मी आभार मानते, सर्वांचे आभार मानते आणि थांबते.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आज बोपखेलच्या पुलाचा विषय आपल्या सभागृहापुढे आलेला आहे. आज माझ्या मातोश्री नानींनी बोपखेलच्या पुलाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. कुणीतरी पाठीमागून म्हटले की लिहून दिलय. जरुर लिहून दिलय, जरुर लिहून दिलय मातोश्री आहेत माझ्या त्या परंतु त्याच्यामध्ये त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. आज जे कोणी म्हटले असतील ते. आमच्या नानींनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. आमच्या नागरीकांना जो त्रास होत आहे. तो व्यक्त केला आज बोपखेलचा रस्ता बंद करुन तीन वर्षे झाले आहे. तीन वेळा नागरीकांनी उपोषण केले आहे. आंदोलन झाले त्याला हिंसक वळण लागले. जवळजवळ ८०० जणांवर गुन्हा दाखल झाला. १७८ जण जेलमध्ये होते. त्यातले १०४ जण पुरुष आणि ७४ महिला १५ दिवस जेलमध्ये होते. आज आमच्या भावना आम्हाला माहिती आहेत म्हणून आमच्या नानीं इथं बोलल्या. त्याच्यात एका पोलीस कर्मचा-याला आपला जीव गमवावा लागला. आज तुम्ही जर अवलोकन केले तर दोन किमी.च्या

रस्त्याला अठरा किमी. रस्ता वळसा घालून यावे लागत आहे. एखादा रस्ता बंद झाल्यानंतर काय वेदना होतात त्या आमच्या आम्हाला माहित आहे. आज विदयार्थ्यांचे शैक्षणिक वर्षे होते. त्यांच वर्षे वायाला गेले आहे. जे कामगार होते त्यांच्या कामामध्ये व्यत्यय निर्माण झालेला आहे. आणि अशा रितीने सभागृहामध्ये एखादया सदस्यांवरती बोलणे चुकीचे आहे. मगाशीच प्रशासनाविरुध्द आपल्या नगरसेवकांनी भूमिका घेतल्या आहेत. आम्ही नवीन नगरसेवक आहोत. बोपखेलच्या पुलाचा विषय असेल किंवा आमचा आरक्षणाचा विषय असेल आमच्या प्रभागातील चारही नगरसेवक संबंधित विभागाकडे जायचे. आता बोपखेलच्या पुलाविषयी मी जास्त बोलणार नाही. कारण स्टँडींगला विषय झाल्यानंतर आयुक्त साहेबांनी तो वनडे मध्ये प्रस्ताव पाठविला. पण आरक्षणा संदर्भात थोडस बोलेन मी. आज जो माझा प्रभाग आहे तो पालिकेत जाऊन २० वर्षे झाले. तरी फक्त एकच आरक्षण डेव्हलप झालयं ते म्हणजे पाण्याच्या टाकीचं. साधी स्मशानभूमी पण ताब्यात घेता आली नाही. अधिका-यांना जाऊन विचारल तर अधिकारी काय म्हणायचे साहेब, आरक्षण ताब्यात घेण्यासाठी त्याला वेळ लागेल. वेळ लागेल म्हणजे काय. आपल्याला इथ काय खुर्ची गरम करायला ठेवले आहे काय. म्हणजे नगररचना विभागाने काय करायच त्यांच काम काय असत. आता भूसंपादन विभागाचा प्रस्ताव पाठीमागच्या वर्षी होता. तो आता महिनाभरापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेला. कारण विचारले तर सांगितले की एवढ दिवस कारण सांगत होती सातबारा मिळत नाही असे सांगितले आहे. सातबारा मिळत नाही हे कारण आयुक्त साहेब हास्यांस्पद होते. ज्या दिवशी ते कारण मिळाल त्यादिवशी माझ स्टेटमेंट होत नगररचना हा दलालांचा अड्डा आहे. आणि खरच परिस्थिती आहे नागरीकांची कामे करीत नाहीत ते. एजंट लोकांची कामे करतात तो नगररचना विभाग. आज समाविष्ट गावांबद्दल सगळेच बोलतात. की समाविष्ट गावांचा विकास करायला त्याचे मूळ कुठे तरी शोधयला पाहिजे. हे जे संबंधित विभाग आहेत ना यांना टारगेट दया. यांना टाईमटेबल दया. की हया कालावधीमध्ये तुम्ही हे काम केलं पाहिजे. आज बोपखेलचा पुलाविषयी हा विषय असाच झाला नाही त्यासाठी आमचे भाऊ दिल्लीला जाऊन आले असतील. आमच्या नानी, आमचे तीन नगरसेवक हे संबंधित विभागाकडे सारखे हेलपाटे मारतोत म्हणून हा विषय आलेला आहे. म्हणजे इथ काय प्रशासनाचे खूप मोठे कौतुक करण्यासारखी गोष्ट नाही. आज मला या सभागृहात हे सांगायचय की जे नागरीकांचे प्रश्न आहेत त्या प्रश्नांबाबत कुठेतरी आपण

म्हणजे प्रशासनाने संवेदनशीलता दाखविली पाहिजे. अधिकारी या अविर्भावात असतो की ही माझी जाहागीरी आहे. नवीन नगरसेवक गेला ना त्यांच्याकडे त्यांची वागण्याची पध्दत बघा. जशी काही त्यांची जाहागीरी आहे, भीक मागण्यासाठी नगरसेवक आला. आयुक्त साहेब हया अशा अधिका-यांना तुम्ही वठणीवर आणले पाहिजे. या अधिका-यांवर आपला वचक राहिला नाही. कदाचित नवीन नगरसेवक म्हणून त्यांच्या मनात अस वाटत असेल की हे काय करणार आहेत. अशा अधिका-यांना माझे सांगणे आहे की जनतेचे प्रश्न सोडविणार नसाल तर आमच्या पध्दतीने आम्ही तुम्हाला वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाहीत. मी पुर्ण सभागृहाच, प्रशासनाच नाही सभागृहाच कौतुक करेल की हा विषय इथ आणला आपण एकमताने मंजुर करु. पण भविष्यात प्रशासन जर अस काम करणार असेल तर कोणत्याही पक्षाने विरोध नाही केला पाहिजे. मग भाजपा असेल, राष्ट्रवादी असेल, शिवसेना असेल जनतेच्या प्रश्नासाठी हे एकमत होऊन या अधिका-यांवरती कारवाई केली पाहिजे. थांबतो जयहिंद जयमहाराष्ट्र.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २०३ | विषय क्रमांक – १६
दिनांक- २२/६/२०१८ | विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१४८/२०१८ दि.३/५/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६३७ दि.९/०५/२०१८

बोपखेल गावासाठी दापोडी येथून CME हद्दीतून जाणारा रस्ता मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दि.१३/५/२०१५ रोजी CME द्वारे बंद करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यापुर्वी सुचविल्याप्रमाणे मुळा नदीवरील पुल ते खडकीतून जाणारा Elphistone Road व्हाया टँक रोड हा रस्ता पक्क्या स्वरुपात करण्याच्या अनुषंगाने या विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. दि. २४/६/२०१६ रोजी पिंपरी चिंचवड मनपामार्फत Defence Estate Officer (DEO) यांचेकडे बोपखेल वासियांसाठी मुळा नदीवर स्वरुपातील पुल व पक्का रस्ता बांधणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला. मनपामार्फत सादर प्रस्तावास अंतिम करणेकामी संरक्षण खात्याचे विविध विभागांचे अधिका-यांचा समावेश असणारे Board of Officers चे दि.८/८/२०१६ रोजी गठण करण्यात आले आहे. या प्रस्तावाचे

अनुषंगाने संरक्षण खात्याचे विविध विभाग जसे की, Station Head Quarter (Station H.Q.), Ammination Factory Kirkee (AFK), Defence Estate Officer (DEO), Kirkee Cantonment Board (KCB), Army Base Workshop (ABW) यांचे प्रतिनिधी समवेत वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. या बैठकादरम्यान संरक्षण खात्याचे विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या विविध सूचनांचा अंतर्भाव करुन पिंपरी चिंचवड मनपामार्फत दि.०५/१०/२०१६ चे पत्रान्वये अंतिम प्रस्ताव Board of Officers यांचे समोर ठेवण्यात आला आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.Civil/BRTS/1028/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये Station Commandant, ब्रिगेडीयर धिरज मोहन यांना विषयांकित पुलाचे प्रस्तावाचे अनुषंगाने सद्यस्थितीबाबत आढावा बैठक आयोजित करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच पत्र क्र. Civil/BRTS/1027/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये, श्री.मनिष ठाकुर (IAS) जॉईंट सेक्रेटरी (Works) केंद्र शासन यांना विषयांकित बोपखेल गावासाठीच्या पुलाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी विनंती केलेली आहे.

उपरोक्त नमुद दिनांक २/१/२०१८ D.O. Letter चे अनुषंगाने राजेंद्र पवार, रक्षा संपदा अधिकारी, पुणे मंडल यांनी त्यांचे दि.४/४/२०१८ चे पत्रान्वये विषयांकित, बोपखेल गावासाठी मुळा नदीवर पूल बांधणे व पोहोच रस्ता बांधणे कामी आवश्यक असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेची किंमत र.रु.२५,८१,५१,२००/- असलेबाबत कळविले आहे. तसेच उपरोक्त नमुद जागेच्या बदल्यात संरक्षण विभागात कोणती जागा हस्तांतरीत करणार अथवा जागा हस्तांतरण बाबत मनपाचे काय म्हणणे आहे हे कळविण्यास सांगितले आहे.

वरील सर्व बाबींचे अनुषंगाने निर्णय घेताना खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१) बोपखेल गावासाठी बांधावयाच्या पोहोच रस्ता हा मनपा हद्दी बाहेरचा आहे.

२) सदर पूल व रस्ता बांधणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.८९०, दि.२० जुन २०१६ अन्वये र.रु.४२.०० कोटी एवढ्या खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

३) मनपाने दि.५/१०/२०१६ रोजी संरक्षण खात्याकडे सादर केलेल्या अंतिम प्रस्तावात पूल व रस्ता बांधणेसाठी संरक्षण विभागाची आवश्यक जागा विनामोबदला (Free of Cost) मिळावी अशी विनंती केली आहे.

वरील विवेचन विचारात घेऊन, सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे/पिंपरी चिंचवड शहरामध्ये व्हावे यासाठी गेली अनेक वर्षापासुन पुणे, पिंपरी चिंचवड मधील नागरिक, कामगार, सर्व वकील-बार असोसिएशन व पुणे विभाग प्रयत्नशील आहेत. पुणे शहर हे विदयेचे माहेरघर असल्याने येथे शिक्षणासाठी आलेले लोक नंतर नोकरी-धंदयासाठी इथेच स्थायिक होतात. पुणे/पिंपरी चिंचवड शहरात मा.उच्च न्यायालय, मुंबईचे खंडपीठ नसल्याने समाजातील सर्व घटकांना, नागरिकांना मुंबई येथे वारंवार जावे लागते. त्यामुळे जनतेचा नाहक खर्च होतो व वेळही वाया जातो. पुणे/पिंपरी चिंचवड शहरात मे. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ निर्माण झाल्यास समाजातील सर्व घटकांची, पुणे क्षेत्रातील जनतेची गैरसोय दुर होईल व दावे वेळेवर निकाली निघण्यास मदत होईल. अशी सर्व पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह नजिकच्या जिल्हयातील नागरिकांची इच्छा आहे. सदर मागणी रास्त असून नागरिकांच्या हिताची व मे.न्यायालयाच्या कामात गतिमानता आणणारी आहे. तरी मे. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे/पिंपरी चिंचवड शहर क्षेत्रामध्ये होणेसाठी मान्यता देणेत येत आहे व तसे शासनास कळवणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या मंजुर विकास योजनेत काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावरील चिंचवड येथे पवना नदीजवळ ४५ मी. रस्त्याच्या दोन्ही बाजूस चढण्यास व उतरण्यास रॅंप आवश्यक आहे. तरी चिंचवड येथील स.नं. ६४ मध्ये ४५ मी. रस्त्यावर चढणेसाठी १२ मी. रॅंप व रॅंपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३००० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच चिंचवड येथील स.नं.६६ व ६५ मध्ये ४५ मी. रस्त्यावरुन उतरणेसाठी १२ मी. रॅंप व रॅंपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३६०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर दोन्ही क्षेत्र मंजूर विकास योजनेत रस्त्यासाठी आरक्षित नाही.

तरी चिंचवड येथील स.नं. ६४ मध्ये ४५ मी. रस्त्यावर चढणेसाठी १२ मी. रॅंप व रॅंपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३००० चौ.मी. क्षेत्र व स.नं.६६ व ६५ मध्ये ४५ मी. रस्त्यावरुन उतरणेसाठी १२ मी. रॅंप व रॅंपचे आजुबाजूस मोकळी जागा अंदाजे ३६०० चौ.मी. क्षेत्र असे एकूण ६६०० चौ.मी मनपा विकास योजनेत आरक्षित नसलेले क्षेत्र नविन भूसंपादन कायदयानुसार किंवा खाजगी वाटाघाटीने तातडीने ताब्यात घेणेबाबत मान्यता मिळणेकामी व उपरोक्तबाबत मा.आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार

देणेत येत आहेत. सबब उपरोक्त रँपसाठी आवश्यक आरक्षित नसलेले क्षेत्र नविन भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २०४ विषय क्रमांक – १७

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५५१२/१८ दि.८/५/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६३८ दि.९/०५/२०१८

जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपाचे से.क्र.२३ येथील १०० द.ल.ली.क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र टप्पा-४ उभारणेचे काम, ठेकेदार मे.आर.बी.कृष्णानी यांनी दि.४/२/२०११ रोजी पुर्ण केलेले आहे. सदरचे काम करीत असताना ठेकेदार मे.आर.बी.कृष्णानी यांनी म.न.पा.कडे अतिरिक्त बाबींसाठी झालेल्या खर्चाच्या रकमेची मागणी केली होती. सदरच्या सर्व मागण्या पाणीपुरवठा विभागाने फेटाळुन लावल्या. तसेच काही मागण्या ठेकेदाराने स्वतः मागे घेतल्या. मे.आर.बी.कृष्णानी यांनी म.न.पा.ने फेटाळलेल्या मागणीच्या विरोधात मे.न्यायालयात म.न.पा. विरुद्ध सेक्शन ८९ खाली दावा दाखल केला. मे.न्यायालयाने या प्रकरणी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्री.व्ही.आर.कल्याणकर यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली. दिनांक ३०/११/२०१५ पासून लवादाचे प्रक्रियेस सुरुवात झाली असुन प्रकरणी ७ बैठका झाल्या. व श्री.व्ही.आर.कल्याणकर यांनी दिनांक २८/४/२०१७ रोजी या प्रकरणाचा अवार्ड म.न.पा.ला कळविला आहे. त्यानुसार मे.आर.बी.कृष्णानी यांना र.रु.२,१७,९८,०२७/- अधिक दि.४/२/२०११ पासून सदर रकमेवर दरवर्षी १२% सरळ व्याज लावून अदा करणेचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्त निर्णय म.न.पा. स मान्य नसलेने पाणीपुरवठा विभागाने अवार्ड विरुद्ध मे.न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन दरखास्त दाखल केली होती व मे.न्यायालयाने अवार्डवर Stay मिळण्याकामी दि.१४/३/२०१८ रोजी अर्ज दाखल केला होता. तथापि, या संदर्भात मे.जिल्हा न्यायालयाने ऍटॅचमेंट वॉरंटचा हुकूम केलेला असून पुढील सुनावणी ६/६/२०१८ रोजी होणार आहे. तत्पुर्वी अवार्डमध्ये नमूद केलेली व्याजासह र.रु.४,०९,८०,२८८/- मे.न्यायालयाकडे जमा करावयाची असून याकामी अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध नाही. अशा प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांसाठी जमा करावयाच्या रकमांकरीता अंदाजपत्रकामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन या लेखाशिर्षावर वरीलप्रमाणे रक्कम वर्गीकरण करुन मिळावी अशा प्रस्तावासह शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचेकडून दि.५/५/२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे.

सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचेकडील प्राप्त प्रस्ताव विचारात घेता, याकामी र.रु.४,०९,८०,२८८/- तातडीने उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तरी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात कायदा विभागाच्या महसुली खर्चाकडे "न्यायालयीन प्रकरणासाठी जमा करावयाच्या रकमा" हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ प्रकरण ७ (२) (१) अन्वये सदर लेखाशिर्षावर सन २०१८-१९ चे भांडवली खर्चाचे अंदापत्रकातील स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षांतर्गत पानांक १४ अ.क्र.१४ वरील, भक्ती शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डाणपुल बांधणे या कामावर केलेल्या ३३ कोटी तरतुदीतुन र.रु.४,१०,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी दहा लाख रुपये फक्त) तरतुद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वसंत बोराटे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १८

दिनांक- २२/६/२०१८

विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.स्था/बीआरटीएस/१५९/२०१८ दि.५/५/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६३९ दि.९/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे देशातील तसेच महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. गेल्या २० वर्षात शहरातील लोकसंख्येची वाढ हे दर्शवते.

सन २००१- १०६०४१७ लोकसंख्या

सन २०११- १७२९३५९ लोकसंख्या

सन २०१७- २१००००० लोकसंख्या

त्या अनुषंगाने शहरातील वाढलेले वाहनांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| साल | दु चाकी वाहने संख्या | चार चाकी वाहने संख्या | इतर वाहने संख्या | एकूण वाहने संख्या |
|---|---|---|---|---|
| सन २००१ | १६४५९८ | २०४८९ | २५४७८ | २१०५५६ |
| सन २०११ | ५३७९२० | ९०३४६ | ७५२१० | ७०३४७६ |
| सन २०१७ | ११६९८३४ | २५४९३३ | १४३८४० | १५६८६०७ |

म्हणजेच २१ लाख लोकांसाठी जवळपास १६ लाख वाहने आहेत व त्यामुळे शहरामध्ये पार्कींगची समस्या जाणवु लागली असल्यामुळे त्यासाठी सर्व समावेशक पार्किंग पॉलिसी करणे गरजेचे आहे.

भारतातील दिल्ली, चेन्नई, पुणे, मुंबई, बेंगलोर, नागपूर या शहारामध्ये स्वत:ची पार्किंग पॉलिसी करून सार्वजनिक पार्कींगच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी दर आकारनी करण्यास सुरवात केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये पार्किंग पॉलिसी मधील मुख्य बाबी खालील प्रमाणे-

१) पार्किंगचे दर ठरवताना ECS(Equivalent Car Space) हा मुख्य तांत्रिक मुद्दा विचारात घेतला आहे.

| वाहन | ECS |
|---|---|
| दुचाकी | ०.२० |
| रिक्षा | ०.६० |
| चारचाकी | १.०० |
| टेम्पो | १.०० |
| मीनी बस | १.५० |
| ट्रक | २.२० |
| खाजगी बस | ३.९० |

२) शहर हे तीन विभाग (Zone) करणेत आले आहे.

i)Zone A

उच्च पार्किंग मागणी (High Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे जी दिवसभर ८०% ते१००% पार्किंगची आवश्यकता आहे.

ii) Zone B

मध्यम पार्किंग मागणी (Medium DemandParking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ६०% ते८०% आहे.

iii) Zone C

कमी पार्किंग मागणी (Low Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% ते६०% आहे.

iv)Zone D

कमीत कमी पार्किंग मागणी (Lower most Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% पेक्षा कमी आहे.(या झोनसाठी पार्किंग धोरणाची आवश्यकता नाही)

३) पार्किंगचे शुल्क

P= नागरिकांने पार्क केलेल्या भरावयाचे पार्किंग शुल्क

P= (ECS)xRxTxZ

ECS= Equivalent Car Space

R= एका ECS साठी ठरलेला दर

T= वाहन पार्किंग केलेला वेळ

वेळेचे शुल्क हे १ तासासाठी आहेत.

Zone A साठी Z = २.००

Zone B साठी Z= १.५०

Zone C साठी Z= १.००

Zone Dसाठी Z= ०.००

Z= पार्किंग zone नुसार बदलणारा दर

Z=Zone Factor

Zone A/ Zone B/ Zone C/Zone D

४) ज्या रस्त्यांसाठी पार्किंग दर ठरवलेले आहेत त्या रस्त्याच्या लगतच्या सर्व रस्त्यासाठी मुख्य रस्त्यांपासून १०० मी. पर्यत त्या रस्त्यांसाठी पार्किंग पॉलिसी लागू राहणार आहे.

५) रस्त्यावरील पार्किंग साठी पहिल्या रस्त्यांसाठी एका कारसाठी १ ECS साठी र.रू.१० / प्रति तास आकारण्यात येतील त्यानुसार शहरातील पार्किंगचे दर पुढील प्रमाणे असणार आहे.

| वाहन | ECS | Zone A | Zone B | Zone C |
|---|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ४.०० | ३.०० | २.०० |
| रिक्षा | ०.६० | १२.०० | ९.०० | ६.०० |
| चारचाकी | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| टेम्पो | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| मीनी बस | १.५० | ३०.०० | २२.०० | १५.०० |
| ट्रक | २.२० | ६६.०० | ४८.०० | ३३.०० |
| खाजगी बस | ३.९० | ७८.०० | ५८.०० | ३९.०० |

६) रात्र निवासी पार्कींग साठी रात्री ११ ते सकाळी ८ या ऐके वेळेसाठी (एका ECS साठी) र.रु. २५ प्रति दिनी नुसार र.रू.९,१२५/- प्रती वर्षी वार्षिक परवाना देण्यात येणार आहे.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति दिन (रात्री ११ ते सकाळी ८ पर्यंत) | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति वर्षी |
|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ५/- | १८२५/- |
| रिक्षा | ०.६० | १५/- | ५४७५/- |
| चारचाकी | १.०० | २५/- | ९१२५/- |
| टेम्पो | १.०० | २५/- | ९१२५/- |
| मीनी बस | १.५० | ३८/- | १३६८८/- |
| ट्रक | २.२० | ५५/- | २००७५/- |
| खाजगी बस | ३.९० | ९८/- | ३५५८८/- |

७) गावठाण भाग, झोपडपट्टी वस्ती या ठिकाणी सद्या पार्किंग पॉलिसी लागू राहणार नाही परंतू पुढील दोन वर्षांनंतर त्याचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार योग्य ते धोरण ठरवण्यात येणार आहे.

८) सदरची पार्किंग पॉलिसी सुरु केल्यापासून एक वर्षासांठी सर्व zone साठी zone c प्रमाणे (कमी demand क्षेत्र) पार्कींगचे दर आकारण्यात येतील. एक वर्षानंतर प्रत्यक्ष Parking Demand ची माहिती तयार झाल्यावर शहरातील सर्व मुख्य रस्ते Zone A/ Zone B/ Zone C/Zone D मध्ये विभागण्यात येतील व त्यास प्रसिद्धी देण्यात येणार आहे.त्यामुळे सद्यस्थितीत पार्किंगचे दर खालीलप्रमाणे राहतील.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone Cसाठीचे दर र.रू.प्रति तास |
|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | २/- |
| रिक्षा | ०.६० | ६/- |
| चारचाकी | १.०० | १०/- |

| | | |
|---|---|---|
| टेम्पो | १.०० | १०/- |
| मीनी बस | १.५० | १५/- |
| ट्रक | २.२० | ३३/- |
| खाजगी बस | ३.९० | ३९/- |

९) या प्रस्तावित पार्किंग पॉलिसीमध्ये येणारे क्षेत्र पुढील प्रमाणे आहे

i) सर्व बीआरटी रस्ते/ पिंपरी (Camp)

ii) भोसरीगाव, नाशिक फाटा उड्डाणपूल, चिंचवड-पिंपरी-कासारवाडी-आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसर

iii) देहू-आळंदी रस्ता/ प्राधिकरण क्षेत्र

iv) भुमकर चौक ते के.एस.बी. चौक रस्ता

१०) खालील वाहन प्रकारांना शुल्कातून सवलत असणार आहे

i) सायकल

ii) रुग्णवाहिका

iii) दिव्यांगांची वाहने

iv) मान्यता प्राप्त रिक्षा थांबे

११) पूर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये सार्वजनिक वाहनतळ धोरण सुरू करून प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी प्रभागामार्फत प्रत्येक विविधभागासाठी पार्किंग फी जमा करणेसाठी ठेकेदारांची नेमणुक करण्यात येणार आहे.

१२) शहरातील मंजूर विकास आराखड्यातील वाहनतळांची आरक्षणे विकसित करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार महानगरपालिका जी वाहनतळे विकसित करेल त्या ठिकाणी पार्किंगचे दर नजीकच्या झोनच्या दराच्या २५% कमी ठेवणेत येत आहे.

१३) शहरातील पार्किंगचे शुल्क व पार्कींग करावायाचे रस्ते याबाबत दर दोन वर्षांनी आढावा घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करणेत येणार आहे.

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचावापर करण्यात येणार असून Parking App तयार करून पार्किंगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सदरचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वाहनतळ धोरण-२०१८ मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी सादर केलेले आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेची वाहनतळे विकसित करेल त्या ठिकाणचे पार्किंगचे दर नजीकच्या झोनच्या दराच्या २५% ने कमी करुन सुधारित दर लागू करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. वसंत बोराटे-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

**मा.अश्विनी चिंचवडे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहरामध्ये पार्कींग पॉलीसी राबविण्यापुर्वी महानगरपालिकेने आत्मपरिक्षण करावे. उदा. याच महानगरपालिका कार्यालयाला पुरेसे पार्कींग नाही. महापालिकेच्या इमारती, भाजीमंडई, उदयाने, दवाखाने यांना पार्कींगची सोय अजीबात नाही. त्याचे नियोजन प्रथम महापालिकेनी करावे. चिंचवड मध्ये मागील वर्षीच्या बजेटमध्ये बहुमजली पार्कींगसाठी तरतूद केलेली होती. परंतु सुस्त प्रशासनाने वर्षभर कोणतीही कारवाई केलेली नाही व या वर्षीतर ते हेडच गायब झालेल आहे. त्यामुळे महापालिकेनी प्रथम आपल्या सर्व इमारतीनां पार्कींग व्यवस्था निर्माण करुन दयावी. शहरामध्ये पुण्याप्रमाणे गर्दीच्या ठिकाणी स्वत:चे बहुमजली पार्कींग उभे रहावे व महत्वाचे म्हणजे बीआरटीएस मार्गावरच्या बांधकाम व्यावसायीकांच्या इमारतीमध्ये पार्कींग राखीव ठेवले होते ते देखील ताब्यात घ्यावे ही विनंती, धन्यवाद.

**मा. मिनल यादव-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम मी हे सांगू इच्छिते की आपण बाकीच्या लोकांना पे ऍण्ड पार्क सुरु करण्याच्या आदि महापालिकेमध्ये जेव्हा जीबी असते तेंव्हा सर्वसामान्यांना गाडी पार्क करण्यासही जागा नसते तेव्हा आपल्या सर्व नगरसेवकांच्या गाडया एकदम येतात तेव्हा आपल्याला लाजीरवाणी गोष्ट होती की सगळया गाडया बाहेर उतरुन सगळयांना आतमध्ये चालत याव लागत. तेव्हा पे ऍण्ड पार्क करण्याच्या आदि महापालिकेमध्ये पे ऍण्ड पार्क चालू करा. आपण जे आता नवीन पुल बांधलेल आहेत ब्रीज खाली जी अनधिकृत टप-या

लागलेल्या आहेत किंवा जी लोक तीथे राहातात ती पार्कींग युज मध्ये आणा. ते वेस्टेज होते त्याचा आदि चांगला उपयोग करा. त्याचबरोबर या लोकांना जागे संदर्भात टिडीआर दिलेला आहे पण त्या जागा अजून महापालिकेनी ताब्यात घेतलेल्या नाहीत. जी आरक्षण पार्कींगसाठी ठेवलेली आहेत ती आरक्षण देखील ताब्यात नाहीत. जे खासदार, आमदार असतील त्यांच्याकडून ते आरक्षण आदि ताब्यात घ्या, ती डेव्हलप करा आणि मग सर्वसामान्यांना पे ऍण्ड पार्क करा, धन्यवाद.

**मा संदीप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाढलेली लोकसंख्या आणि त्याच प्रमाणामध्ये वाढलेल्या वाहनांचे प्रमाण. त्याचप्रमाणे नोकरी, व्यवसायाचे निमित्ताने हिंजवडी आयटी पार्क असेल, भोसरी एमआयडीसी असेल या शहरात येणा-या जाणा-याची वाढलेली संख्या आणि रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर आणि मनाला वाटेल तिथे पार्कींग करण्याची वाढलेली प्रवृत्ती. महापालिका प्रशासन आणि पोलीस वाहतुक यंत्रणेचे याकडे झालेले दुर्लक्ष या सर्व पार्कींग आणि वाहतुकीच्या दृष्टीने शहराला खूप मोठी समस्या आज याठिकाणी भेडसावत आहे. मागच्या वर्षी आपल्या पिंपरी चिंचवड शहराचे स्वतंत्र पार्कींग पॉलीसी व्हावी असं मा. आयुक्तांना मी पत्र दिले होते आणि त्यादृष्टीने आज पार्कींग पॉलीसी हा विषय अजेंडयावर आणल्याबद्दल मी सर्व प्रथम आयुक्त साहेबांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. परंतु हे पार्कींग पॉलीसी निश्चित करीत असताना याठिकाणी पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाहनतळासाठी असलेली आरक्षणे ताब्यात घेणे सर्वात गरजेचे आहे. याठिकाणी सर्वांत महत्वाचे म्हणजे मल्टीप्लेक्स अशी पार्कींग व्यवस्था उपलब्ध करणे गरजेचे आहे आणि सुरक्षेच्या दृष्टीने याठिकाणी चांगले सीसीटीव्ही कॅमेरे असतील, सुरक्षा रक्षक उपलब्ध करणे गरजेचे आहे. अग्निशामक यंत्रणा देखील उपलब्ध करणे गरजेचे आहे. आणि सर्वांत प्रामुख्याने म्हणजे या पार्कींगचे चार्जेस घेताना या शहरातील नागरीकांच्या खिशाला परवडेल अशा प्रकारचे दर आपण याठिकाणी निश्चित केले तर वाहतुक आणि पॉलीसी या समस्येतून निश्चित आपल्या शहरातील नागरीकांना दिलासा मिळेल अशी आशा व्यक्त करतो. आणि या विषयाचे खरच अभिनंदन करुन याला मान्यता दयावी अशी मागणी करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह पार्कींग पॉलीसीचा आजचा हा विषय. या विषयाचे अनुषंगाने मा. महापौर साहेब, असे सांगायचे आहे की पार्कींग पॉलीसी शहराला असली पाहिजे का, तर नक्कीच असली पाहिजे. कारण

आता आपण शहरात कुठेही जा गाडी लावायला सुध्दा जागा नाही. त्यामुळे जागा दिसेल त्या ठिकाणी गाडी लावण्याचे प्रमाण दिवसेदिवस वाढत चाललेले आहे. परंतु याला नुसते नागरीकच जबाबदार नाही तर महानगरपालिका संस्था म्हणून तितकीच जबाबदार आहे. आपण खरोखरच पार्कींगसाठी किती जागा विकत घेतल्या आहेत. किती ठिकाणी लोकांना आपण सुविधा उपलब्ध करुन दिल्या. सुविधा दिल्या असताना लोकांनी त्याचा वापर केला की नाही केला. लोकांना ती सुविधा अडवळणीची वाटती का आणि म्हणून रस्त्यावर पार्कींग करतात का. त्याचबरोबर त्याठिकाणी जे लोक व्यवसाय करीत असतात ते व्यवसाय करीत असताना त्यांच्या सुध्दा गाडया ते रस्त्यावरच लावतात. त्यांनी रस्त्यावर लावल्या की अटोमॅटीकली सर्वांच्या गाडया रस्त्यावरच येतात. नियम आणला पाहिजे का तर आणला पाहीजे. म्हणून नियमाची अंमलबजावणी करताना त्यातले खाचखळगे सुध्दा माहिती करुन घेणे तितकेच गरजेचे आहे. मला वाटत कमिशरनर साहेब, आपण मागच्या वर्षी सुध्दा आम्ही तुमच्या मागे लागलो होतो. तेव्हा पार्कींगसाठी आपण एकदाच काहीतरी केले पाहिजे. संपुर्ण मुंबई पुणे रस्ता आपण लक्षात घेतला तर दापोडी पासून निगडीपर्यंत तर ज्या ज्या ठिकाणी मॉल आहेत मॉलला आपण परवानगी दिली. मॉलला परवानगी देताना तिथली पार्कींग स्पेस काय असली पाहिजे याचं भान निश्चितपणे आपल्या अधिका-यांना माहिती नाही आणि मॉल वाल्यांना सुध्दा माहीती नाही. आज तिथे गाडया लावून देत नाहीत साहेब. मॉल तर झाला, शोरुमतर झाल परंतु आतमध्ये कस्टमरला गाडी लावता येत नाही. म्हणून तो पर्याय नसल्यामुळे रस्त्यावरती गाडी लावतो. पण त्यासाठी आपल्याला त्या व्यावसायीकांना, ते जे काही दुकानदार असतील, शोरुमवाले असतील, मॉलवाले असतील त्यांच्यावरती आपण सक्तीची कारवाई करणे गरजेचे आहे. आपण काय करतो साहेब, उठसूठ काय करायचतर तर आपण नागरीकांच्या गळयाशी चाकू लावतो. यांना कोण वठणीवर आणणार. आयटूआर झाला. आपण कमला आर्केडच्या समोर जावा सगळया गाडया तुम्हाला रस्त्यावर दिसतील. का आतमध्ये गाडी लावायला जागा नाही. त्यांनी त्यांचे तिथे सुरक्षारक्षक उभे केलेत. आतमध्ये गाडया लावू देत नाहीत. पलीकडे जी जागा तिथं आहे ती आपली पार्कींगची जागा आहे साहेब. तिथ टप-यावाल्यांनी अतिक्रमण केलेले आहे. मग रस्ता अरुंद होतोय. एकीकडे आपण बीआरटी चालू करायची म्हणतोय, मेट्रो आली आहे. लोकांनी गाडया चालवायच्या की नाही चालवायच्या. जे शहरात राहतात ते टॅक्स भरतात त्यांचा हक्क

आहे या रस्त्यावर चालन्याचा. त्यांना काही हक्क राहिला आहे की नाही राहिला. मग तुम्ही काय करता एकाच दिवशी तुमचं अस म्हणण आहे की तुम्हाला पार्कींगचा नियम लागू करायचा, पार्कींगचा नियम जरुर लागू करा. परंतु त्याआधी त्यांना वठणीवर आणा. त्या जेवढया संपुर्ण गाडया उभ्या आहेत, त्यांना नोटीसा गेल्या पाहिजेत उदयापासून. की तुमची परवानगी जितक्या फ्लॅटची होती, ईथे तुमचा मॉल आहे ईथे तुमचं शोरुम आहे. त्या शोरुमला तुम्हाला पार्कींग स्पेस किती आहे आणि त्या ज्या गाडया आहेत त्या तुमच्या तेथेच आतमध्येच लागल्या पाहिजेत. जोपर्यंत तुम्ही हे करणार नाहीत तोपर्यंत तुम्हाला ही पार्कींग पॉलीसी राबविताच येणार नाही. रोज उठून नागरीकांचे, पोलिसांचे आणि पर्यायाने आमचे पोलीसांबरोबर भांडणे होणार आहेत. नियम आणा नियम चांगले आहे परंतु ते नियम आणताना त्यातले खाचखळगे आपण याठिकाणी लक्षात घेतले पाहिजेत. मा. महापौर साहेब, आपण पिंपरी मंडईमध्ये गेलो होतो साहेब तिथली आताची पार्कींगची जी जागा आहे. भूमि जिंदगीचे चितळे याठिकाणी नवीनच आलेले आहेत. त्यांचे माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे. एक दोन चार लोकांकडून त्यांनी माहिती घेतली. एक दोन चारच ते माहिती देऊ शकले. त्याठिकाणी अडीच लाख रुपये थकबाकी आहे साहेब. आणि अजून पे अँड पार्क चालू आहे साहेब. पे अँड पार्क काय तर त्यांची थकबाकी याठिकाणी थकली नाही पाहिजे. त्यांच्याकडून आपण वसुली केली पाहिजे. आज काय तर या आमदाराचा समर्थक आहे. उदया काय तर त्या आमदाराचा समर्थक. परवा काय तर स्टॅण्डींग चेअरमनचा समर्थक. माणस बदलतात. समर्थक कोणाचा, आमदार असेल, दुसरा आमदार असेल, मग अजून कोण स्टँडीग चेअरमन असेल मग थकबाकी का जमा होत नाही आपल्याकड. का कारवाई केली गेली नाही साहेब, आपल्याकडून. वसुली तर झाली पाहिजे ना. महानगरपालिकेने त्याठिकाणी परवानगी दिलेली आहे. आपण करारनामा केलेला आहे, आपण का वसुली नाही केली. याठिकाणच्या वसुली सुध्दा होणे साहेब तेवढेच गरजेचे आहे. दुमजली आपण पार्कींग केलेले आहे. त्याची सुध्दा थकबाकी तशीच पेडींग आहे. याच्यावर आपल अजीबात लक्ष नाही साहेब. महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे की नाही. त्याकडे आपले दुर्लक्ष आहे. आपल्याकडे डेटा सापडत नाही साहेब. ४ ते ५ दिवस झाले साहेब माहिती मागविली होती साहेब. मला वाटत मागची जीबी तहकूब झाली साहेब त्याच्या आधीपासून माहिती मागितली होती. तर अजून आपल्याकडे त्याचे करारनामे सापडत नाहीत. आणि इतका जर भोंगळ कारभार असेल तर आपण

काय खुलासा करणार मला कळत नाही मा. महापौर साहेब, कमिशरनर साहेब. मधुकर पवळे उड्डाण्पुलाच्या खालची जी वाहनतळाची जागा आहे त्याठिकाणी निविदा कार्यवाही करणेत आली होती परंतु  निविदाधारकांनी निविदा नियमानुसार पैसे भरले नसल्यामुळे निविदा रद्द करणेत आली आहे. पार्कींगतर होतात साहेब, मग निविदा का रद्द झाली. मग पार्कींगचे पैसे कोण घेतय आपले काही लक्ष नाही त्याच्यावरती. लक्ष घाला ना साहेब महानगरपालिकेचा विषय आहे. दान नाही केल लोकांना. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये सुर्यकांत एंटरप्रायजेस यांना ३३ महिने कालावधीसाठी आपण दिली होती. ५ लाख २७ हजार रुपये त्यांनी भरले. आणि जवळपास १ लाख ५१ हजार त्यांच्याकडे सुध्दा थकबाकी आहे. जे थकीत आहे तिथे ठेवा ना रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह या शहराची लक्ष्मी आहे, कुठलाही कार्यक्रम घ्यायचा झाला तर १०० टक्के सक्सेस होतो. तिथं साहेब थकबाकी आहे. वाहतुकनगरीला याठिकाणी आपण जर गेलात तर त्याठिकाणी शे पाचशे ट्रक ऍट ए टाईम उभे असतात कुणालाच आपण पार्कींग दिलेले नाही भाडयाने. अजून त्याची निविदा प्रसिध्दीकामी कार्यवाही चालू आहे. किती वर्षे झाले साहेब, आपल्या ताब्यात येवून आणि का आपण निविदा प्रसिध्द करीत नाहीत. कोणाच्या हितासाठी आपण निविदा प्रसिध्द करीत नाहीत हजारो लाखो रुपये लुटलेत या महानगरपालिकेचे काय केल आपण, काय केले. ज्या ज्या ठिकाणी आता हॉटेल बांधलेलेत त्या हॉटेलच्या ज्या जागा आहेत याकरिता पार्कींग होत्या. तेथे आज हॉटेल व्यवसाय रोजरोसपणे चालू आहेत. लोक रस्त्यावर गाडया लावतात. साहेब भूक लागली तर खायला जाणार ना. गाडी डोक्यावर घेऊन थोडीच बसणार आहेत हॉटेलमध्ये. रस्त्यावरच गाडी लावावी लगणार. तुम्ही पे अँड पार्क केले आणि जवळपास नसेलतर नो पार्कींगमध्येच गाडी लावणार. आणि नो पार्कींगमध्ये लावली तर गाडी उचलून पोलीस नेणार. धंदा कोणाचा  पोलीसांचा, भूर्दंड कोणाला तर नागरीकांला का तर तो टॅक्स भरतो. असे जे काही स्पॉट आहेत ते स्पॉट शोधा त्या त्या ठिकाणी  आपण पार्कींगसाठी जागा उपलब्ध करुन देणे खूप गरजेचे आहे. खास करुन पिंपरी मंडईमध्ये, मुंबई-पुणे रस्त्याला आणि ज्या ज्या ठिकाणी हॉटेल आहेत, मॉल आहेत त्या त्या ठिकाणी साहेब आपण अशा प्रकारचे लादू नका. या देशामध्ये लोकशाही आहे आणि लोकांना कायदा तोडायला तेवढेच आवडते. ज्यावेळेस त्यांची नडवणूक होते. त्यांच्याकडून कायदयाची अंमलबजावणी करण्याचा तुम्ही प्रयत्न करा. त्यांना जागा सुध्दा उपलब्ध करुन दया. याची ज्यावेळेस जाहीर नोटीस आपण

कराल त्यावेळेस लोकांच्या हरकती सुचना तुम्हाला मागवाव्या लागतील. यामध्ये हरकती सुचना मागविल्यात का साहेब आपण. मागविल्या नसतील तर मागवाव्या लागतील साहेब. असे असे आम्ही धोरण निश्चित केलेले आहे. यामध्ये तुमच्या काही हरकती सुचना असतील तर दया आणि त्यानंतर तुम्हाला ते परत आमच्याकडे मान्यतेसाठी आणावे लागणार आहे. पार्कींग आपल्याकडे शहरामध्ये सगळीकडे पे अँड पार्कींग होणे काळाची गरज आहे. परंतु त्याजागी तुम्ही लोकांची कॉलर धरुन, गचांडी धरुन लोकांकडन कायदयाची अंमलबजावणी करु शकणार नाहीत. त्याजागी तुम्हाला खूप मोठी कार्यवाही करावी लागेल. आपण साहेब तिथे गेलो मोरवाडी चौकामध्ये. तुम्हाला मागच्या वेळेस सांगितल होत की तिथ महानगरपालिकेचे आरक्षण आहे. ती जागा तुम्ही तात्पुरती मोकळी करा आणि पे अँड पार्क चालू करा. महानगरपालिकेकडून चालू करु दया. एखादा माणूस नेमा तिथं. परंतु त्या शोरुमपासून ते बिग बझारपर्यंत सिग्नलपर्यंत असंख्य गाडया उभ्या असतात. जामर लावला की साहेब ५ हजार रुपये दंड आहे. फोटो काढतो आणि मग एसएमएस येतो किंवा मेल येतो. आणि मग दंड भरल्याशिवाय गाडी सोडत नाही. पाच हजार रुपये दंड भरणे, जर एखादा चाकरमारी असेल तर त्याने फोर व्हीलर घेतली असेल. त्याचा पाच हजाराचा हफ्ता जात असतो. आणि साहेब पाच हजार रुपयाचा दंड त्यांनी भरायचा म्हणलतर हे काही योग्य नाही. आम्ही काम खूप चांगल करतो परंतु बेधुंदपणे काम करतो. आणि म्हणून मला अस वाटत की आपण आता तिथं नवीन पुल चालू केला आहे पिंपरीत जाण्यासाठी तिथं आपण पार्कींगसाठी स्पेस उपलब्ध करुन दिलेली आहे. जास्तीत जास्त नागरीकांना तिथ अवेअरनेस केला पाहिजे, लोकांना सांगितले पाहिजे. तुम्ही त्यांना प्रोत्साहीत केले पाहिजे. आणि प्रोत्साहीत करुन तुम्ही त्याठिकाणी गाडया लावण्यास सांगा ना साहेब. इथली जागा तुम्ही जर मोकळी केलीत तर चिंचवडच्या सिग्नल पर्यंत त्या गाडया लागतात. त्या गाडया मोरवाडीच्या तेथे लागतीलना साहेब. काय केले आपण तिथं, आजपर्यंत जंगलच वाढलेले आहे साहेब तिथं. किमान तिथं काही तरी चांगल होईल. कमला आर्केडच्या तिथं ज्या टप-या लागलेल्या आहेत त्या काढून टाका ना साहेब. नोटीस बजवा त्यांना. त्यांना सांगा तुमच्या गाडया आहेत. तुमच्या बँका आहेत, तुम्ही भाडयाने दिलेल्या आहेत. तुम्ही शोरुम चालू केलेले आहे तुमची जबाबदारी आहे. आणि सगळयात महत्वाच म्हणजे प्लॅन पास करताना आपण प्लॅन पास केलेला आहे. त्यामुळे त्यासाठीच पार्कींग आपण ठेवलेल आहे. त्यामुळे

त्या लोकांच्या गाडया आतमध्ये लावल्या पाहीजेत. अंमलबजावणी चालू करा. तुम्ही लोकांना नाही, जे मालक आहेत त्यांना वेठीस धरा. आणि या पार्कींग धोरणाचे मी खरतर मनापासून स्वागत  करते. परंतु स्वागत करत असताना त्यामध्ये एकच सांगते की आज जरी महापौर साहेब, आपण सगळयांना विचारले कोणाला बोलायचे का, कोणाला बोलायचे का कोणी हात वर केला नाही. आणि हे राबविल्यानंतर ज्या ज्या वेळेस दंड होईल त्यावेळेस मात्र या सभागृहामध्ये बाकी सगळे जण शिव्या घालत असतीत. माझी आपल्याला विनंती असेल की आपण दापोडीच्या पुल संपलेनंतर पासून ते निगडीपर्यंत, आणि तिथून रावेतपर्यंत आणि रावेतपासून सांगवीपर्यंत ज्या ज्या ठिकाणी आपण परवानग्या दिलेल्या असतील घरसंकुलाना आपण परवानग्या दिलेल्या आहेत त्यांच्या गाडया त्याठिकाणी आतमध्येच लागल्या पाहिजेत. बीआरटीएस पार्कीगच्या बाबतीत सांगेन साहेब आपण त्याठिकाणी मोफत पार्कींग देतो. तिकडे सुध्दा माणूस तिथे पावती फाडायला उभा असतो. तिथे सुध्दा पार्कींग पैसे देऊन लावावे लागते. तर त्याच्यावर सुध्दा आपले काही नियंत्रण नाही. आणि जिथ आपण पार्कींग दिलेले आहे तिथं पार्कींग त्या त्या मालकाचे त्या त्या कर्मचा-याच्या गाडया रात्रंदिवस उभ्या असतात. आपल्या लोकांना गाडया लावण्यास जागा नाही. आपण काळेवाडीचा पुल आता जो ओपन केलेला आहे एम्पायर इस्टेटचा तिथ तुम्ही जर गेलात काळेवाडीमध्ये तर कालच संध्याकाळी मी तीकडन परत येत होते तीथ गाडी पार्क केली. एकाने बस अशी लावली होती मला माहित नाही बसवाल्याला माहिती होत का नाही परंतु  पुर्ण रस्ता व्यापून टाकला होता. माझी गाडी छोटी असल्यामुळे माझी गाडी निघाली. पण इतर सगळया गाडया परत काळेवाडीतून पिंपरीमार्गेच त्यांना मार्गस्थ व्हावं लागल. त्या रस्त्यावर किमान ७०० ते ८०० बसेस लागतात. मला माहीत नाही आतला तो रस्ता चालू झालेला आहे. मागच्या वेळेस तुम्ही मला म्हणलात की आपण त्याची खूप घाई केलीत उदघाटनाची. जो पर्यंत उदघाटन करीत नाही तोपर्यंत गाडयांची आवक जावक होणार नाही. तोपर्यंत लोकांना कळणार पण नाही. तीन चार मिनिटामध्ये आम्ही तुमच्या घरापर्यंत पोहोचतो, काळेवाडीत पोहचतो त्याच्यापेक्षा आनंद दुसरा आम्हांला काय असु शकेल. आणि म्हणून त्याठिकाणी गाडयांसाठी साहेब आजपासून सवय लावा. आपण काय करतो की वाट बघतो आणि मग कारवाई करायला जातो. त्यावेळेस लोक आपल्या अंगावर येतात. आपण या सगळया सुचनांची ताबडतोब दखल घेऊन साहेब आपण या संदर्भात लवकरात

लवकर जाहीर नोटीस देऊन लोकांच्या हरकती सुचना मागवाव्यात आणि त्यांच्या सुचनांचा आदर करुन त्यानंतरच आपण पे अँड पार्क लागू कराल अशी अपेक्षा व्यक्त करते. थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह माझ्या सहकारी नेत्यांनी आता बरचसे मुद्दे सांगितले आहेत. परंतु तुम्ही ज्यावेळेला आज नुसतं कार्पोरेशनच नाही तर एमआयडीसी आणि प्राधिकरण यांच्या ज्या पार्कींग स्पेस आहेत त्या स्पेस आपण ताब्यात घेतल्या पाहिजेत. आणि तिथे सुध्दा आपण सगळया या गोष्टींचा विचार केला पाहिजे. आज काय झालेले आहे काही नागरीकांनी, लोकांनी घरे वाढविली. त्यांना पार्कींगला आतमध्ये जागाच नाही ते लोक काय करतात बाहेर रोडवर गाडया लावतात आणि मग गाडया लावल्यानंतर सध्याच्याला पिंपरी चिंचवडमध्ये गेली कित्येक महिने असा धुमाकूळ चाललेला आहे. गाडया फोडण्याचे सत्र चालू आहे. साहेब हे सत्र ज्यावेळेला चालू आहे लोक काय म्हणतात पैसे देवून लोक जरा लांब पार्कींग असेल तरी सुध्दा ते तिथं गाडी पार्क करतील आणि तिथून ते गाडी सकाळी कलेक्ट करतील. म्हणजे कितीतरी ठिकाणी फॉरेनमध्ये सुध्दा अशाप्रकारच्या सगळीकडे पार्कींग स्पेस आहेत. पाच-पाच सात-सात मजली पार्कींग स्पेस आहेत. आणि गाडी नेवून लावायची दिवसभर लावा रात्रीची लावा आणि त्याच तुम्ही नॉमिनल जे काही दर आकारणी करणार आहात चार्ज लावणार आहात. तर तो चार्ज भरायला नागरीक तयार असतात. परंतु सध्याच्या परिस्थितीमध्ये पिंपरी चिंचवडमध्ये जागा तेवढीच आहे. पुण्याची पण परिस्थिती तशी आहे पुण्यात आपल्याला जायला नको वाटतं याच कारण काय तर जागा तेवढीच आहे पण लोकसंख्या वाढली. गाडया वाढल्या. तसंच आता काही दिवसांमध्ये पिंपरी चिंचवडच साहेब होणार आहे. आताच हयांचा एकच विषय त्यांच्याकडून सुटला गेला की मंगल कार्यालये. साहेब मंगल कार्यालयांना जर तुम्ही परवानगी देणार आहात, या परवानग्या देत असताना जस आपण बिल्डींग परमिशनला झाडे एवढया स्केअर फुटला लावलीच पाहिजेत. साहेब हयांना टॅक्स सोबत वर्षाची आकारणी करा पार्कींगची. म्हणजे टू व्हीलरचे पार्कींगचे तुम्ही पैसे घेण्यापेक्षा या पिंपरी चिंचवडमध्ये जी सर्वसाधारण लोक आहेत, की जी टू व्हीलरचा वापर करतात. त्यांच्याकडून आपण किरकोळ पैस घेण्यापेक्षा जे मंगल कार्यालये असतील, मॉल असतील, मोठमोठे हॉस्पिटल्स आहेत तिथ या बाकीच्या गाडया लागतात. त्या गाडयांच्या हयाच्यातून

आपल्याला पैसे  जर मिळाले तर १०० टक्के साहेब आपल्याला टू व्हीलर वाल्यांकडून पैसे घेण्याची गरज नाहीय.  आणि अशा पध्दतीने करावे की ज्यावेळेला लग्नसराई असते. तर साहेब शहरामध्ये कुठून कुठे जाण्यासाठी त्या रावेतमध्ये गेला तरी तीच परिस्थिती, भोसरीमध्ये गेला तरी तीच परिस्थिती, निगडीत जर गेलात तरी तीच परिस्थिती. कोणत्याही रस्त्याला जा. लग्नसराईमध्ये तुम्ही कुठेही अम्ब्यूलन्स वाजत असेल तरीही सुध्दा गाडी काढणार कसा अम्ब्यूलन्सवाला. अशी परिस्थिती पिंपरी चिंचवड शहरात आहे. इथून पुढे तर आणखी भयाण परिस्थिती पार्कीगच्या बाबत होणार आहे. आणि म्हणून टू व्हीलर वाल्यांना पैसे चार्ज करण्याबाबत मी असे म्हणेल की आपण इडस्ट्रीयल एरियात आहोत. आणि गरीब सर्वसामान्य ज्याच्याकडे टू व्हीलर आहे. जिथ गाडी लावावी तिथ त्याने दहा रुपये दया पाच रुपये दया हे करण्यापेक्षा तुम्ही टू व्हीलरवाल्यांकडून चार्ज वगळणेत यावा. अशी मी सभागृहाला विनंती करते. की गरीब सर्वसामान्य माणूस टी व्हीलर घेऊन फिरतो. त्याच्याकडून घेऊ नका वेळ आली तर  रिक्षावाल्यांकडून सुध्दा घेऊ नका. कारण रिक्षामध्ये चार-चार पाच-पाच लोक बसतात. त्याने जर एखादया ठिकाणी पार्कींग करायचे ठरविले. कारण तिथं जर रिक्षा स्टँड आहे तर सर्व सामान्य माणसाकडे त्याचे पैसे लावणार आहे. तस जर का साहेब तुम्हाला काही स्पॉट सोडता आले तर तसं सुध्दा करा. कमिशरनर साहेब, जर आपल्याला उत्पन्नाचे स्तोत्र वाढवावयाचे असतील तर पिंपरी चिंचवडमध्ये ब-याचशा तशा गोष्टी आहेत त्याच्यातून तुम्ही उत्पन्न् वाढवू शकता. तुम्ही आरटीओमध्ये कंम्पलेंट केलेली असताना रस्त्यामध्ये बसेस लागतात. गल्ली बोळातून बसेस लागतात. ट्रायव्हल टुर चालविणा-या ज्या बसेस लागतात ना साहेब. या आख्या गल्लीबोळातून पिंपरी चिंचवड शहरामध्ये लागतात. त्याच आपण कुठे घेतो. त्याचं कोण घेतो. पावती फाडली जाते. पण तिथ आपण घेत नाही. टप-याधारकांना आम्ही तुम्हाला आजपर्यंत आपली टपरीधोरण झाल नाही साहेब. दया ना त्यांना लायसन दया आणि त्यांच्याकडून महिन्याला पैसे घ्या. असे ही लोक पैसे घेतातच आणि मग त्यांना अधिकृत का देत नाही साहेब. दया ना अधिकृत लायसेन्स दिले पाहिजे. त्यांना लायसन दिले पाहिजे. संध्याकाळी भेळवाले, पाणीपुरीवाले वडापाववाले सगळयांना तुम्ही चार्ज करा. दोन तासासाठी तीन तासासाठी इथ कार्पोरेशनमध्ये पैसे भरायचे. त्यांना एक मोठ लायसन दया त्यांनी त्यांच्या गाडीवर लावावे. की हयांना इथ उभे राहायचे अधिकार आहेत. साहेब आपण याच्यातून खूप रेव्हेन्यूय जमा करु शकतो.

या माध्यमातून पार्कींगचे हे झालंच पाहिजे. पिंपरी चिंचवड जर आपल्याला सुनियोजित, व्यवस्थितरित्या करायच असेल तर पार्कींग सारख्या गोष्टी आपण या योजना राबविल्या पाहिजेत. त्याच्याबरोबर साहेब हया बाकीच्या गोष्टीपण राबविल्या पाहिजेत. आज मध्ये आपण हातगाडी धोरण जर म्हणलं तर एक एका प्रभागामध्ये जर तीस-तीस चाळीस-चाळीस पन्नास-पन्नास हातगाडया जर उभ्या राहणार असतील तर एवढया प्रभागामध्ये किती हातगाडया झाल्या. मग त्यांचे आपण लायसन देऊ शकणार आहे का. पण राहतातच ना. लोक आजकाल काय करतात टेम्पोमधून भाज्या विकतात. गर्दीच्या इथ, गार्डनच्या इथ आज आपण चार्ज घेतो का. भाजी धंदयामध्ये फ्रूट धंदयामध्ये साहेब १०० टक्के प्रॉफीट आहे. पण आपण घेत नाही त्यांच्याकडून पैसे. अधिकृतपणे त्यांना लायसन दया तीन तासाची परमिशन दया. त्यांच्याकडून पैसे घ्या. अधिकृत धंदा करण्यासाठी तुम्ही जर दिल तर १०० टक्के  लोक पण काम करायला तयार आहेत. आणि अशा रितीने जर केले तर टू व्हीलरवाले आणि रिक्षावाले हयाच्यातून वगळावेत अशी मी सभागृहाला विनंती करते. की गरीब लोकांना टू व्हिलरवाल्यांना तुम्ही पार्कींगचा चार्ज करु नका. बहुतेक कामगारांकडे टू व्हीलर असतात. इकडून तिकडून जाताना त्यांना टू व्हीलरचा वापर करावा लागतो. जिथे जिथे वापर करावा लागेल तिथे ते परवडणार नाही. तरी त्याद्दष्टीकोनातून विचार व्हावा अशी मी विनंती करते आणि थांबते.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह  दोन वाजलेपासून बसलेलो आहोत. पार्कींगचा विषय अतिशय महत्वाचा आलेला आहे. खरतर हा विषय खूप उशिरा आलेला आहे. ज्यावेळेस ग्रामपंचायतीचे गाव नगरपालिकेमध्ये येते आणि नगरपालिकेतून महानगरपालिका होते त्याचवेळेस ही सुविधा अधिकृतपणे राबवयाला पाहिजे होती आणि ती राबविली गेलेली नाही. आजपर्यंत मुख्य विषय म्हणजे साहेब पार्कींगचा आहे. आज आम्ही वॉर्डमध्ये फिरायला गेलोतर प्रत्येक गल्लीमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूने गाडया लावलेल्या असतात. आम्ही काय म्हणणार लाव, कारण आम्हांला मत लागतात. पण प्रशासनाने अतिशय जागृतपणे काम केले पाहिजे. आणि त्यामध्ये पार्कींग ही सक्तीने केली गेली पाहिजे होती. खरतर पुण्यासारख्या कमी जागेमध्ये एक खाजगी पार्कींग आहे एक महापालिकेचे पार्कींग आहे आणि  आपल्याकडे तर प्रत्येक वॉर्डमध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे आरक्षण आपण करुन ठेवलेले आहे. एकही आरक्षण आपल्या ताब्यात नाहीत. अशी काही आरक्षण आहेत की त्याठिकाणी

आपल्याला पार्कींग करता येईल. त्याकरीता त्याचा ताबा घ्या आणि महापालिकेचे उत्पन्न त्याच्यातून वाढवा. आज सिमाताईनी सांगितल, मंगलाताईनी सांगितल. की मुळात म्हणजे ट्रॅव्हलींगच्या बसेस काढा. ते स्वतः राजरोसपणे बिझनेस करतात. रात्रीच्या गाडया त्यांच्या सुटलेल्याच असतात. कुठ गोव्याला जा, कुठे साता-याला जा आणि दिवसा रस्त्यावर त्या ठाम मांडून गाडया उभ्या राहिलेल्या असतात. आपण कोटयावधी रुपये खर्च करुन रस्त्याची कामे करीत असतो आणि त्या रस्त्याने जर पुढे जाण्याकरीता जायचं म्हटलं तर त्याठिकाणी आपल्याला सतरा वेळा व्यत्यय येतो. या गाडयांची खूप दाटी असते त्यामुळे आपल्याला ज्याठिकाणी जायचय त्याठिकाणी १० मिनिटाच्या ठिकाणी अर्धा तास लागतो. खरतर आपल्याला पार्कींग करणे म्हणजे मुख्यतः जे मेन बिझनेस आहेत, जे ट्रॅव्हलर्सवाले आहेत. आधी त्यांना तुम्ही वॉर्निंग करा. की तुमचा असा असा बिझनेस आहे. मगाशी मंगलताई म्हणल्या की मंगल कार्यालयांमध्ये गर्दी असते. मला माहीत आहे की मंगल कार्यालयांमध्ये तासभराचे काम असते दिवसभर गर्दी असेल असं मला वाटत नाही. पण बिझनेसवाल्यांना त्यांनी शहरामध्ये शेती दिली. शेतक-यांनी काही तरी बिझनेज केला पाहिजे म्हणून आपल्या जागेमध्ये मंगल कार्यालये केलेले आहेत. महापौर साहेब, आयुक्त साहेब आज शहरामध्ये किती तरी असे आहेत की ज्यांना घरे नाहीत त्यांना आपण घरे देणार आहोत. परत जैसी थी परिस्थिती झालेली आहे. झोपडया याठिकाणी वाढलेल्या आहेत. भाजीवाले याठिकाणी वाढलेले आहेत. भाजीवाल्यांच्या गाडया कुठेही शहरवस्तीमध्ये उभ्या केल्या जातात. त्यांची भाजी विकेपर्यंत तो टेम्पो त्याठिकाणी उभा असतो. आणि पुर्ण त्याने भाजी खाली केली की त्याठिकाणी भाजीचा सगळा कचरा हा पडलेला असतो. तेही माणसेच आहेत. बिचारे गरीब आहेत. त्यांना त्रास देऊ नये या मताची मी पण आहे. पण गरीबांनी सुध्दा शहरात राहत असतानी कस राहिल पाहिजे याची शिकवण आपण अधिका-यांनी दिली पाहिजे, वॉर्निंग दिली पाहिजे की बाबांनो तुम्ही टॅक्स देत नाहीत रस्त्यावर, फुटपाथवर भाजी विकता. पण शहरामध्ये तुम्ही हा कचरा करता. त्याचबरोबर भंगारवाल्याची दुकाने आहेत. त्या भंगारवाल्याच्या सुध्दा दिवसभर त्या गाडया चालू असतात. कधीकधी असा प्रसंग येतो की त्याठिकाणी कुठला तरी अपघात झालेला असतो कुणाला तरी ॲम्ब्यूलन्स लागत असती कुणाला तरी फायरब्रिगेडची गाडी लागत असती आणि अशा वेळेला रस्ता रिकामा भेटत नाही. ब-याचशा वेळेला अशा केसेस झालेल्या आहेत की ज्या घराला आग

लागली ते घर जळून खाक होत ज्या माणसाला इमरजन्सीमध्ये ॲम्ब्यूलन्समध्ये न्यायचय तर तो माणूस जागेवरच त्यांचे निधन झालेले असते. अशा कितीतरी घटना घडत असतात. बारीकसारीक गोष्टीकडे आपण लोकांनी लक्ष दिल गेल पाहिजे. आता बजेट वर आपण खूप अगदी मन लावून बोलत होता. त्यामध्ये बोलत असताना तो विषय त्याठिकाणी फक्त पैसाच दिसत होता. पण हयाच्याही पेक्षा सभागृहामध्ये आल्यानंतर शहराच्या विकासाबाबत चर्चा करीत असताना शहरातील नागरीकांना कसं सुरक्षित ठेवले पाहिजे. त्यांना रस्ते देत असताना त्यावर पैसे खर्च करत असताना तो रस्ता किती रुंद आहे कशा प्रकारे आपल्याला दिसणार आहे कशा प्रकारे रस्त्याची ठेवण आहे. अनधिकृत पार्कींग त्याठिकाणी झाली नाही तर तो रस्ता आपल्याला पुर्णपणे वापरता येईल. कारण त्या रस्त्यामुळे पार्कींगमुळे अनधिकृत असा तो प्रकार झाला नाही घराचा. तो त्या रस्त्याच्या पार्कींगमुळे झालेला आहे. प्रत्येकजण घरे फेस टू फेस बांधतो ती घरे एकदा झाल्यानंतर आपण काहीच करु शकत नाहीत. ती लोक फेस टू फेस घरे बांधतात व फ्रंटला त्यांची गाडी घोडे. जो त्याचा मालक ज्याचे नावे प्लॉट आहे तो भांडणे करतो. आणि उगीचच एखादया गोष्टीचा बाऊ करतो. म्हणून पार्कींगचा विषय हा अतिशय महत्वाचा आहे. महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण शहरामध्ये नाही प्रत्येक वॉर्डामध्ये पार्कींग केले पाहिजे. आणि त्या पार्कींगमधून आपल्याला कराच्या रुपाने टॅक्सच्या रुपाने रक्कम गोळा करतो. त्या रकमेमध्ये, त्या बजेटमध्ये या पार्कींगची रक्कम नक्कीच भर पडून देणार आहे. आपल्याला माहिती आहे की जे काही आपल्याला मिळणार आहे पण आपल्याला भरुन काढण्याकरीता अशा प्रकारचे उत्पन्न आपल्याला चालू करण्याची गरज आहे. असो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे आपण तो अंमलात आणावा आणि गोरगरीबांना म्हणजे जे टू व्हीलरवाले, रिक्षावाले, भाजीवाले टॅम्पोवाले आहेत त्यांना समज दयावी. आणि रस्त्यावर अडचण न करता त्यांना एका बाजूला व्यवस्थितरित्या त्यांनी त्यांच्या गाडया उभ्या कराव्यात आणि यामध्ये तो काही पार्कींगचा विषय आहे त्यांना त्यामध्ये सवलत दयावी. एवढे बोलून थांबते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. थोडासा मार्गी लागण्याचे चिन्ह याठिकाणी सभागृहामध्ये दिसत आहे. याचा मनापासून आनंद होत आहे. परंतु आतापर्यंत अनेकांनी त्यांच्या बोलण्यात सांगितले की सभागृहामध्ये विषय आल्यानंतर बोलायच का तर अंमलात

आणताना आपल्याकडून कुठे तरी त्या धोरणाला अंमलात आणत असताना आपल्याकडून कोणत्याही प्रकारची चुक सभागृहाकडून होऊ नये. आणि नागरीक ज्यांच्यामुळे आपले शहर आहे. त्यांच्याकडून येणा-या रेव्हन्यूव मधून आपले शहर चालते त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय चुकूनही आपल्याकडून होऊ नये. अशा प्रकारचे धोरण या सगळया नगरसेवकांचे असते आणि म्हणून सगळया नगरसेवकांना आपले विचार याठिकाणी मांडायचे असतात. सगळयात महत्वाचा भाग म्हणजे दापोडीपासून सुरुवात केली तर आपल्या महानगरपालिकेची हद्द सुरु होते. दापोडीच्या एका साईडला सीएमईचा गेट भाग आहे आणि दुस-या साईडला दापोडीचा स्लम भाग किंवा सिध्दार्थनगर असा परिसर सुरु होतो. त्या परिसरामध्ये दिवसेंदिवस टप-यांची संख्या वाढत चालली आहे. आणि टप-या वाढल्यामुळे पर्यायी तिथल्या लोकांच्या गाडया, रिक्षा सुध्दा रस्त्यावर लागतात. जिथं छोटी छोटी घरे आहेत त्यामुळे ते रिक्षा चालवत असतात टेम्पो चालवित असतात, थ्री व्हिलर चालवित असतात आणि अशा वेळेला त्याठिकाणच्या ज्या टप-या होत्या त्या टप-या टाकल्या गेल्यामुळे आता तर त्यांच्या गाडया रस्त्यावर हायवेवरती पार्कींग होत असतात ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. आणि त्या संदर्भात अनेकवेळा प्रभाग अधिका-यांशी बोलणे झालेले आहे. त्या टप-या काढा, जुन्या असतील त्यांच्यावरती कारवाई करणेत मजा नाही परंतु नवीन तरी होऊ देऊ नका अशा प्रकारे अनेकवेळा सांगीतलेले आहे. त्याचबरोबर तुम्ही पुन्हा कासारवाडीत आला तर उजव्या बाजूला जो रस्ता आहे. त्या रस्तयाच्या दोन्ही साईडला कार डेकोरची दुकान आहेत. खरतर ज्या वेळेला आपण पार्कींग पॉलीसी करणार आहोत त्याठिकाणी काही व्यावसायिक दुकाने आहेत. त्याठिकाणी आपण ठरवल की त्यांनी कसला व्यवसाय करायचा आहे जर तुम्हाला कार डेकोर करायचा असेल, वाहने उभे करायची वेळ येणार असेल तर त्याठिकाणी आपण सुध्दा विचार केला गेला पाहिजे. आज कार डेकोरच्या तेथे दोन-दोन तीन-तीन गाडया लागलेल्या असतात. आणि सगळयाच्या सगळया गाडया रस्त्यावर लागलेल्या असतात. त्यामुळे रस्त्यातून जायला आता जो पुल आहे. तो पुल चालू केला तर त्या पुलाचा एनट्रन्स सुध्दा आपल्याला दिसत नाही. आता जो काही काळेवाडीचा विषय आहे त्याचप्रमाणे या कासारवाडीच्या पुलावरती चढायला आपल्याला रस्ता सुध्दा दिसत नाही. कारण त्याठिकाणी कार डेकोरची दुकान आहेत आणि त्यामुळे त्यांच्या गाडया पुढे पण लागलेल्या असतात. किंबहुना आम्ही पण वेडेपणा करतो हॉर्न

देतो आणि गाडी पुढे काढतो. त्यामध्ये सामान्य नागरीकांना वेळ नसतो. तो त्यांच्या नादी लागण्यापेक्षा आपला रस्ता करुन घेतात. नाशिक फाटयाच्या इथ बघितल तर किती टप-या लागलेल्या आहेत. तुम्ही तो विषय आता छेडलाय. तुम्ही त्या टप-या काढाच. म्हणजे तुम्ही ते ठरवा काय करायच ते. टप-या काढा तिथं लोकांना पार्कींग धोरण करा. तिथं रेल्वेस्टेशन आहे. एका साईडला एसटी स्टॅंड आहे, दुस-या साईडला बस स्टॉप आहे. आणि अशा ठिकाणच्या टप-या झाल्या तर आम्ही त्याठिकाणी कस काम करायच. तिथं अपघात होतात. एखादा एक्सीडेंट होतो त्यावेळेला आम्ही काय करायच. अशा प्रकारे जर शहराचा रस्ता व्यापला असेल तर पार्कींग धोरणचा ख-या अर्थाने विषय मंजुर होईल. परंतु त्याचे इम्प्लीमेंट होताना तुम्हाला, मला आणि १२८ नगरसेवकांना याठिकाणी त्रास झाल्याशिवाय राहणार नाही. साहेब, एवढेच बोलून थांबत नाही तर आता माईंनी जो विषय काढला की शहराच्या आतल्या बाजूला रस्त्याची अवस्था काय आहे. आज आमच्या शहरामध्ये ज्यावेळेला सगळया बिल्डींग्ज आहेत किंवा छोटयाछोटया अर्ध्या गुंठयामध्ये, एक गुंठयामध्ये जी काही घरे बांधलीत. सगळयांच्या गाडया या तुमच्या रस्त्यावरती येतात. याठिकाणी या महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये ठराव झाला पाहिजे की ज्या घरांना पार्कींगची व्यवस्था असेल अशाच लोकांनी फोर व्हीलर गाडी खरेदी केली पाहिजे. असे आपण केले नाहीतर आपल्या शहराची अवस्था अत्यंत बकाल होईल. ज्या पध्दतीने आमचे सफाई कर्मचारी सकाळी सकाळी रस्ता झाडत असतात त्यावेळेस बिल्डींगच्या बाहेर रस्त्यावर फोर व्हीलर लागलेल्या असतात. आमचे कचरा काढणारे जे सफाई कर्मचारी असतात ते रस्ता झाडतात. नंतर गाडीवाला येतो नऊदहा वाजता तो गाडी काढतो. आणि त्या गाडीच्या खालचा कचरा तसाच असतो. आणि मग आमचे नागरीक म्हणतात की रस्ताच झाडला नाही. मग त्याठिकाणी गाडया लागलेल्या असतात त्यामुळे नागरीक म्हणतात की त्याठिकाणचा रस्ताच झाडला नाही. तिथ गाडया लागलेल्या असतात त्यामुळे तो रस्ता झाडता येत नाही. आमचे कर्मचारी काम करतात का, तर काम करतात. परंतु कुठेतरी आपले धोरण निश्चित करताना आपण शहराच्या आतील जो भाग असतो, आतील जे रस्ते असतात त्याठिकाणचे धोरण विचारात घेतले पाहिजे. व त्याच सुध्दा इंम्प्लीमेंट केले गेले पाहिजे. तसं करणार नसाल तर या धोरणाला रस्त्यासाठी फक्त इंम्प्लीमेंट करुन मजाच नाही. आज जसे सांगितले गेले की मोठमोठया गाडया एखादा ड्रायव्हर राहत असतो १० बाय १० च्या घरामध्ये आणि

त्याची एखादया हिंजवडीच्या कंपनीला गाडी असते आणि ती गाडी सुध्दा आमच्याच परिसरामध्ये पार्क केली जाते. आपल्या ह प्रभागाच्या आवारामध्ये बघुन घ्या एकदा, एकही गाडी नागरीक, नगरसेवक आले तर आपण बाहेर गाडी लावू शकत नाही. त्यामुळे थोडक्यात सांगायचे झाले तर शहराच्या आतील आणि बाहेरच्या भागातील एकत्रित रित्या विचार केला पाहिजे. धोरण चांगले जरी असले तरी त्याचे इंम्प्लीमेंट करताना आयुक्तांनी त्याच्यावर तोडगा काढून मग इंम्प्लीमेंट करा. की जेणेकरुन कुठेतरी आपल्यावरती खापर फुटले नाही पाहिजे याची काळजी घेण्याची गरज आहे असं याठिकाणी नमुद करते आणि थांबते जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर या शहरातील मुख्य प्रश्न म्हणजे पार्कीगचा. या संदर्भात आपण या विषयावर चर्चा करीत आहोत. आयुक्त साहेब एकतर म्हणजे स्मार्टसिटीकडे वाटचाल करणारं शहर आहे. मेट्रोसिटीसारखे शहर आहे. याच ठिकाणी शहराच्या जवळ असणारा देहू आणि आळंदीचा परिसर. आयटीसाठी गजबजलेले हे शहर आणि परिसर. जर दिवसैंदिवस पाहिलेतर आणि कामगारांच्या विविध क्षेत्रातील हे शहर आहे आणि दिवसैंदिवस जर पाहिले आपण तर शहरावर हळूहळू लोकसंख्येचा भार वाढत चाललेला आहे. आता सिमाताईंनी सांगितले की दापोडीपासून भक्तीशक्तीपर्यंत गेलो काळेवाडीचा जो परिसर असेल पिंपरी भाजीमंडईचा परिसर जो असेल खरतर गाडी चालविताना सुध्दा आपल्याला जीव मुठीत घेऊन गाडी चालवावी लागते. या परिसरामधील जे जे मॉल्स असतील, हॉटेल्स असतील किंवा व्यापारी असतील. जर त्याच्यामध्ये नीट तुम्ही पाहिले तर पार्कीग असताना सुध्दा काही लोकांनी गोडावून तयार केलेले आहेत व विविध क्षेत्रातील लोक त्याठिकाणी खरेदीसाठी, व्यवसायासाठी येतात परंतु त्यांच्या गाडया सर्व रस्त्यावर असतात आणि रस्त्यावर हे ठेवत असतात. काही लोकांचा जीव सुध्दा ऍक्सीडेंटमध्ये गमवावा लागलेला आहे. सन्मा. महापौर आज आपण धोरण राबविताना पहिले त्यांच्यावर कारवाई होणे खूप गरजेचे आहे. की जागा पार्कीगसाठी अव्हॅलेबल आहे ती जागा पार्कीगमध्ये न वापरता विविध उदयोगधंदयासाठी वापरली जाते. जर का तुम्ही आपल्या महानगरपालिके समोरचा सुध्दा मॉल जर पाहिला तर त्याठिकाणी त्याच बिल्डींगमध्ये जी पार्कीगची जागा होती ती पार्कीगची जागा व्यवसायासाठी वापरली जाते. आणि त्या गाडया रस्त्यावर आहेत. सन्मा. महापौर साहेब, हा विषय करीत असताना आपण एक गोष्टीची काळजी घेतली पाहिजे की

ज्या ज्या ठिकाणी पार्कींगची व्यवस्था होणे गरजेचे आहे त्या त्या ठिकाणी मोठेमोठे पुण्यामध्ये जसं भाजीमंडईमध्ये ज्या ठिकाणी प्रायव्हेट आणि महानगरपालिकेची पार्कींग आहेत. तशा व्यवस्था जर काही केल्या तर तिथल्या स्थानिक व्यापा-यांना, तिथल्या स्थानिक ग्राहकांना त्याचा फायदा होईल. आणि शहरातील लोकांना सुध्दा त्याचा फायदा होईल. परंतु महापौर साहेब, हे जर का पार्कींग धोरण आपण पुर्ण शहरभर राबविले. अ ब क ड फ प्रमाणे तर सर्वसामान्य नागरीकांना ते न परवडणारे आहे. तरी थोडीशी सुरुवात करुन म्हणजे पहिली सुरुवात करुन जर का त्याचा अनुभव घेतला आणि त्याच्यानंतर सर्व शहरामध्ये हे धोरण जर का राबविले गेले तर चांगलं राहील महापौर साहेब. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे जर का तुम्ही पाहिल तर यमुनानगरचा परिसर असेल, भक्तीशक्तीचाचा परिसर असेल. आपण मेट्रोचा शेवटचा बसस्टॉप त्या ठिकाणी करणार आहोत. मावळ असेल, प्राधिकरण असेल जी मंडळी येतात ती भक्तीशक्ती चौकातून येतात आणि त्याच ठिकाणी भक्तीशक्तीचा शेवटचा बसस्टॉप देखील केलेला आहे. त्याच ठिकाणी मोठया प्रमाणात पार्कींग केली जाते. आणि दिवसभर काही लोक बसमध्ये बसून दिवसभर पुण्यामध्ये कामासाठी जातात व त्या पार्कींगमध्ये गाडया तशाच पडलेल्या असतात. तरी महापौर साहेब अशा ठिकाणी पार्कींग धोरण अवलंबावे की ज्याठिकाणी गरजेचे आहे. ज्याठिकाणी महत्वाचे आहे त्याच ठिकाणी पार्कींग धोरण करावे. शहरभर याचा विचार करु नये अशी मी सुचना करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.वसंत बोराटे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह या शहराला कुठेतरी शिस्त लागली पाहिजे या मताचे आम्ही सुध्दा आहोत. आणि तुम्ही एक चांगला प्रयत्न आणि शहराला काही तर एक चांगले आपण देऊ शकतो असे आपले प्रयत्न आहेत. परंतु हे करीत असताना मगाशी चिंचवडेताई असतील बाकीच्या आमच्या भगिनी बोलल्यात. त्यामध्ये जे जे बोलले त्याकडे दुर्लक्ष करुनही आपल्याला चालणार नाही. मा.आयुक्त याठिकाणी कार्पोरेशनने स्वतः सुधारणा करणे गरजेचे आहे. ते आपल्याला आधी करावे लागणार आहे. नाहीतर स्वामी विवेकांनंदासारखे होणार आहे लोक आपल्याला तसे बोट दाखवणार आहेत की तुम्ही आधी सुधारा. त्यामुळे ताईंनी व बाकीच्यांनी सांगितले की महानगरपालिकेची आपण स्थिती बघताय सुरुवात इथूनच करतो. महापौर साहेब, आपल्याच महापालिकेच्या इमारतीच्या मागच्या बाजूला

साधारणतः २२ हजार स्क्वेअर मीटरची जागा आपल्याकडे आयटूआर मध्ये ताब्यात आहे. जी जागा ताब्यात असताना सुध्दा ती फ्रंटला नाही, किंवा तिचा चेहरा मोठा नाही. किंवा तिथ जाता येत नाही  एवढी मोठी जागा आपल्याकडे  दोन हेक्टरपेक्षा अधिक २२ हजार स्क्वेअर मीटर आहे. एवढी मोठी जागा असताना सुध्दा आपण महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरवासियासाठी सेट्रंल लायब्ररी म्हणून बांधलेली जी इमारत आहे ती पिंपरी चौकामध्ये महात्मा फुले पुतळयाच्या मागे आहे. त्यामध्ये त्या समाजाच्या लोकांनी मागच्या वेळेला आंदोलनसुध्दा केलेले आहे, मागणी सुध्दा केली आहे. परंतु आपल्याला जागा कमी पडते म्हणून आपले काही ऑफिसेस आपण त्याठिकाणी शिफ्ट केलेले आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की आयुक्त साहेब, तुम्हांला भव्य मोठी इमारत त्याठिकाणी जेव्हा करायची असेलतर करा. परंतु तुम्हाला हया डिपार्टमेंटला जागा कमी पडते. अस याठिकाणी म्हटले जाते की नगररचना विभाग असेल, बिल्डींग परमिशन विभाग असेल याठिकाणी ठेकेदार असतात, मोठे बिल्डर्स असतात त्यांच्या गाडया लावलेल्या असतात. आणि नगरसेवकांना मात्र गाडी लावण्यास जागा नसते. किंवा गोरगरीबांना गाडी लावण्यास जागा नसते असे विभाग तुम्ही त्या मागच्या २२ हजार स्क्वेअर मीटरमध्ये बांधा ना ऍडीशनल. आता कालच पुण्यामध्ये त्यांनी ऍडीशनल बिल्डींगचे उद्घघाटन झाले तुम्ही त्या कार्यक्रमाला गेले होते. अशी मोठी ऍडीशनल इमारत जर तुम्ही इथं बांधली  आणि जर तुम्ही मल्टीपर्पज पार्कींग त्याठिकाणी केले  तर तिथे तुमचे मेन मेन डिपार्टमेंट शिफ्ट  होतील. पार्कींग ईझीली उपलब्ध होईल आणि ती जागा आपल्या ताब्यात आहे मा.आयुक्त साहेब, त्याचा वापर आपण केला पाहिजे. आणि म्हणून आपण जेव्हा शहरामध्ये जाऊ त्यावेळेला लोक आपल्याला नावे ठेवणार आहेत. ही गोष्ट आपण लक्षात ठेवणे गरजेचे आहे. धोरण असावे लोकांना शिस्त लागली पाहिजे. हे जरी मान्य असले तरी मा. आयुक्त साहेब, आज रस्त्यांची काय परिस्थिती आहे ते तुम्ही बघा. आज भोसरी असेल, थेरगाव असेल, आपला पिंपरी चौक बघा. मी स्वतः तुम्हाला कितीतरी विनंती केली असेल. आज तिथं बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्यासाठी आपण लाखो रुपये, कोटी रुपये खर्च करुन सुशोभिकरण करतोय. त्या पुतळयाच्या समोरच रोडवर तिथं वॉटरनेक आहे. त्या वॉटरनेकमध्येच टप-या आहेत त्याच्यापुढे रिक्षा स्टँड आहे. त्याला आपली मान्यता आहे का नाही. त्याच्यावर आपण कारवाई करतो का नाही. आपल काही रोल आहे का नाही. म्हणजे त्या वॉटरनेकमध्ये एक नाही तर तिथे

दोन फुटांच्या अंतरावर तिथल्या तिथं १० रिक्षा इकडे १० रिक्षा तिकडं आणि अशा परिस्थितीमध्ये तिथं वॉटरनेकचा प्रॉब्लेम आहे. कोण अभ्याय करतय का अधिकारी त्याठिकाणी. किंवा त्या मेन चौकापासून २०० मीटरपर्यंत कुठल्याही प्रकारचे पार्कींग नको. किंवा त्याठिकाणी टप-या नको. अशी सर्व ठिकाण, असे सगळे चौक, चांगले असे भरलेले आहेत तिथं काही आपलं लक्ष नाही. आपण हे धोरण केलेले आहे, धोरण चांगले आहे. परंतु ते करण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला पाहिजे. आणि ज्या ज्या ठिकाणी पॉसिबीलिटी आहे. आज पिंपरीमध्ये सुध्दा पार्कींगचे आरक्षण आहे आपण ते डेव्हलप करु इच्छित नाही, किंवा आपली इच्छा नाही म्हणून करीत नाही. परंतु आता नवीन डीपी करणार आहोत किंवा आपले प्लॅनिंग आहे. त्या प्लॅनींगमध्ये सुध्दा आपल्याला जास्तीत जास्त जागा महानगरपालिकेच्या अनुषंगाने आपल्याला पार्कींग करण्यासाठी दु चाकी, चार चाकी वाहने असतील, मोठे ट्रक असतील, किंवा या मोठयामोठया बसेस असतील या गोष्टींचा ही आपल्याला विचार करावा लागणार आहे. आणि या मोठया बसेस आहेत जस आता इथ उपसूचना दिली गेली की २५ टक्के त्या झोनच्या ठिकाणी जर दु सरे पार्कींग असेल तर त्या लोकांनी रस्त्यावर पार्कींग न करता जाऊन त्या पार्कींगच्या ठिकाणी पार्कींग करा की जेणे करुन त्यांना २५ टक्के कमी पैसे लागतील. अशाच पध्दतीने आपल्याला या मोठया बसेस जर रोडवर थांबल्या त्यांना हयाच्यापेक्षा कडक कारवाई किंवा मोठे दंड किंवा पार्कींगचे रेट जास्त लावावे लागतील. जेणेकरुन किलोमीटर दोन किलोमीटर लांब जाऊन त्यांनी त्या बसेस लावल्या पाहिजेत ट्रक लावले पाहिजेत. ट्रक टर्मिनल केले पाहिजे अशा आपल्याला सुविधा करायला पाहिजे मा.आयुक्त साहेब. हे सर्व आपल्याला या डीपीमध्ये इनकार्पोरेट करावे लागणार आहे. आणि ज्या पार्कींगच्या जागा आपल्याकडे एव्हेॅलेबल आहेत. त्या पहिल्यांदा आपण डेव्हलप करण्याचा प्रयत्न करावा हीच तुम्हाला विनंती आहे. आणि मिनीमाईज रेट करुन मगाशी तुम्हाला ताईंनी उपसूचना दिली की टू व्हीलरला माफ करा असं त्यांचे म्हणणं आहे. परंतु शिस्त लागण्याच्या अनुषंगाने रुपया का होईना आपण घेणे गरजेचे आहे. अस मला पण वाटत. पण तो नॉमिनल असावा. लोकांना शिस्त लागली पाहिजे आणि त्या शिस्त लावण्यासाठी तुम्ही आठ नंबरमध्ये म्हटले आहे. सदरचे पार्कींग पॉलीसी एक वर्षासाठी आहे पहिल्यांदा. आणि त्यामध्ये नॉमिनल रेट दिलेत. त्या नॉमिनल रेटमध्ये तुम्ही दोन रुपये दु चाकीला, सहा रुपये रिक्षाला, आणि चारचाकीसाठी दहा रुपये, टेम्पोसाठी दहा आणि मिनी बससाठी

पंधरा रुपये आणि ट्रकसाठी तेहतीस. माझी अशी विनंती राहणार आहे मा. आयुक्त साहेब आपण दोन ऐवजी एक करा हरकत नाही. परंतु मिनीबस आणि ट्रकचे जे तुम्ही केलेत ते तेहतीस आहेत ते किमान पन्नास ते साठ असले पाहिजेत. तर बसेससाठीचे पैसे तुम्ही वाढवा. इकडं मात्र तुम्ही त्यांना सवलत दिली. रोडला या लोकांमुळे कंझमशन होते. या लोकांमुळे ॲक्सीडेंट होते. तर अशा लोकांना आपण त्यांनी रस्त्यावर थांबवू नये. अशा प्रकारची उपसूचना पक्षनेते आपण जर दिली तर ती बरी राहील. बसेस लावणारे, टेम्पो लावणारे त्यांचे रेट आपण वाढवावेत. दुचाकीवाल्यांना शिस्त लावण्यासाठी फ्री नसून किमान त्यांना काहीतरी असले पाहिजे अशा पध्दतीने आपण करावे. आणि अशा पध्दतीने आपण विषय मंजुर केला तर हरकत नाही, धन्यवाद.

**मा. दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह पार्कींग पॉलिसीचा आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून हा विषय आपल्या सभागृहासमोर आलेला आहे. ज्यादिवशी आपण जो रिमोट ठेवला होता त्यादिवशी आम्ही तो बघितला त्यादिवशीच मी माझी भूमिका आपल्यासमोर मांडलेली आहे. खरतर मी काही महत्वाच्या विषयावर या पार्कींग पॉलिसीच्या बाबतीत लक्ष वेधू इच्छितो हयाच्यामध्ये मला उत्तर दिले गेले आहे. तुम्ही त्यादिवशी म्हटल की हे सगळ नगरसेवकांना दया. आणि परवा हा तुम्ही दाखविलेला डेमो त्यामध्ये मला एक दिसत नाही की यातल एक पान नेमकं गहाळ केलय की काय मला माहीत नाही. तरी शहरामध्ये किती पार्कींग प्लॉट आहेत आणि किती एव्हॅलेबल आपल्या ताब्यात आहेत. आणि किती टक्के जागा आपल्या ताब्यात आहेत. त्यातला मी पेपर पाहतोय. पण काय तो मला सापडलेला दिसत नाही. का जाणून बुजून मला दिला नाही मला माहीत नाही. एक आपल्याला सांगू इच्छितो की सगळयांत महत्वाच म्हणजे आज या महानगरपालिकेच्या ज्या ठिकाणी आज इथ आपण बसलेलो आहोत. आणि त्या बसलेल्या ठिकाणी आपले धोरण काय मला माहीत नाही पण महानगरपालिकेमध्ये आपण येतो त्याठिकाणी सुध्दा आपल्याला पार्कींगला आपल्या स्वतःच्या महानगरपालिकेला जागा नाही. आज जर इथून महानगरपालिकेतून विषय आपण लोकांना सांगतोय की तुम्ही पार्कींग अंमलात आणा किंवा जो विषय समोर आलेला आहे. जर महानगरपालिकेकडे पार्कींग नसेल तर दुसऱ्याला आपण काय म्हणतात ना "दुसऱ्याला सांगे ज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण" असं काही आहे ना. तशी तऱ्हा म्हटले तरी दुसऱ्या सांगे ज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण. अशा माध्यमातून आपला हा

निर्णय आहे असे मला नककीच वाटतय. साहेब हया डेमोमध्ये ब-याच ठिकाणी सांगितलय तुम्ही जगभर फिरुन आणलय आम्हाला. या फोटोमध्ये मी बघितल कुठे हाँगकाँग, मकाऊ, पॅरीस अस काय काय दिलेले आहे हयाच्यामध्ये. ही जी पार्कींग पॉलिसी आली, जी पध्दत आहे ती दाखवावयाचा आपण खूप मोठा प्रयत्न आम्हाला त्या दिवशी दाखविला गेला. साहेब मान्य आहे. हया जगामध्ये आपण वावरायाचा प्रयत्न केला तर अजून आपल्याला पन्नास वर्षे म्हणजे बरोबरी करायची असेल तर आपल्याला तर आपण पन्नास वर्षे आपण मागे आहोत असं म्हणल तर वावगं ठरणार नाही. साहेब पुण्याचं जर उदाहरण दिलं किंवा चेन्नई, रांची असे उदाहरणे बंगलोर ही उदाहरणे आपण दिलेली आहेत. त्याठिकाणी त्यांना पहिले विचारले पाहिजे होते की आपण या शहरामध्ये जे पार्कींग प्लॉट आहेत ते ताब्यात घेतलेत का. किंवा दिलेत का. आणि ते डेव्हलप केलेले आहेत का. साहेब मला आपल्याला विनंती करायची आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुणे-मुंबई रोडवर सचीनने मला वाटत काही नगरसेवक बोलले गेले. की जे मॉल्स आहेत, जे मोठमोठे दुकाने आहेत, रस्ता आहे त्या रस्त्याला मला वाटत त्या लोकांना तुम्ही आज म्हणजे पार्कीग्ज ते त्यांना दिलेत का ? त्याचा ते वापर करतात का. त्या रस्त्यावर त्यांची वाहने का लावली जातात. हे सुध्दा पाहणे आता आपल्याला गरजेचे आहे. साहेब, दुसरं म्हणजे असं की आपण ज्यावेळेस पार्कींगची व्यवस्था त्याठिकाणी करणार आहोत किंवा ती पॉलिसी आपण समोर आणणार आहोत. त्या पार्कींग पॉलिसीची जागा कुठे आहे. कुठल्या ठिकाणी आपण करणार आहोत. आणि त्या ठिकाणाहून जर मला महानगरपालिकेत यायचं असेल तर किंवा मला संबंधित ठिकाणी जायच असेल उदया तुम्ही पिंपरीमध्ये पार्कींग पॉलिसी राबविण्याचा किंवा पुणे-बॉम्बे रोडला पार्कींग पॉलिसी राबविण्याचा प्रयत्न करीत असाल तर त्याठिकाणी मला माझ्या ज्या ठिकाणी मला जायचय त्याठिकाणची यंत्रणा आपल्याकडे काय आहे. म्हणजे मी माझी गाडी घेऊन यायच ही काय १०,२०,२५ रुपये दयायचे तिथून परत एखादा रिक्षा घेऊन त्याठिकाणी जायच का. म्हणजे याचा अर्थ की आपण आपली यंत्रणा सुध्दा पहिली सक्षम करणे गरजेचे आहे. आणि हे करावे अशी माझी आपल्याला पहिली विनंती आहे. साहेब आपण एवढी घाई करायची काही कारण नाही. आम्ही काय पॉलिसी तुम्ही धोरण चांगल आणलय राबवताय. पण हे राबविताना आपण पहिले बीओटी तत्वावर पार्कींग चालू करावे. एखादी जागा ताब्यात घ्यावी. ती बघावी कशा पध्दतीने चालतय. कशा

पध्दतीने त्या लोकांचा प्रतिसाद येतोय. तुम्ही आता प्रत्येक गल्ली बोळामध्ये तो राबविण्याचा ए बी सी आणि डी. असे झोन तुम्ही डीक्लेअर केले आहे. मग ए झोन कुठला आहे. याच काय सांगितल नाही. बी झोन कुठला आहे ते आपण सांगितल नाही. सी आणि डी झोन कुठला आहे हे मला माहीत नाही. परंतु झोन कुठला हे पण त्यामध्ये आपण उल्लेख केलेला नाही साहेब. म्हणून आपल्याला मला वाटत मगाशी कोण तरी बोलले, योगेशभाई बोलले की जिथं आपले महानगरपालिकेचे पार्कींग आहे. ज्या दिवशी बुधवार किंवा काही काम असेल त्यादिवशी ती ठराविक पार्कींग ठराविक लोकांनाच दिली जाते. म्हणजे आपल्याला कोण काय करतय हे मला पण माहिती आहे मी बोललो नाही परंतु तिथं आपल्या नगरसेवकांना किंवा कार्यकर्त्यांना जागा मिळत नाही. पण ती ठराविक लोकांसाठी आपल्या त्या पुतळयाच्या समोर दोन्ही बाजूने ते बॅरीगेटस आपल्या आऊटगेट पर्यंत ते राखीव ठेवलेले असते. साहेब ही आपलीच व्यवस्था धड नाही. उदया आपण ठरविले अ ब क ड फ मध्ये प्रभागवाईज तुम्ही करणार आहेत. याच्या तुम्ही ठेकेदार नेमणार आहात. म्हणजे मला तरी अस दिसतय की कोणाला तरी पोसायंच काम आपण या पार्कींग धोरणामधून आणलय की काय मला माहित नाही. तर माझ्या या विषयाला आम्ही सर्वजण पहिले एक होऊ. की पहिले बीओटी तत्वावर चालवा. एखादी जागा ताब्यात घ्या. आज जवळपास मला अस कळत की महानगरपालिकेची ७८ ते ८० आरक्षणे आहेत पार्कींगची. त्यातनं एक ०.५ पण आरक्षण आपल्या ताब्यात आलेले नाही. हे अस असताना आपला एवढा अट्टाहास का. म्हणजे ते पहिले ताब्यात घ्या. त्याच्यावर पार्कींग उभे करा. पुण्यामध्ये तर मला वाटत की एकावर एक पार्कींग आहे. आणि अनेक ठिकाणचे पुण्याचे तर चांगले पार्कींग आहे. त्या पुण्याच्या धोरणानुसार आपल्याला करायच असेल तर आपल्याला प्लॉट अलॉट असला पाहिजे. आपले धोरण करीत असताना तो प्लॉट जर ताब्यात असला तर तेथून पूढे जाण्याची व्यवस्था आपल्याला पाहिजे. अशा दृष्टीकोनातून आपण जर हा विषय परत आणत असाल तर आम्ही त्याचा विचार करु अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून मला वाटत अस कळालेलं आहे की एका एका माणसाचे वर्षाला दहा दहा हजार रुपये एक गाडीला जाणार आहेत. लोक आधीच वैतागले आहेत तुमच्या महागाईला वैतागले आहेत, तुमच्या पेट्रोलला, डिझेलला वैतागले आहेत. सर्व विषयालय वैतागले आहेत आणि तुम्ही हा जर अजून बोजा राबविण्याचा प्रयत्न जर केला राजकारणी लोकांच्या माध्यमातून आमचा हा विरोध नोंदवून तुम्हाला जर मंजुर

करायचा असेल तर तुम्ही मंजुर करा. पण राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून आमचा या विषयाला विरोध राहणार आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आज आपल्या शहराची एकंदर अवस्था जर पाहिली तर प्रचंड वाहने वाढलेली आहेत. आयुक्त साहेबांनी देखील त्यादिवशी बैठकीमध्ये सविस्तर तो विषय सर्वांसमोर मांडलेला आहे. साहेब, आमचा कोणाचाही त्या पार्कींग पॉलिसीला विरोध नाही. त्यादिवशी मी आपल्याला एक प्रश्न विचारला होता की मला वाटत राजन पाटील साहेबांनी उत्तर दिले होते की संपुर्ण शहरामध्ये पार्कींगची आरक्षणे आहेत ती फक्त ०.२१ टक्के आहेत. तर तुम्ही ही पार्कींगची पॉलिसी डेव्हलप केली पाहिजे. त्यानंतर याच्या अगोदर आपण दुसरे प्रेझेंटेशन केले ते पीएमपीएमएलचे. त्यानुसार आपल्या किती बसेस कमी आहेत. बसस्टॉपची अवस्था. त्यांना तुम्ही देणारे पैसे सगळे महिन्याचे. तर कुठे तरी सार्वजनिक वाहतूक सक्षम झाली पाहिजे. ती झाल्यानंतर कुठेतरी साहेब तुम्ही पार्कींग पॉलिसी स्टेप बाय स्टेप ही पार्कींग पॉलिसी राबवाल, ज्यावेळेस आपण मॉलमध्ये जातो त्या मॉलमध्ये आपण गेलो तर प्रचंड प्रमाणात पार्कींगचे पैसे आपल्याकडून घेतात. त्यामुळे लोक स्वत:ची गाडी नसल्यामुळे त्या थिएटरमध्ये जातात. ज्यावेळेस बिल्डींग परमिशन आपण सर्वांना देत असतो तर त्याचा कंट्रोल मला वाटत बिल्डींग परमिशन म्हणून साहेब आपला मोठमोठया मॉलवर, मोठमोठया कमर्शियल केसेसवर असला पाहिजे. कुठे असे पॉलिसीज मध्ये आहे का, कुठे असे म्हटल आहे का. आपण त्यांना आतमध्ये पैसे घ्यायचे थांबवू शकत नाही. तसं कुठे पॉलिसीजमध्ये म्हटलेले नाही. साहेब, कुठे पॉलिसीजमध्ये असे म्हणलेले नाही. त्या थिएटर्सनी, मॉल्सनी आतमध्ये पार्कींगचे पैसे घेतात. हे पैसे घेत असल्या कारणाने त्या देखील गाडया कुठेतरी रस्त्यावर येतात. तुम्हाला आमच्याच काळेवाडी भागातील परिस्थिती सांगतो. साहेब संध्याकाळी जर तुम्ही गेलात तर त्या काळेवाडी, रहाटणी, आमच्या कस्पटे वस्तीच्या रोडने तुम्ही चालूच शकत नाही. परंतु त्या ठिकाणी देखील आज आपली पार्कींग पॉलिसी नसताना आपण कोणाला आज ही ठेके दिलेले नसताना त्याठिकाणी पार्कींगचे पैसे आकारले जातात. रितसर पावती दिली जाते साहेब. हा अधिकार आहे का, जय भवानी पार्कींग काळेवाडी फाटा ते कस्पटे वस्ती पावती नंबर दि. ८/६/२०१८ गाडी नंबर एमएच १४- १५००. गाडीचे १०० रुपये रोज, मग हे कोण घेत साहेब तुम्ही सुध्दा पोलीस खात्याला कळविले तुम्ही त्यादिवशी मला काय सांगितल की

पार्कींग पॉलिसीला विरोध करु नका. जर पार्कींग पॉलिसी नसेल, शुल्क आकारायचे म्हणजे स्टँडीगने ठरवा. मग सत्ताधारी सर्व मिळून निर्णय घेतील. परंतु पार्कींग पॉलिसी झाली तर निश्चितच तुम्हाला अशा प्रकरणावर कंट्रोल राहील. पण असे प्रकार आज ही शहरामध्ये राजरोसपणे चालू आहेत. त्यांची पार्कींग पॉलिसी नसताना काही नसताना परस्पर अशा प्रकारे पैसे घेतले जातात. साहेब, माझी आपल्याला विनंती आहे. तुम्ही संबंधित पोलीस स्टेशनला आज कळवा, उदया कळवा. कोण अशा प्रकारे पैसे घेतो, कुणीही असू दया. कोणाच्या जवळची आहेत कोण आहेत काय आहेत. हयाच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. तुम्ही पार्कींग पॉलिसी करताना माझी तुम्हाला विनंती असेल की सार्वजनिक वाहतुक सक्षम करा आणि तुम्ही जर स्टेपवाईज केले समजा आज पिंपरीत गरज आहे, पिंपरीत करायचय आहे. तर ज्या ठिकाणी गरज आहे ज्या ठिकाणचे पार्कींग प्लॉटस आपले आपण डेव्हलप केलेले आहेत त्याठिकाणी जर आपण पार्कींग पॉलिसीचे पैसे घेता ते दर ठरविण्याचे अधिकार निश्चितच आहेत. तुम्ही जर ते क्लेअर केले तर ठिक आहे, नाहीतर ते ठेकेदार काहीपण करतील. यानंतर तुमचे सजेशन, ऑब्जेक्शन होणारच आहेत. त्याच्या अगोदार साहेब आपण हया सगळया गोष्टींकडे लक्ष दयाव. जेणेकरुन आताच एका सदस्याने सांगितले की महागाईला लोक वैतागलेले आहेत म्हणजे पार्कींगचे एवढे पैसे नसावेत. वन बीचकेचा वर्षभराचा कर, टॅक्स जेवढा होईल तेवढा या पार्कींग पॉलिसीचे पैसे नसावेत. शहरात अतिशय मोठया प्रमाणात गाडया वाढलेल्या आहेत. आपण या पॉलिसीकडे बघत असताना उत्पन्नाचे साधन न बघता शिस्त लावण्याचे साधन नागरीकांना गाडया लावण्याची शिस्त कशी लागेल. यादृष्टीकोनातून याच्याकडे पाहावे. एवढीच विनंती करतो.

**मा. एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर मी सर्व सन्मा. सदस्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या सभागृहामध्ये पार्कींगच्या संदर्भातला विषय. सगळयांच्या सुचना, सजेशन्स या सर्वांत महत्वाच्या होत्या. नंतर विशेषतः मंगलाताईंचे, योगेश भाईंचे, राहुल कलाटेंचे, नंतर आपले मनसेचे सचीन चिखले या सगळयांच्या मनामध्ये एक निश्चितच आहे की पार्कींगचे धोरण ठरले गेले पाहिजे. पार्कींगचा विषय खरतर या सभेमध्ये आणण्याच्या मागचा उद्देशच असा होता की या शहरामध्ये ज्या पध्दतीने स्मार्ट सिटीकडे या शहराची वाटचाल चालू आहे. निश्चितच काही चौकामध्ये आपण जर बघितल, म्हणजे चौकामध्ये, रस्त्यावर गाडया लावल्यामुळे होणारी

वर्दळ आणि त्रास आहे. हयाच्यातून कुठेतरी पिंपरी चिंचवड मधल्या लोकांची सुटका झाली पाहिजे. हयाच्यासाठी हा प्रामाणिक प्रयत्न आहे. खरतर दोनदा या विषयाचे प्रेझेंटेशन सगळया पक्षाच्या नेत्यांच्या समोर आपण दाखवल, मागच्या आठवडयामध्ये सगळया नगरसेवकांनाही विनंती केली काही नगरसेवक आले, काही नगरसेवक नाही आले. परंतु निश्चितच यामागची भूमिका ही महानगरपालिकेचा महसूल वाढला पाहिजे अशा पध्दतीची कुठलीच भूमिका नाही. हयाच्यामध्ये एकच निश्चित आहे की आपल्याला जर पिंपरीमध्ये जायच असेल तर पिंपरीमधली परिस्थिती जर आपण बघितली. तर पिंपरीमध्ये रस्ता ओलांडण्यापर्यंत आपला एकएक तास जातो. बीआरटीचे ज्या पध्दतीचे रस्ते आहेत सचीनराव. तिथली जर परिस्थिती बघितली तर आपल्या सगळयांना त्रास होतोय आणि तुम्ही तर तुमच्या प्रभागामधले भक्तीशक्ती चौकामधले उदाहरण सगळयांच्या समोर देत होता. खरतर पार्कींग ही या शहराच्या रहदारीसाठी, सर्व सामान्य माणसांसाठी आखलेले एक धोरण आहे. मी अस कधीच म्हणणार नाही की परिपूर्ण धोरण आहे. खरतर वर्षा-वर्षाला नंतर पार्कींगच्या संदर्भामध्ये दर असतील. म्हणजे मंगलाताईनी मगाशी सांगितल की खर आहे त्यांची कल्पना चांगली होती. सर्वसामान्य टू व्हीलरवाल्यांकडून आपण पैसे घेण्याची गरज नाही. ताई १०० टक्के गरज नाही. पण किमान केल्यानंतर त्याला आपण पावती देतो. नाहीतर माझी गाडी घेऊन दुस-याने गाडी लावली. किमान माझी जी चीट राहते म्हणजे दोन रुपये आपण घेतोय. हे दोन रुपये खरतर आता चलनामध्ये नाणं नाही. पण परिस्थिती तशी आहे, थोडंस तुम्ही ऐका ना. मी त्याही संदर्भामध्ये बोलणार आहे. ती जी चिठ्ठी आहे त्या चिठ्ठीमध्ये तोच गाडी त्याच नंबरची गाडी घेऊन जाऊ शकेल. एवढयासाठी ताई आपण खरतर ताईंचे आपण अभिनंदन करतो. ३९ रुपये, ३०-३० रुपये वाढवलेत. साहेब, माझी या निमित्ताने प्रशासनाला विनंती आहे की, ज्या ज्या ठिकाणी मागच्या आपण सगळया गटनेत्यांच्या बैठकीमध्ये सुध्दा एक गोष्ट सांगितली होती की जेवढे पार्कींगसाठी प्लॉटस आहेत ते ताब्यात घेऊन ते विकसित करण्याच्या दृष्टीने पार्कींगचे धोरण लागू करण्याच्या बरोबर आपल्याला ती सुरुवात करावी लागणार आहे. विशेषत: ज्या ठिकाणी गर्दीची ठिकाणे आहेत, मग पिंपरीमधली असतील. चिंचवड स्टेशनमधले असतील, महापालिकेच्या संदर्भामधले असतील. भक्तीशक्तीच्या संदर्भामधल असेल. वाकड किंवा थेरगांव भागामधल असेल याठिकाणी जी गर्दी आहे, रस्त्यांची वर्दळ आहे, खरतर याठिकाणी आपण

पार्कींगच्या सुविधा अव्हॅलेबल करुन दिल्यातर मला खात्री आहे की या शहरामधील लोक निश्चितच तुम्हाला दुवा देतील. सगळया पक्षाच्या नेत्यांनी, सगळया पक्षांनी या संदर्भामध्ये पार्कींगच्या धोरणाला खरतर पाठींबा दिला. आणि ते निश्चितच मला वाटत पिंपरीतून आपल्या महापालिकेमधून आपल्या पिंपरी ओलांडायची असेल तर पाच मिनिटांचे अंतर आपण एक तासामध्ये करतोय. तर मला वाटत की एक तासाचे अंतर आपण पाच मिनिटांमध्ये करु. या शहरामधे पेट्रोल असेल, डिझेल असेल, वेळ असेल या सगळया गोष्टींचा निश्चितच उपयोग होईल. या निमित्ताने सर्व नगरसेवकांचे, सर्व गटनेत्यांचे खरतर दत्ता काका कधी कधी का विरोध करतात. काका मलाही तुम्हाला एवढंच सांगायचे की तुमचा पाठींबा १०० टक्के आहे. परंतु दुर्देवाने मला अस वाटतय की आपण एवढे शेजारी-शेजारी आहोत. तुमची लोक तुमच्या वॉर्डामध्ये ड्रायव्हर लोक राहतात. बस इकड आमच्याकडे लावतात. म्हणजे ही वस्तुस्थिती आहे मधला जो स्पाईन रोड झालेला आहे त्याठिकाणची आपण परिस्थिती बघितली. साहेब, तुमच्या काळामध्येच तो स्पाईनरोड झाला. त्या सगळया रस्त्यांची ही परिस्थिती आहे. किमान आपण जर एक धोरण निश्चित केले म्हणजे आज आपण तो रस्ता मोकळा नाही परंतु त्या मधल्या भागामध्ये कुठेतरी चांगल्या पध्दतीची पार्कींग व्यवस्था निर्माण करुन दिली तर मला वाटत की रस्त्याच्या ऐवजी मोकळया जागेवर लोकांनी गाडया लावल्या तर निश्चित त्याचा आपल्याला गाडया त्यांच्या सेफ राहतील. ताईंनी खूप चांगल सांगितलं. आज रस्त्यावर गाडया फोडण्याचे सत्र मोठया प्रमाणामध्ये सुरु झालेले आहे. हे जर चांगल्या पध्दतीने बंदीस्तमध्ये केलं तर त्याठिकाणी एखादा सेक्युरिटी वॉचमन ठेवला तर मला अस वाटत की आजची ही परिस्थिती आहे शहराची गाडयांची संदर्भामधली ती चांगली होऊ शकेल. या निमित्ताने सर्व गटनेत्यांचे, सर्व सभागृहाचे मनापासून आभार मानतो. एक चांगल्या धोरणाला आपण सगळयांनी सकारात्मक पाठींबा दिला. आणि माझ्या शब्दांनाही विराम देतो, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, टू व्हिलरला पार्कींग फ्री करावी, नाहीतर माझा विरोध नोंदवा.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोंदवा. राष्ट्रवादी पक्षाचा विरोध नोंदवावा.

**मा.महापौर –** दत्ताकाकांचा विरोध आहे त्यांच्या पक्षाचा विरोध आहे. तो विरोध नोंदवून हा विषय उपसूचनेसह मंजुर करणेत येत आहे.

[सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा.महापौर-** ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून हा विषय उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २०५ विषय क्रमांक – १८

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.स्था/बीआरटीएस/१५९/२०१८ दि.५/५/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६३९ दि.९/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे देशातील तसेच महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. गेल्या २० वर्षात शहरातील लोकसंख्येची वाढ हे दर्शवते.

सन २००१- १०६०४१७ लोकसंख्या

सन २०११- १७२९३५९ लोकसंख्या

सन २०१७- २१००००० लोकसंख्या

त्याअनुषंगाने शहरातील वाढलेले वाहनांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| साल | दुचाकी वाहने संख्या | चार चाकी वाहने संख्या | इतर वाहने संख्या | एकूण वाहने संख्या |
|---|---|---|---|---|
| सन २००१ | १६४५९८ | २०४८९ | २५४७८ | २१०५५६ |
| सन २०११ | ५३७९२० | ९०३४६ | ७५२१० | ७०३४७६ |
| सन २०१७ | ११६९८३४ | २५४९३३ | १४३८४० | १५६८६०७ |

म्हणजेच २१ लाख लोकांसाठी जवळपास १६ लाख वाहने आहेत व त्यामुळे शहरामध्ये पार्कीगची समस्या जाणवु लागली असल्यामुळे त्यासाठी सर्व समावेशक पार्किंग पॉलिसी करणे गरजेचे आहे.

भारतातील दिल्ली, चेन्नई, पुणे, मुंबई, बेंगलोर, नागपूर या शहारामध्ये स्वत:ची पार्किंग पॉलिसी करून सार्वजनिक पार्कीगच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी दर आकारनी करण्यास सुरवात केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये पार्किंग पॉलिसी मधील मुख्य बाबी खालील प्रमाणे-

१) पार्किंगचे दर ठरवताना ECS(Equivalent Car Space) हा मुख्य तांत्रिक मुद्दा विचारात घेतला आहे.

| वाहन | ECS |
|---|---|
| दुचाकी | ०.२० |
| रिक्षा | ०.६० |
| चारचाकी | १.०० |
| टेम्पो | १.०० |
| मीनी बस | १.५० |
| ट्रक | २.२० |
| खाजगी बस | ३.९० |

२) शहर हे तीन विभाग (Zone) करणेत आले आहे.

i)Zone A

उच्च पार्किंग मागणी (High Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे जी दिवसभर ८०% ते१००% पार्किंगची आवश्यकता आहे.

ii) Zone B

मध्यम पार्किंग मागणी (Medium DemandParking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ६०% ते८०% आहे.

iii) Zone C

कमी पार्किंग मागणी (Low Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% ते६०% आहे.

iv)Zone D

कमीत कमी पार्किंग मागणी (Lower most Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% पेक्षा कमी आहे.(या झोनसाठी पार्किंग धोरणाची आवश्यकता नाही)

३) पार्किंगचे शुल्क

P= नागरिकांने पार्क केलेल्या भरावयाचे पार्किंग शुल्क
P= (ECS)xRxTxZ
ECS= Equivalent Car Space
R= एका ECS साठी ठरलेला दर
T= वाहन पार्किंग केलेला वेळ
वेळेचे शुल्क हे १ तासासाठी आहेत.
Zone A साठी Z = २.००
Zone B साठी Z= १.५०
Zone C साठी Z= १.००
Zone Dसाठी Z= ०.००
Z= पार्किंग zone नुसार बदलणारा दर
Z=Zone Factor
Zone A/ Zone B/ Zone C/Zone D

४) ज्या रस्त्यांसाठी पार्किंग दर ठरवलेले आहेत त्या रस्त्याच्या लगतच्या सर्व रस्त्यासाठी मुख्य रस्त्यांपासून १०० मी. पर्यत त्या रस्त्यांसाठी पार्किंग पॉलिसी लागू राहणार आहे.

५) रस्त्यावरील पार्किंग साठी पहिल्या रस्त्यांसाठी एका कारसाठी १ ECS साठी र.रू.१० / प्रति तास आकारण्यात येतील त्यानुसार शहरातील पार्किंगचे दर पुढील प्रमाणे असणार आहे.

| वाहन | ECS | Zone A | Zone B | Zone C |
|---|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ४.०० | ३.०० | २.०० |
| रिक्षा | ०.६० | १२.०० | ९.०० | ६.०० |
| चारचाकी | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| टेम्पो | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| मीनी बस | १.५० | ३०.०० | २२.०० | १५.०० |
| ट्रक | २.२० | ६६.०० | ४८.०० | ३३.०० |
| खाजगी बस | ३.९० | ७८.०० | ५८.०० | ३९.०० |

६) रात्र निवासी पार्कींग साठी रात्री ११ ते सकाळी ८ या ऐके वेळेसाठी (एका ECS साठी) र.रु. २५ प्रति दिनी नुसार र.रू.९,१२५/- प्रती वर्षी वार्षिक परवाना देण्यात येणार आहे.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति दिन (रात्री ११ ते सकाळी ८ पर्यंत) | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति वर्षी |
|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ५/- | १८२५/- |
| रिक्षा | ०.६० | १५/- | ५४७५/- |
| चारचाकी | १.०० | २५/- | ९१२५/- |
| टेम्पो | १.०० | २५/- | ९१२५/- |
| मीनी बस | १.५० | ३८/- | १३६८८/- |
| ट्रक | २.२० | ५५/- | २००७५/- |
| खाजगी बस | ३.९० | ९८/- | ३५५८८/- |

७) गावठाण भाग, झोपडपट्टी वस्ती या ठिकाणी सद्या पार्किंग पॉलिसी लागू राहणार नाही परंतु पुढील दोन वर्षानंतर त्याचा अभ्यास करुन आवश्यकतेनुसार योग्य ते धोरण ठरवण्यात येणार आहे.

८) सदरची पार्किंग पॉलिसी सुरु केल्यापासून एक वर्षासांठी सर्व zone साठी zone c प्रमाणे (कमी demand क्षेत्र) पार्कींगचे दर आकारण्यात येतील. एक वर्षांनंतर प्रत्यक्ष Parking Demand ची माहिती तयार झाल्यावर शहरातील सर्व मुख्य रस्ते Zone A/ Zone B/ Zone C/Zone D मध्ये विभागण्यात येतील व त्यास प्रसिद्धी देण्यात येणार आहे.त्यामुळे सद्यस्थितीत पार्किंगचे दर खालीलप्रमाणे राहतील.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone Cसाठीचे दर र.रू.प्रति तास |
|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | २/- |
| रिक्षा | ०.६० | ६/- |
| चारचाकी | १.०० | १०/- |
| टेम्पो | १.०० | १०/- |
| मीनी बस | १.५० | १५/- |
| ट्रक | २.२० | ३३/- |

| | | |
|---|---|---|
| खाजगी बस | ३.९० | ३९/- |

९) या प्रस्तावित पार्किंग पॉलिसीमध्ये येणारे क्षेत्र पुढील प्रमाणे आहे

i) सर्व बीआरटी रस्ते/ पिंपरी (Camp)

ii) भोसरीगाव, नाशिक फाटा उड्डाणपूल, चिंचवड-पिंपरी-कासारवाडी-आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसर

iii) देहू-आळंदी रस्ता/ प्राधिकरण क्षेत्र

iv) भुमकर चौक ते के.एस.बी. चौक रस्ता

१०) खालील वाहन प्रकारांना शुल्कातून सवलत असणार आहे

i) सायकल

ii) रुग्णवाहिका

iii) दिव्यांगांची वाहने

iv) मान्यता प्राप्त रिक्षा थांबे

११) पूर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये सार्वजनिक वाहनतळ धोरण सुरू करून प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी प्रभागामार्फत प्रत्येक विविधभागासाठी पार्किंग फी जमा करणेसाठी ठेकेदारांची नेमणुक करण्यात येणार आहे.

१२) शहरातील मंजूर विकास आराखड्यातील वाहनतळांची आरक्षणे विकसित करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार महानगरपालिका जी वाहनतळे विकसित करेल त्या ठिकाणी पार्किंगचे दर नजीकच्या झोनच्या दराच्या २५% कमी ठेवणेत येत आहे.

१३) शहरातील पार्किंगचे शुल्क व पार्कींग करावायाचे रस्ते याबाबत दर दोन वर्षांनी आढावा घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करणेत येणार आहे.

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कर्णयात येणार असून Parking App तयार करून पार्किंगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सदरचे धोरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वाहनतळ धोरण-२०१८ मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी सादर केलेले आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेची वाहनतळे विकसित करेल त्या ठिकाणचे पार्किंगचे दर नजीकच्या झोनच्या दराच्या २५% ने कमी करुन सुधारित दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८३ प्रतिकूल-३१

अशी मते पडली व सदर ठराव बहूमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २०६ विषय क्रमांक – १९

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६४५ दि.९/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्ते खाजगी संस्था व्यतिरिक्त, मनपाचे विविध विभाग उदा.ड्रेनेज, पाणीपुरवठा, विद्युत इ. विभागामार्फत सुध्दा खोदले जातात. सदरची खोदाई दोन प्रकारे केली जाते.

**अ) विकास कामा अंतर्गत**

**ब) तातडीचे दुरुस्तीचे कामांसाठी**

१) प्रत्येक विभागाने (ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत इ.) १ एप्रिल ते ३० सप्टेंबर पर्यंत संबंधित स्थापत्य विभागास आगामी आर्थिक वर्षातील (१ एप्रिल ते ३१ मार्च) विकास कामांतर्गत खोदाई संबंधित प्रभागनिहाय प्रस्ताव नकाशासह पाठविणे आवश्यक आहे.

२) तसेच स्थापत्य विभागाने सुध्दा त्यांचेकडील कोणत्या रस्त्यांचे डांबरीकरण आगामी आर्थिक वर्षात करणे प्रस्तावित केले आहे त्याची माहिती वरील तिनही (ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत )विभागास प्रभागनिहाय प्रस्ताव नकाशासह पाठविणे आवश्यक आहे.

३) सर्व खात्यांमध्ये समन्वय राहणेसाठी दर महिन्यातील एक तारीख निश्चित करुन मा.शहर अभियंता यांचे अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी. सदर बैठकीत सर्व विभागाचे सह शहर अभियंता बी.आर.टी.एस., विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज यांनी कार्यकारी अभियंता यांचेसहित हजर रहावे व सदर बैठकीमध्ये खोदाईचे प्रस्तावांना (ठिकाण, लांबी व काम पूर्ण होणेच्या काळाचा त्यामध्ये समावेश असावा.) सदरचे प्राथमिक मान्यता घ्यावी व प्रत्येक बैठकीचा सभावृतांत तयार करावा व अंतिम मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव

सादर करावा. त्यामुळे प्रभागाअंतर्गत खोदाई करणेत येणा-या ठिकाणांची माहिती सर्व विभागांना कळेल व समन्वय राहील.

४) मनपा हद्दीतील ९.०० मीटर व त्यावरील रुंदीचे रस्ते एकदा डांबरीकरण केलेनंतर तीन वर्षे खोदले जाणार नाहीत असे नियोजन असणे आवश्यक आहे या गोष्टीची काळजी व दक्षता पालिकांतर्गत सर्व विभागांनी घ्यावी तसेच वेळोवेळी सर्व विभागांनी एकमेकांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

५) तसेच परवानगी दिलेले खोदाईचे काम पूर्ण झालेनंतर सर्व संबंधित विभागांनी स्थापत्य विभागास लेखी कळविणे आवश्यक आहे.

६) तसेच ह्यापुढे ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागाने त्यांनी खोदलेल्या सर्व प्रकारचे ट्रेचेंसची दुरुस्ती (डब्ल्यु.बी.एम. व बी.बी.एम.पर्यंत) स्थापत्य विभागाने करावयाची आहे व त्याकामाचा DLP (Defect Liability Period) एक वर्षाचा ठेवावा.

७) ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत या विभागांना तातडीचे स्वरुपात देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी रस्ता खोदावा लागल्यास संबंधितांनी शहर अभियंता किंवा संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

सदरचे धोरणाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत मा.आयुक्त यांनी सर्व विभागास परिपत्रक काढून कळवावे. वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २०

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६४६ दि.९/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते विविध सेवा वाहिन्यां टाकण्यासाठी दर वर्षी रस्ते खोदले जातात. सदर रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत दुरुस्ती करणेकामी बराच कालावधी जातो. खोदलेले रस्ते लवकरात लवकर पूर्ववत (दुरुस्ती) करणेकामी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**अ) धोरणः-**

१) सेवा वाहिन्यां टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्या मध्येच स्विकारणेत यावेत.

२) महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये अ,ब,क,ड,इ,फ,ग, ह व बीआरटीएस अशा प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय/विभागानुसार सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावे.

३) रस्ता खोदाईपोटी प्राप्त होणारे शुल्क, त्याच क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रातील सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्तीकामी वरील लेखाशिर्षावर देणेत यावे.

४) परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

५) एच डी डी (**Horizontal Direction Drill**) पध्दतीने खोदाईची परवानगी यापुढे कायमस्वरुपी देणेत येऊ नये.

६) परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या शुल्काच्या २५% रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी.

७) या पुढे शहरामध्ये विनापरवाना खोदकाम केल्याचे आढळल्यास/तक्रारी प्राप्त झाल्यास,सदर तक्रार स्थळाचा पंचनामा संबंधित क्षेत्रिय कार्यालय (स्थापत्य) विभागाने करून, खोदाई शुल्काच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेचा दंड आकारणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर भागातील उपअभियंता यांनी अनधिकृत खोदाई करणा-यावर **F.I.R.** दाखल करावा.

८) दररोज काम सुरू करणे पुर्वी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना परवानाधारक संस्था यांनी काम सुरू करणेबाबत कळविणे आवश्यक असून, संबंधित कनिष्ठ अभियंता किंवा स्थापत्य सहाय्यक यांनी दैनंदिन पाहणी करून, कामाचे फोटो व चलचित्र खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर संपुर्ण फोटो व चलचित्र (**Video shooting)** संकलित करून नस्तीबध्द करावेत.

९) फक्त दुरुस्तीसाठी तातडीने रस्ता खोदणे आवश्यक असल्यास, मनपाकडील व खाजगी सेवावाहिन्यांची १०० मीटर पर्यंतचीरस्ते खोदाई शहर अभियंता यांची परवानगी घेवून करणेत यावी व त्यापुढील अंतरासाठी मा.आयुक्त यांची रितसर परवानगी घेण्यात यावी. (सदर तातडीचे कामासाठी **NOC** घेणे व्यतिरिक्त इतर सर्व अटी बंधनकारक राहतील.)

**ब) अटीः-**

**सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटींचा समावेश करावा.**

१) काम करण्याच्या ठिकाणी कामाच्या माहितीबाबत फलक लावणेत येवून त्यामध्ये कामाचे नाव, कामाची मुदत,एजन्सीचे नाव, एकूण रस्ता खोदाई करणेत येणारे अंतर, कामाचे ठिकाण, संबंधित एजन्सीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर व त्या प्रभागातील कनिष्ठ अभियंत्याचे नाव व मोबाईल नंबर इत्यादी माहितीचा समावेश असावा. तसेच फलक प्रत्येक दिवशी काम सुरू होणा-या ठिकाणी ते त्या दिवशीच्या काम पुर्ण होणा-या ठिकाणी तसेच किमान ४०० मी. अंतरावर असावा.

२) काम सुरू करणेपुर्वी संपुर्ण खोदाईचा बार चार्ट परवानगी धारक संस्था यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना सादर करावा.

३) वाहतूक पोलीस विभागाकडून परवाना घेणेत येऊन, सदर परवान्याची प्रत संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४) खोदाई काम सुरू करणेपुर्वी महाराष्ट्र नॅचरल गॅस (**MNGL)**, एम.एस.ई.बी., बी.एस.एन.एल. तसेच एम.आय.डी.सी यांना संबंधित परवाना सादर करून त्याची पोहोच संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य विभागात देणे बंधनकारक राहील. (सदरची बाब त्यांनी त्यांचे सेवा वाहिनीची खोदाई काम चालु असताना दक्षता घेणेसाठी आवश्यक आहे.)

५) ज्या एजन्सीला खोदाई कामाची परवानगी दिली आहे त्यांनी कामाचे फोटो व चलचित्र (Video Shooting**)** खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर काढणे आवश्यक आहे व त्याच्या प्रती स्थापत्य विभागास काम पूर्ण झालेनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

६) काम पुर्ण झालेनंतर परवानगी पत्राप्रमाणे काम झाल्याचा, संबंधित स्थापत्य कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेला दाखला, अर्जदार एजन्सीने अनामत रक्कम परतावा अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

७) काम संपल्यानंतर परवाना धारक यांनी अनामत रक्कम परत मिळणेसाठी ४५ दिवसांच्या आतपरवाना देणा-या ठिकाणी अर्ज करणे बंधनकारक राहील. अन्यथा, कोणतीही पुर्व सुचना न देता अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

८) दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त जादा खोदाई आढळल्यास वाढीव खोदाईस दुप्पट दराने दंड आकारून त्याची वसुली करणेत यावी.

९) सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या ५.४५) पर्यंत करावे.

१०) रस्ता खोदाईची परवानगी देताना मनपा कडून परवानगी पत्रात असणा-या यापुर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

तसेच ज्या वर्षात सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईची परवानगी दिली जाईल, त्याच वर्षी सदर रस्ते पूर्ववत करण्याचे काम अंदाजपत्रकात ठेवून, पुरेशी तरतुद करुन काम पूर्ण करावे. मा.आयुक्त यांनी सर्व विभागास सदर धोरणानुसार कार्यवाही

करणेचे परिपत्रक काढावे. सबब वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण ढंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- खाली नमुद अनुक्रमांकामधील दुरुस्ती उपसुचना देण्यात येत आहे त्या व्यतिरीक्त बाकी अनुक्रमांकात काही बदल नाही, सदर उपसूचनेस मान्यता देणेत यावी.

अ) धोरण-

१) सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर या चार महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत **या ऐवजी**

सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या सहा महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत.

**४)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे. **या ऐवजी**

४अ) परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

४ब) परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग या तीन्ही विभागाचे संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागाने प्राप्त करुन घेऊन संपुर्ण प्रकरण नाहरकत दाखल्यासह पुढील कार्यवाहीसाठी शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागाकडे पाठविण्यात यावे.

६) परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या

शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी. **या ऐवजी**

परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणाऱ्या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी बँक गॅरंटीव्दारे घ्यावी.

ब) अटी-

सेवा वाहिन्याचे रस्त खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटीचा समावेश करावा.

९) सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या.५.४५) पर्यंत करावे. **या ऐवजी**

सदर रस्ता खोदाईचे काम हे वाहतुक परवानाप्रमाणे दिलेल्या वेळेत करावे.

वरीलप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह खरतर हा विषय चांगला आहे. परंतु सन्मा. सदस्य विलास मडिगेरी आणि ढाके साहेबांनी हा विषय ठेवलेला आहे. आणि बराच मोठा हा विषय आहे. आपल्या चालु पॉलिसी काय होत्या आणि याच्यामध्ये आता काय बदल केलेले आहेत. तर माझी आपल्याला विनंती आहे की सभागृहाला आणि पक्षनेत्यांना पण. की या महिन्यामध्ये हा विषय आपण तहकूब ठेवायचा, रितसर अभ्यास करा आणि पुढच्या महिन्यामध्ये आपण निर्णय घेऊ. माझी विनंती आहे आपल्याला की हा विषय आपण तहकूब करावा. विषय क्रमांक २० तहकूब करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सागर आंगोळकर –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा. महापौर** :- विषय क्रमांक २० विषय तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – २०७ विषय क्रमांक – २०

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६४६ दि.९/०५/२०१८

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २१

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.पापु/बक्षेका/१/कावि/३९८/२०१८ दि.१७/०४/२०१८

**काम क्र.१ बाबत-**

स.नं.२१०, वाकड येथे २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणेचे नियोजित होते त्याचा सर्व खर्च पिंपरी चिंचवड महानगर विकास प्राधिकरण PCNTDA ने रक्कम रु.१,६५,१७,१६८/- चा धनादेश दि.०४/०८/२०१६ रोजी दिला आहे. तथापि, PCNTDA ने सदर जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केली नाही. त्यामुळे निविदा काढता आली नाही.

आता स.नं.२१०, वाकड ऐवजी स.नं.२०८ येथील ३० गुंठे जागा PCNTDA ने महानगरपालिकेकडे दि.०३/०४/२०१८ रोजी हस्तांतरीत केली आहे.

जागेमध्ये झालेला बदल, पाईपलाईनची वाढलेली लांबी यामुळे सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेमध्ये वाढ होत आहे. आता सदर कामाची अंदापत्रकीय रक्कम रु.५,५०,००,०००/- येत आहे. सदर कामासाठी प्रत्यक्ष येणा-या खर्चाची रक्कम

PCNTDA ने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस देणाबाबत इकडील पत्र जा.क्र./बक्षे/पापु/०१/कावि/६४७/२०१४ दि.०५/०९/२०१४ अन्वये कळविलेले आहे.

**काम क्र.२ बाबत-**

थेरगाव, लक्ष्मणनगर येथील जुनी पाण्याची टाकी पाडून नवीन २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणेच्या कामाचे आदेश क्र. पापु/०६/कावि/१२४१/२०१८ दि.०८/०३/२०१८ अन्वये दिलेले आहेत. सदर कामाची निविदा रक्कम रु.२,३३,४२,९९१/- असुन, मंजुर निविदा दर रक्कम (Accepted Tender Cost) रु.२,७५,४४,७२९/- येत आहे.

उपरोक्त दोन्हींही कामांचा समावेश गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात होता. तसेच, या वर्षीच्या सन २०१८-१९ च्या मुळ अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेसाठी दोन्हींही कामांची नावे यादीत होती. तथापि, नजरचुकीने सदर दोन्हींही कामे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधुन वगळली आहेत.

आता, काम क्र.१ हे PCNTDA कडुन मिळणा-या रकमेकडुन होणार आहे.

काम क्र.२ ला कामांचे आदेश दिले आहेत.

या सर्व पार्श्वभुमीवर दोन्हींही कामांना त्या कामासाठी येणाऱ्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे, तसेच सन २०१८-१९ च्या आर्थिक वर्षासाठी तरतुद करणे आवश्यक आहे.

याकामी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमांस प्रशासकीय मान्यता द्यावी लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वाकड वॉर्ड क्र.५३, स.नं.२०८, वाकड, कावेरीनगर येथे २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी व संपवेल आणि सिमाभिंत बांधणे. | ५,५०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| २ | थेरगाव, लक्ष्मणनगर येथील जुनी पाण्याची टाकी पाडून नवीन २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणे. | २,५०,००,०००/- |

तसेच, सदर कामांसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी पुढीलप्रमाणे तरतुद ठेवावी लागणार आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात करावयाची तरतुद** |
|---|---|---|
| १ | वाकड वॉर्ड क्र.५३, स.नं.२०८, वाकड कावेरीनगर येथे २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी व संपवेल आणि सिमाभिंत बांधणे. | १,००,००,०००/- |
| २ | थेरगाव, लक्ष्मणनगर येथील जुनी पाण्याची टाकी पाडून नवीन २५ लक्ष क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणे. | १,००,००,०००/- |
| | **एकुण** | **२,००,००,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.२,००,००,०००/- ची तरतुद सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील “पाणीपुरवठा विशेष योजना निधी (मुख्य अंदाजपत्रक-१)” या लेखाशिर्षाखाली शिल्लक असलेल्या रक्कम रु.५,००,००,०००/- च्या रकमेमधुन वर्गीकरणाद्वारे करता येईल.

विषयांकीत कामे पाणीपुरवठा विभागाच्या दृष्टीने विशेषतः वाकड, थेरगावच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच, काम क्र.१ चा सर्व खर्च PCNTDA करणार आहे. काम क्र.२ चे काम आदेश दिले आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, ‘वाकड वॉर्ड क्र.५३, स.नं.२०८, वाकड कावेरीनगर येथे २५ लक्ष लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी व संपवेल आणि सिमाभिंत बांधणे.’या कामास व त्यापोटी येणारा खर्च रक्कम रू.५,५०,००,०००/- ला तसेच, ‘थेरगाव, लक्ष्मणनगर येथील जुनी पाण्याची टाकी पाडून नवीन २५ लक्ष क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणे.’या कामास व

त्यापोटी येणारा खर्च रक्कम रू.२,५०,००,०००/- ला प्रशासकीय मान्यता मिळणेकामी आणि सदर दोन्ही कामांसाठी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रत्येकी रक्कम रू.१,००,००,०००/- ची तरतूद मिळून एकूण रक्कम रू.२,००,००,०००/- ची तरतूद "पाणीपुरवठा विशेष योजना निधी (मुख्य अंदाजपत्रक-१)" या लेखाशिर्षाखाली शिल्लक असलेल्या रक्कम रू.५,००,००,०००/- मधून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सागर आंगोळकर –** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.आयुक्त यांचेकडील क्र.पापु/मुख्य/७५/२०१८ दि.२९/०५/२०१८ चे पत्रान्वये मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमांक २१ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत यावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.राजेंद्र गावडे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** विषय क्रमांक २१ मागे घेणेची विनंती केलेली आहे त्यानुसार विषय क्रमांक २१ मागे घेण्यास परवानगी देणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २०८ विषय क्रमांक – २१

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.पापु/बक्षेका/१/कावि/३९८/२०१८ दि.१७/०४/२०१८

मा.आयुक्त यांचेकडील क्र.पापु/मुख्य/७५/२०१८ दि.२९/०५/२०१८ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमांक २१ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अनुराधा गोरखे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २२

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.वैदय/१४अ/कावि/२५३/२०१८ दि.०४/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका धन्वंतरी योजना धोरण २०१३ मधील कलम १२ (अ) मध्ये बाहेरगावी गेलेल्या रूग्णांच्या बाबतीत केवळ तातडीक स्वरूपाचे आजारासाठी सबंधिताने विभागामार्फत वैद्यकीय विभागास ११६ तासांचे आत कळविल्यास त्यांची प्रतिपूर्ती करणे कामी नमूद केले आहे. महापालिकेतील प्रस्तावात नमूद प्रमाणे काही कर्मचा-यांनी तातडीचे व गंभीर स्वरूपाचे आजारासाठी पॅनल बाहेरील रूग्णालयात उपचार घेतलेले आहेत. तसेच त्यांनी वैद्यकीय विभागास ११६ तासांचे आत कळविलेले नाही. किंवा काही कर्मचा-यांनी रेफर लेटर न घेता परस्पर पॅनल बाहेरील रूग्णालयांत उपचार घेवुन प्रतिपूर्तीसाठी अर्ज केलेले आहे. अशा अडचणी दुर करणेकामी धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरणातील कलम १२ मध्ये **“बाहेरगावी गेलेल्या रूग्णाऐवजी पॅनल बाहेरील रूग्णालय”** असा बदल करून कलम १२(अ) मध्ये **“अशा काही रूग्णांनी तातडीचे व गंभीर स्वरूपाचे आजारासाठी पॅनल बाहेरील रूग्णालयात रूग्णास ॲडमीट केले असेल, तर अशा अधिकारी \ कर्मचा-यास त्याने संबधित विभाग \ वैद्यकीय विभागास अपवादात्मक परिस्थितीत ११६ तासांचे आत कळविले नसेल तरीही सदर अधिकारी \ कर्मचा-यास त्यांनी सादर केलेल्या मूळ बिलांचे ७५% किंवा धन्वंतरीच्या दराप्रमाणे, यामध्ये जी रक्कम कमी येईल येवढया रक्कमेची प्रतिपूर्ती करणेत यावी”** असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगीता नागरगोजे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैदयकीय विभागामध्ये अन्न परवाना विभागात पर्यवेक्षक अन्न १ व अन्न निरीक्षक ५ (एकुण ६) येथे अधिकारी व कर्मचारी कायम स्वरुपी सेवेत कामकाज करीत आहेत. सदर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते, अदायगी, हजेरी, थंब इम्प्रेशन इत्यादी, पिंपरी चिचवड महानगरपालिकेमध्येच विनाखंडीत आज पर्यंत चालू आहे. शासनाचे आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात वरील सर्व कर्मचारी, अन्न व औषध प्रशासन, पुणे विभागात त्यांचे अधिपत्याखाली पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातच पुर्वीप्रमाणेच दि.५/८/२०११ पासून कामकाज करीत आहेत. अदयाप सदर कर्मचारी यांची सेवा शासनाकडे वर्ग झालेली नाही.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अस्थापनेवरील कायम स्वरुपी पर्यवेक्षक अन्न १ व अन्न निरीक्षक ५ (एकुण ६) अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची सेवा पिंपरी चिंचवड मनपा अंतर्गत येत असल्याने महानगरपालिकेतील अस्थापनेवरील इतर कर्मचारी व अधिकारी यांचे प्रमाणेच धन्वंतरी योजनेचा लाभ व सेवा देणेस व त्यांचे वेतनातुन दरमहा वर्गणी वसुल करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.अनुराधा गोरखे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २०९ विषय क्रमांक – २२

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.वैदय/१४अ/कावि/२५३/२०१८ दि.०४/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका धन्वंतरी योजना धोरण २०१३ मधील कलम १२ (अ) मध्ये बाहेरगावी गेलेल्या रूग्णांच्या बाबतीत केवळ तातडीक स्वरूपाचे आजारासाठी सबंधिताने विभागामार्फत वैद्यकीय विभागास ११६ तासांचे आत कळविल्यास त्यांची प्रतिपूर्ती करणे कामी नमूद केले आहे. महापालिकेतील प्रस्तावात नमूद प्रमाणे काही कर्मचा-यांनी तातडीचे व गंभीर स्वरूपाचे आजारासाठी पॅनल बाहेरील रूग्णालयात उपचार घेतलेले आहेत. तसेच त्यांनी वैद्यकीय विभागास ११६ तासांचे आत कळविलेले नाही. किंवा काही कर्मचा-यांनी रेफर लेटर न घेता परस्पर पॅनल बाहेरील रूग्णालयांत उपचार घेवुन प्रतिपूर्तीसाठी अर्ज केलेले आहे. अशा अडचणी दुर करणेकामी धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरणातील कलम १२ मध्ये **"बाहेरगावी गेलेल्या रूग्णाऐवजी पॅनल बाहेरील रूग्णालय"** असा बदल करून कलम १२(अ) मध्ये **"अशा काही रूग्णांनी तातडीचे व गंभीर स्वरूपाचे आजारासाठी पॅनल बाहेरील रूग्णालयात रूग्णास ॲडमीट केले असेल, तर अशा अधिकारी\कर्मचा-यास त्याने संबधित विभाग\वैद्यकीय विभागास अपवादात्मक परिस्थितीत ११६ तासांचे आत कळविले नसेल तरीही सदर अधिकारी\ कर्मचा-यास त्यांनी सादर केलेल्या मूळ बिलांचे ७५% किंवा धन्वंतरीच्या दराप्रमाणे, यामध्ये जी रक्कम कमी येईल येवढया रक्कमेची प्रतिपूर्ती करणेत यावी"** असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैदयकीय विभागामध्ये अन्न परवाना विभागात पर्यवेक्षक

अन्न १ व अन्न निरीक्षक ५ (एकुण ६) येथे अधिकारी व कर्मचारी कायम स्वरुपी सेवेत कामकाज करीत आहेत. सदर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते, अदायगी, हजेरी, थंब इम्प्रेशन इत्यादी, पिंपरी चिचवड महानगरपालिकेमध्येच विनाखंडीत आज पर्यंत चालू आहे. शासनाचे आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात वरील सर्व कर्मचारी, अन्न व औषध प्रशासन, पुणे विभागात त्यांचे अधिपत्याखाली पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातच पुर्वीप्रमाणेच दि. ५/८/२०११ पासून कामकाज करीत आहेत. अदयाप सदर कर्मचारी यांची सेवा शासनाकडे वर्ग झालेली नाही.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अस्थापनेवरील कायम स्वरुपी पर्यवेक्षक अन्न १ व अन्न निरीक्षक ५ (एकुण ६) अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची सेवा पिंपरी चिंचवड मनपा अंतर्गत येत असल्याने महानगरपालिकेतील अस्थापनेवरील इतर कर्मचारी व अधिकारी यांचे प्रमाणेच धन्वंतरी योजनेचा लाभ व सेवा देणेस व त्यांचे वेतनातुन दरमहा वर्गणी वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २३

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/१२६/२०१८ दि.५/५/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे.

राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०४/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र "अ"**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १३४७७ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १२९८७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १०६९५ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ६९५२ | एकुण बांधकाम पुर्ण- १०११९<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३१६७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| संख्या | | | पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७४९८ लाभार्थी | GOI+GOM=४४९.८८ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १४९.९६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५९९.८४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ६५४३ लाभार्थी | GOI+GOM=३९२.५८ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१३०.८६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५२३.४४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.स्विनल म्हेत्रे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.महापालिका सभा ठराव क्रमांक. ८४ दिनांक १६/१०/२०१७ रोजीचे मंजुर ठरावानुसार १२ ते १०० व १०० चे पुढील फ्लॅट/बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी या २ गटामध्ये प्रती क्षेत्रीय कार्यालयामधुन १ याप्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयात “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना सन २०१७-२०१८ ते२०१९-२०२० या कालावधीत ३ वर्षाकरीता राबविण्याबाबत धोरण निश्चित केलेले आहे.

सदर योजना अंमलबजावणीचे प्रथम वर्ष असल्याने शहरातील सोसायटी गृहप्रकल्प यांचेमध्ये निकोप स्पर्धा झाली नाही. तसेच अ व ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत निवड झालेल्या सोसायटींना अनुक्रमे प्रथम क्रमांकाचे ६८ व ७२ गुण प्राप्त झाले असून त्यांना सामान्य करातील सवलत देण्यात आलेली आहे. परंतु धोरणानुसार क्षेत्रिय कार्यालयनिहाय प्रती गटामध्ये १ सोसायटी निवड करावयाची असल्याने ६८

पेक्षाही जास्त गुण प्राप्त झालेल्या सोसायटीना मिळकत कराचे सामान्य करात सवलत देण्यात आलेली नाही.

तरी “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजनेचा उद्देश हा शहर पर्यावरण पुरक व स्वच्छ होणे, पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्यासाठी महानगरपालिकेवर व इतर शासकीय यंत्रणांवर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी करणेचा असल्याने स्पर्धेत सहभाग घेऊन ज्या सोसायटी गृहप्रकल्पांना ६५ पेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत अथवा यापुढे होतील, अशा सोसायटी गृहप्रकल्पांना चालू मागणीतील सामान्य करात निश्चित केलेल्या गुणांकानुसार सवलत सामान्य करातील इतर सवलती व्यतिरीक्त सवलत देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.शर्मिला बाबर –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २१० विषय क्रमांक – २३

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/१२६/२०१८ दि.५/५/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र.रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०४/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र "अ"**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १३४७७ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १२९८७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १०६९५ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ६९५२ | एकुण बांधकाम पुर्ण- १०११९<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३१६७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७४९८ लाभार्थी | GOI+GOM=४४९.८८ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १४९.९६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकुण** | **५९९.८४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br><br>दुसरा हप्ता | ६५४३ लाभार्थी | GOI+GOM=३९२.५८<br><br>लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१३०.८६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५२३.४४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक. ८४ दिनांक १६/१०/२०१७ रोजीचे मंजुर ठरावानुसार १२ ते १०० व १०० चे पुढील फ्लॅट/बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी या २ गटामध्ये प्रती क्षेत्रीय कार्यालयामधुन १ याप्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयात “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या कालावधीत ३ वर्षाकरीता राबविण्याबाबत धोरण निश्चित केलेले आहे.

सदर योजना अंमलबजावणीचे प्रथम वर्ष असल्याने शहरातील सोसायटी गृहप्रकल्प यांचेमध्ये निकोप स्पर्धा झाली नाही. तसेच अ व ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत निवड झालेल्या सोसायटींना अनुक्रमे प्रथम क्रमांकाचे ६८ व ७२ गुण प्राप्त झाले असून त्यांना सामान्य करातील सवलत देण्यात आलेली आहे. परंतु धोरणानुसार क्षेत्रिय कार्यालयनिहाय प्रती गटामध्ये १ सोसायटी निवड करावयाची असल्याने ६८ पेक्षाही जास्त गुण प्राप्त झालेल्या सोसायटीना मिळकत कराचे सामान्य करात सवलत देण्यात आलेली नाही.

तरी “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजनेचा उद्देश हा शहर पर्यावरण पुरक व स्वच्छ होणे, पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्यासाठी महानगरपालिकेवर व इतर शासकीय यंत्रणांवर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी करणेचा असल्याने स्पर्धेत सहभाग घेऊन ज्या सोसायटी गृहप्रकल्पांना ६५ पेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत अथवा यापुढे होतील, अशा सोसायटी गृहप्रकल्पांना

चालू मागणीतील सामान्य करात निश्चित केलेल्या गुणांकानुसार सवलत सामान्य करातील इतर सवलती व्यतिरीक्त सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २११ विषय क्रमांक – २४

दिनांक- २२/६/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. लेखा/६/कावि/५२९६/२०१८ दि.५/५/२०१८

शहर अभियंता यांनी फ क्षेत्रिय स्थापत्य कार्यालयाचे दि. २१/४/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य मुख्यालयाकडील व प्रभागाकडील प्रथम प्राधन्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामासाठी अपुरी तरतुदी ठेवण्यात आलेल्या असल्याने, सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील शिल्लक र.रु ५ कोटीतून उपलब्ध तरतूदीतून देणेबाबत मा. महापौर यांनी दि. २१/४/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. र.रु. ३९,८०,०००/- मा.आयुक्त यांच्या मान्यतेने वर्ग केलेले आहेत.

शहर अभियंता यांनी फ क्षेत्रिय स्थापत्य कार्यालयाचे दि. २१/४/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य मुख्यालयाकडील व प्रभागाकडील प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामासाठी अपु-या तरतुदी ठेवण्यात आलेल्या असल्याने, सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील

शिल्लक र.रु ५ कोटीतून उपलब्ध करुन देणेबाबत मा. महापौर यांनी दि. २१/४/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्रभाग क्र | लेखाशिर्ष | पान क्र | अ.क्र | सन २०१८-१९ची तरतुद | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार करावयाची | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वाढ | घट |
| | भांडवली कामे | | | | | | | |
| १ | प्रभाग क्र. १३ निगडी मध्ये देखभाल दुरुस्ती व चौक सुशोभिकरणाची कामे करणे | १३ | स्थापत्य विषयक कामे करणे | १९५ | २९ | १०००००० | १०००००० | ० |
| २ | प्रभाग क्र. १३ निगडी चिकन चौक येथील परिसरात पेव्हींग ब्लॉक बसवून अनुषंगीक कामे करणे | १३ | स्थापत्य विषयक कामे करणे | १९५ | ३० | १०००००० | १०००००० | ० |
| ३ | प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण येथील मनपा इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे | १३ | स्थापत्य विषयक कामे करणे | १९६ | ३७ | २०२०००० | १९८०००० | ० |
| ४ | महापौर विकास निधी | | | ४१ | १८ | ५००००००० | ० | ३९८०००० |
| | | | | | | ५४०२०००० | ३९८०००० | ३९८०००० |

तरी वरीलप्रमाणे शहर अभियंता फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य यांनी प्रस्तावित केलेनुसार व मा.महापौर यांनी दि. २१/४/२०१८ चे पत्राचे शिफारसीनुसार र.रु ३९,८०,०००/- वर्गीकरण करणेस आदेश क्र. लेखा/०६/कावि/५२५५/२०१८ दि.२७/४/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असल्याने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले.

**मा.लक्ष्मण उंडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/३४४/२०१८
दिनांक - २७/०८/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.